श्री

# साईलीला



एप्रिल १९८७

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

## श्री. रा. द. बन्ने

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

—: कार्यकारी संपादक :—

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

---


**वर्ष ६६ वे]** **किंमत १ रुपया** **[अंक १ ला**

**दूरध्वनी : ४१२ २५ ६१**


---

— कार्यालय —


'साईनिकेतन'', प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



## रघुनाथ सावित्री
## साईनाथ भजनमाला

८

नको मना तूं बाहेर भटकूं।
क्षणभरि स्थिर तूं राही रे॥
हात जोडुनि आर्जव करितें।
वदवद स्वमुखें सांई रे॥ धृ.॥
जन्म जन्म किती निघोनि गेले।
मौज अशी कधिं न मिळे रे॥
अकस्मात हें रत्न मिळालें।
सार्थक करुनी घेई रे॥
औट हात या राष्ट्री तुजला।
प्रधानपद किति शोभे रे॥
म्हणूनि इच्छितें साह्य तुझे बा।
शुभ समयीं या देई रे॥
दासि म्हणे रे मना सदया।
निकट सोयरे आपण रे॥
हेंच जाणुनी भजनारंगी।
एकाग्रचि तूं राही रे॥

९

साईनाथ माउली। दिनाची।
साईनाथ माउली ॥ धृ.॥
शिर्डी ग्रामी वास करोनी।
भक्ति पाहत राहिली॥
जनांसी सद्दीक्षा दीधली। दिनांची.॥
मानव रुपी काया घेऊनि।
लीला करित राहिली॥
स्मरतां समयासी पावली। दिनाची.॥
दास विनवितो कर जोडोनी।
आवड तुझी लागली॥
सेवेची भिक्षा मज घाली। दिनाचीं।

१०

या हो बाबा सांई या हो भजनाला।
उत्सव मांडिला आजी येथें॥
स्फूर्ति ही तुमची बोल हे तुमचे।
पोवाडे तुमचे गातों मुखी॥
माझीये हृदयीं जरी हो वसलां।
अज्ञान जीवाला कळेना तें॥
दास म्हणे मना राही सावधान।
प्रमोन स्तवन करी आतां॥

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील
मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# श्री साईलीला — एप्रिल १९८७

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख-कविता शिर्षक | लेखक-कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ५ |
| २ | शिर्डीची ओढ | — सौ. निर्मला मालवणकर | ७ |
| ३ | श्री साईनाथांचा शरणार्थी — (२१) | — श्री. वि. बा. खेर | ८ |
| ४ | श्री साईंचे सत्य चरित्र - अध्याय १७ वा | — श्री. मु.ब. निंबाळकर | १२ |
| ५ | मज नको हे मोठेपण | — श्री. डी.बी. पोतनीस | १७ |
| ६ | द्रौपदीची थाळी आणि बाबांची उदी | — श्री. शं.ग. सारंगधर | १८ |
| ७ | तिसरा शोध — श्री साईदत्ताचा | — श्री. चकोर आजगांवकर | २० |
| ८ | वेळ आली होती पण बाबांनी वाचविले | — श्री. पी.जी. कोरगांवकर | २१ |
| ९ | भक्ती तुज मुक्ती कडे | — श्री. सि.ना. पवार | २२ |
| १० | ओम जय श्रीसाई हरि | — कै. सौ. कमलिनी देशपांडे | २४ |
| ११ | श्री. साईंच्या दरबारी वारी परमार्थाची | — श्री. वि.म. हटवार | २५ |
| १२ | साई कृपेने पास झाले | — कु. विद्या प. बोराडे | २६ |
| १३ | पतित पावन साईनाम | — श्री. जनार्दन बांदेकर | २७ |
| १४ | भक्त वत्सल कृपामूर्ति श्रीसाई माऊली | — श्री. आंतोन फर्नांडिस | ३१ |
| १५ | साईप्रसाद | — सौ. वंदना पारकर | ३५ |
| १६ | आपले गुरु.... श्री साईबाबा | — श्री. गुरुनाथ पन्हाळकर | ३६ |
| १७ | परमेश्वरी अवतार श्री साईबाबा | — श्री. विलास ताटरे | ३८ |
| १८ | श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | — साईनंद | ४० |
| १९ | साई दरबारातील नवरत्ने — ७ | — | ४२ |
| २० | जैन विचार सरणी | — श्री. सुनील राणे | ४६ |
| २१ | श्री साईनाथ स्तोत्रम् | — डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर | ४८ |
| २२ | साईभजन | — श्री. दिलीप शं. लांडे | ४९ |
| २३ | सद्विचार-सद्आचरण हेच खरे ईश्वर चिंतन | — श्री. सुनील द. राणे | ५० |
| २४ | नामाचे महत्व | — सौ. सरोजिनी मुळ्ये | ५० |
| २५ | श्री साईबाबांची आरती | — श्री. अशोक वि. औंधे | ५१ |
| २६ | सर्वांचे साईबाबा | — सौ. अनिता कोरडे | ५२ |
| २७ | बाबांच्या कृपेने मुलगा बरा झाला | — सौ. चंद्रकला सोनवणे | ५३ |
| २८ | उदीचा महिमा | — श्री. अनंत भि. भोसले | ५४ |
| २९ | शरण मज आला.... | — कु. संगीता गांवकर | ५४ |
| ३० | साईनाथांची छबी नवसाला पावली | — श्री. मधुसूदन चव्हाण | ५५ |
| ३१ | बाबांच्या कृपेनेच वाचले | — सौ. निलम वरळीकर | ५६ |
| ३२ | नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य | — श्री. अरुण सातपुते | ५६ |
| ३३ | तब्बल ४ महिन्यांनी रिंग सापडली | — सौ. शुभदा अ. नाईक | ५७ |


| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | बाबांची कृपा | — सौ. कुसूम द. मोहिते | ५८ |
| ३५ | माझे बाबा | — सौ. निवेदिता घाडीगांवकर | ५८ |
| ३६ | श्री साईकृपेने हे सारे घडले | — श्री. रा.ब. बारओ | ५९ |
| ३७ | साई तारी त्याला कोण मारी | — श्री. यशवंत द. बापर्डेकर | ५९ |
| ३८ | जगत् चालक श्री साईंची लीला | — सौ. सुशिला य. शिंदे | ६० |
| ३९ | अंतर्यामी साई | — सौ. भावना जेऊरकर | ६१ |
| ४० | साईगीत | — श्री. गणेश काकडे | ६२ |
| ४१ | श्री साईंची उदी-संजीवनी | — सौ. सुचिता पिळणकर | ६३ |
| ४२ | किर्तनी बहर यावा | — श्री. रामदास पगारे | ६३ |

# साईसहस्त्रनामावली

[संपादन- श्री. सदानंद चेंदवणकर व डॉ. श्री.दि. परचुरे, प्रकाशक- श्री. तानावडे, ताडदेव बुक डेपो प्रकाशन, मुंबई नं. ७ किंमत ५ रुपये पृष्ठ ६४]

दक्षिण भारतात साई भक्तीचा फार मोठ्या प्रमाणात अखंड प्रचार करणाऱ्या व मैलापूर मद्रास येथे 'ऑल इंडिया साई समाज' या संस्थेची स्थापना करणाऱ्या प.पू.श्री. बी.व्ही. नरसिंह स्वामीजी यांनी १९४४ साली संस्कृतात श्लोक बद्ध अशी रचना करून त्यामधून साईबाबांची हजार नावे दिली होती. त्यावरुन आधार घेऊन श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या श्री साईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर व त्यांचे एकावेळचे सहकारी व इंग्रजी आवृत्तीचे माजी का. संपादक डॉ. श्री.दि. परचुरे यांनी त्या श्लोकबद्ध नामावलीवरुन श्री साईनाथांचे एकेक सुलभ नाव श्रीविष्णू सहस्त्रनामावलीचे धर्तीवर तयार केलेली आहेत. ती त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केली असून भक्तांच्या हाती दिली आहेत. ही सहस्त्रनामावली प.पू. नरसिंहस्वामीजींनी स्थापन केलेल्या ऑल इंडिया साई समाजाच्या जागेत व समाजाच्या २३ व्या अधिवेशनप्रसंगी डॉ. पी. विठ्ठल या साईभक्तांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली हे विशेष होय!

श्री सत्यनारायण पूजेच्या वेळी श्रीविष्णूला तुलसीपत्र वाहाण्यासाठी श्री विष्णू सहस्त्र नामावलींचा उपयोग करतात. त्याप्रमाणे सद्गुरू साईबाबांच्या पूजेच्या वेळी किंवा साईसत्यनारायण पूजा किंवा श्री साई उदी गंगा पूजनाच्या वेळी या श्रीसाईसहस्त्र नामावलीचा अवश्य उपयोग करावा. या नामावलीतील सर्वनामे जाड टाईपात व एकाखाली एक दिलेली असून ती लहान-मोठ्यांनाही वाचण्यास सहज-सुलभ अशी आहेत. या सहस्त्र नाम जपाचे फलही सोबत देण्यात आलेले आहे. प्रत्येक साईभक्ताने ही सहस्त्रनामावली आपल्या संग्रही ठेवून तिचा दिवसाकाठी निदान एकदा तरी उपयोग करावा अशी शिफारस आहे.



संपादकीय

# रामनामाचे महत्व

प्रिय साईभक्तांनो,
स.न. वि.वि.

तुमच्या लाडक्या, आवडत्या अशा श्रीसाईलीला मासिकाचा हा ६६ व्या वर्षाचा पहिला अंक तुमच्या हाती देण्यात नेहमीप्रमाणे आनंद होत आहे. गेली ६५ वर्षे या मासिकाने साईभक्त वाचकांची मराठीतून भरपूर सेवा केली आहे. यापुढेही प्रदीर्घ कालपर्यंत ही सेवा हेच मासिक करीत राहिल, यात शंकाच नाही. साक्षात् श्रीसाईबाबांचा वरदहस्त या मासिकावर आहे आणि म्हणूनच छातीठोकपणे हे सांगत आहे. जिथे बाबा पाठीराखे आहेत तिथे कुणालाच भिती वाटायला नको मग या मासिकाच्या पाठीशी तेच स्वतः आहेत मग ते बंद पडण्याची अजिबात काळजीच सोडा.

या मासिकाच्या वर्गणीदारांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. तहहयात वर्गणीदार होण्यासाठी पण भरपूर गर्दी व सारखी भक्तांची विचारपूस होत असते. जितके सोयीचे होईल तितके जास्तीत जास्त आम्ही भक्तांसाठी अविरत सेवा करीत आहोत याबद्दल वाचकांनी खात्री बाळगावी व कित्येकदा काही गैरसोयी होत आहेत, अंक दरमहा वेळेवर न मिळाल्याच्या तक्रारी येत आहेत, याबाबतही आता आपली अधिकाधिक सोय कशी करता येईल याकडे सर्वांचे लक्ष केंद्रीत झालेले आहे.

साईभक्तांनो, हा अंक आपल्या हाती पडत असतानाच रामनवमी हा उत्सव साजरा करण्यात तुम्ही दंग असाल होय ना! शिरडीत तर स्वतः बाबांनीच हा उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली.

शिर्डीत रामजन्मोत्सव शके १८३३ मध्ये बाबांनी सुरु केला. हा सुखद सोहळा त्यांनी स्वतः सात-आठदा बघितला व आपल्या पश्चात्ही सर्वांच्या कल्याणास कारणीभूत होणारा हा सोहळा चालू रहावा अशी त्यांनी व्यवस्था लावून दिली . लोक कल्याणासंबंधीची बाबांची ही भावना आपण समजावून घेतली पाहिजे. बाबांनी सुरु केलेला हा रामजन्मोत्सव शिर्डीत दरवर्षी अतीव उत्साहाने साजरा केला जातो.

भक्तांनो, वाल्मिकी रामायण हा महान ग्रंथ भारतीयांनाच नव्हे तर जगातील सर्व राष्ट्रांतील जनतेला सदा सर्वकाळी आदर्शवत् होऊन राहिलेला असा ग्रंथ हा आहे. रामकथाही आदरणीय व अनुकरणीय अशी जीवन गाथा आहे. या ग्रंथाचा रचना काळ हजारो वर्षापूर्वीचा असला तरी त्यातील जीवनमूल्ये सर्वकाळातील स्त्री-पुरुष, पिता-पुत्र, पती-पत्नी, बहिण-भाऊ, माता-पुत्र, माता-कन्या, सेव्य-सेवक, गुरु-शिष्य, राजा-प्रजा या सर्वांनी एकमेकांशी कसे काय वागावे याचा उच्चतम आदर्श या ग्रंथातील विविध पात्रांच्या रुपाने जगापुढे ठेवण्यात आलेला आहे. या जगात प्रत्येकाने आपले जीवन

सर्वोत्कृष्ट रीतीने कसे घालवावे व जगात सर्वांकडून भलेपणाचा बहुमान कसा मिळवावा हे रामायण काव्याच्या रुपाने वाल्मिकी महर्षींनी आपणास सांगितले आहे. त्यात प्रत्येकासाठी बहुमोल जीवनमंत्र सांगण्यात आलेला आहे. जगातील कोणत्याही वाङ्मयात अशा प्रकारची श्रेष्ठ कलाकृती निर्माण झालेली नाही. यात अजिबात अतिशयोक्ती नाही.

राम कथा अतिशय रसाळ आहे. तिची गोडी अवीट आहे. या कथेचा एखादा बिंदू जरी प्राशन करता आला तरी तो आपल्या कल्याणास कारणीभूत होणारा आहे.

मर्यादारुपी पुरुषोत्तम प्रभू रामचंद्राचे महात्म्य संत चूडामणि भगवान श्रीसाईबाबांनी बरोबर ओळखले होते. जनता सर्वत्र सुखी व्हावी, भारतात व जगात सगळीकडे आबादीआबाद, सुखसमाधान व प्रेमभाव वाढत रहावा हीच बाबांची मनिषा होती व त्यासाठीच तर त्यांचा अवतार! रामनामाचे तारक व पोषक महत्व बाबांनी अचूक ओळखले होते. जनमनावरील रामनामाची पकड बाबा बरोबर ओळखून होते आणि म्हणून तर त्यांनी आपल्या हयातीत शिरडीत रामनामाचा उत्सवाचा सुखद सोहळा सुरु केला.

रामनामात अजब सामर्थ्य आहे. ते तुम्ही नित्य गोडीने घेऊ लागलात की ते तुम्हाला अधिकाधिक घ्यावे असे वाटू लागेल.

"हरेराम हरेराम रामराम हरे।
हरेकृष्ण हरेकृष्ण कृष्णकृष्ण हरे हरे।।"

या रामनामात संजीवनी आहे. त्यातील गोडी हळूहळू तुमच्या प्रत्ययास येऊ लागेल. मात्र हे नामस्मरण भक्तीभावपूर्वक झाले पाहिजे.

जेथे रामनामाचे गर्जन। फिरे तेथे विष्णूचे सुदर्शन
कोटी कोटी विघ्नांचे निर्दाळण। दीन संरक्षण नाम हे

असे रामनामाचे असाधारण महत्व आहे. सतत रामनाम स्मरणाने व त्या ध्यासाने तुमची वृत्ती तुम्हालाच न समजता पालटत जाते, तुम्हाला देहाचे स्मरण राहिनासे होते, तुम्ही अक्षरशः तद्रूप होऊन जाता आणि मग

ऐसे सुख कधी लाहता होईन। अवघे देखे जग ब्रम्हरुप

अशी परमोत्कर्षाची स्थिती तुमच्या वाट्यास येऊ लागेल. रामनामसंकिर्तनामुळे तुमच्या मनाचा झरा मोकळा होतो. त्याच्या कारणांतून चौफेर प्रकाश किरण फाकू लागतात. तो सतचित् व आनंदमय होतो. तुमची दृष्टी दिव्य बनते आणि मग सारे जग त्या दिव्य चष्म्याने तुम्ही पाहू लागता.

तेव्हा साईभक्तांनो, साईप्रेमींनो, रामनामाच्या आवाजावर, स्मरणावर आपले सारे लक्ष केंद्रीत करण्याचा कसून प्रयत्न करा. एकाग्रता संपादन करण्याचा तो सर्वोत्तम मार्ग आहे. तो आवाज हेच देवाचे, परमेश्वराचे, साईचे प्रतिक आहे असे समजा. हळूहळू रामनाम संकीर्तन करीत राहिल्याने तो तुमच्या रक्तात भिनून जाईल. देवाची, परमेश्वराची म्हणजेच श्रीसाईची आठवण अशी सहाजिक व सतत होऊ लागली म्हणजे पूर्ण एकाग्रता तुमच्या वाट्यास येईल आणि मग सैरावैरा धावण्याचा जो मनाचा गुण त्याला नक्कीच खीळ बसेल, आळा बसेल अशी ही अत्यंत महत्वाची साधना आहे. रामनाम संकीर्तनाची

जादू काय वर्णावी? जेथे काळोख असतो तिथे प्रकाश येतो. जेथे दुःख असते तिथे सुख येऊ लागते. जेथे असमाधान वावरत असते तेथे समाधान नांदू लागते. दुःख ताप असतो तेथे सुख खेळू लागते. जेथे गोंधळ माजलेला असतो तेथे शांतता दिसू लागते. जेथे मरणकळा आलेली असते तिथे चैतन्य दिसू लागते. जेथे नर्क वाटत होता तेथे स्वर्गाचे साम्राज्य नांदू लागते. जेथे माया होती तेथे भगवंत दिसू लागतो आणि जो कुणी भगवंताच्या नावाचा आश्रय घेतो, त्याला दुःख, ताप, भोग भोगावे लागणार नाहीत. त्याला चिंता रहात नाही. तो संपूर्णपणे शांततेने वावरु लागतो.

तेव्हा चला या रामनवमीच्या शुभमुहूर्तावर रामनामाचे नित्य स्मरण घेत रहा.

जय साईराम! जय साईराम!

# शिर्डीची ओढ

प्रिय भक्तांनो आज सांगते।
माझ्या गुरुची किमया गाते॥
भाव भक्तिची गंगा वाहे।
शिर्डी नगरी जाऊन पाहे॥ १॥
अबाल तरुण जमले सारे।
आरती करिती एक मुखाने॥
धन्य शिर्डी धन्य बाबा।
तेथे नाही भेद भावा॥ २॥
पहाटेच्या भूपाळ्याने।
मन हे डोलते आनंदाने॥
त्या आनंदी वातावरने।
दिवस जातो वाऱ्यासंगे॥ ३॥
अभिषेकाचा आनंद भारी।
समाधी चढण्या मन उल्हासी॥
सुख दुःख सांगते बाबा पाशी।
समाधान हे वाटे मनाशी॥ ४॥
निरोप घेता शिर्डीचा तो।
मन न परते गांवी येण्या॥
माझे बाबा सांगती तेव्हां।
मुली मी आणिन गुरुपौर्णिमेस॥ ५॥

**— सौ. निर्मला चं. मालवणकर**
साईस्मृति, दादर.

# श्री साईनाथांचा शरणार्थी- (२१)

**लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद**
**अनुवादक : वि. बा. खेर**

(पुढील दोन—तीन लेखात डिसेंबर १९१६ ते १९१८ पर्यंतच्या काळातील पारमार्थिक अनुभव देण्यात येतील.)

एकदा सकाळी सुमारे नऊ-दहा वाजता मी फिरत असता मला आवाज ऐकू आला, 'हे आपले शेत आहे. बस व येथे काम कर.' मी तेथे बसलो. कोणीतरी नांगर फिरवत होता व काहीजण बी पेरत होते. हे मी उभे राहून पाहिले परंतु नांगर धरण्याचे ज्ञान नसल्यामुळे काय करावे ते सुचेना. असा तेथे बसलो असता सकाळच्या न्याहरीसाठी डोक्यावर भाकऱ्यांचे टोपले घेतलेल्या एका नोकराला घेऊन फकीरबाबा आले. फकीरबाबा शेतात बसले व नोकराला बसवून त्याला भाकऱ्या खायला दिल्या, स्वतः खाऊ लागले व भाकरी हातात घेऊन मला म्हणाले, 'घ्या.' परंतु मी चुस्त ब्राह्मण, मी कसला घेतो?मी काही बोललो नाही व भाकरी पण घेतली नाही. तेव्हा फकीरबाबा म्हणाले, "काही हरकत नाही, तुमची व्यवस्था सगुणरावांकडे करीन." मी त्यालासुद्धा काही उत्तर दिले नाही. मला तर अशा काही व्यवस्थेची कुठे जरूर होती? या नंतर परत केव्हा त्यांची अशी खास भेट झाली नाही व त्यांनी सुद्धा मला परत कधी विचारले नाही की तुमची जेवण्याची काय सोय आहे. कदाचित त्यांनी तपास केला असावा व त्यांना समजले असावे की माझी व्यवस्था राधाकृष्णआई तसेच काकासाहेब दीक्षित करतच असत.

मी शिरडीत अकरा महीने (१९१३ साली) राहिलो त्या वेळची गोष्ट. एका रात्रीच्या पहल्या प्रहरी माझ्या खोलीच्या बाहेरच्या ओट्यावर मी बसलो होतो. तेवढ्यात बाबांपाशी राहिलेला एक वीतरागी, उघड्या शरीराचा एक पुरूष (जे साकोरीचे उपासनी होते असे पुढे त्यांची ओळख झाल्यावर समजले.) मला म्हणाला, "हे बाबा मला म्हणतात 'तू रमजान पाळ, मुसलमान जसे रोजा राखतात तसा राख.' हे ऐकून मला वाटले की मी काय मुसलमान आहे की मी रोजा राखू?" त्या काळी माझी त्यांची (उपासनींची) ओळख नव्हती म्हणून मी त्यांचे म्हणणे फक्त ऐकून घेतले परंतु काही बोललो नाही; 'हुं' सुद्धा म्हटले नाही. पण त्यावेळी मात्र मला असे वाटले की हा माणूस माझ्या बाबांवरच्या श्रद्धेला तडा पाडण्याचा प्रयत्न करीत आहे व म्हणून त्यांच्या बोलण्याकडे बिलकुल लक्ष दिले नाही. नंतर मी या रोजाचा अर्थ 'नक्त भोजन' — रात्रीचे जेवण — असा केला व आपल्या हिंदु शास्त्रानुसार असे भोजन पापक्षयकारी तसेच पवित्र मानण्यात येते, हे ओळखले. उपासनींचा नंतर परिचय झाल्यावर समजले की सुरूवातीची काही वर्षे ते स्वतः दिवसा थोडीशी कॉफी किंवा असे काही पीत व रात्री नैवेद्य जाई त्यातून खात अथवा तयार करवून अर्धीच भाकरी खात.

काही कारणाशिवाय, काही दुःख नसताना मी एकदा मुंबईहून शिरडीस एका दिवसासाठी गेलो व आरतीच्या समयी चामर घेऊन उभा असता माझ्या डोळ्यांतून एक सारख्या

अश्रुधारा अर्धा-पाऊण तास चालल्या होत्या. एका गुरुपौर्णिमेच्या दिवशी मी बाबांच्या पायांना चंदन लावले व कपाळाला चंदन लावण्याचे राहून गेले. पूजा करणाऱ्यांमधे मी बसून माझ्या पाळीची वाट पाहत असताना सुद्धा पुष्कळ वेळपर्यंत माझ्या डोळ्यांतून अश्रु वाहत होते. हे पाहून तात्या पाटील म्हणाले, 'रडू नका, घ्या तुम्ही पूजा उरकून.' त्यांना काय माहिती की पूजा करण्याची माझी पाळी येत नव्हती म्हणून मी अश्रु ढाळत नव्हतो. हा अश्रुप्रवाह कशाने चालू होता ते मला पण समजले नाही. परंतु नंतर एका पुस्तकाच्या वाचनाने समजले की पापक्षालनाचा हा एक प्रयोग महात्मे आपल्या भक्तांवर करतात. या अश्रु ढाळण्याने भक्ताचा आत्मा शुद्ध होतो.

मी शिरडीला प्रथम बाबांच्या दर्शनास जाऊन दहा दिवस तेथे राहून परत फिरलो तेव्हा मला खबर पडली की माझा मित्र कान्तिलाल नानाभाई देसाई, जो विल्सन कॉलेजात बी.ए. च्या वर्गात शिकत होता व कॉलेजच्या विद्यार्थीगृहात राहत होता, त्याने बॅप्टीझम स्वीकारला आहे. कान्तिलालचा व माझा फार जुना परिचय होता. मी एल्.एल्.बी.च्या परीक्षेत उत्तीर्ण झालो त्या वर्षी, म्हणजे १९११ साली, तो मुंबईला आला आणि विल्सन कॉलेजात सीनियर बी.ए. मध्ये दाखल झाला आणि कॉलेजच्या मिशनरी संचलनाखाली चालत असलेल्या वसतिगृहात राहिला. तेथे त्याचा या मिशनरीशी समागम वाढला व त्या मिशनरीशी त्याने माझी ओळखसुद्धा करून दिली. आमची दोघांची मैत्री बघून त्या मिशनरीने मला एक सुरेख — त्या काळी सर्वांना मान्य झालेले — बायबल भेट म्हणून दिले आणि आम्ही दोघाजणांनी त्या मिशनरी जवळ परिक्षेनंतर बायबल शिकण्याचे नक्की केले. माझी परीक्षा झाली व कान्तिलालची सुद्धा बी.ए. ची परीक्षा संपली असावी. आम्ही एका रविवारी त्या मिशनऱ्याकडे जाण्याचे नक्की करणार होतो. दरम्यान तो मिशनरी कान्तिलालला आपल्या जाळ्यात घट्ट पकडण्याचा प्रयत्न करत होता. तो कान्तिलालला जेवायला बोलवी, नोकरी मिळवून देण्याची लालूच दाखवी, मुलींबरोबर ओळख करून देई व त्याचे लग्न करून देण्याची आशा पण चित्तात निर्माण करी. अशी वस्तुस्थिती होती. त्याच सुमारास मला प्रथमच शिरडीला जाण्याचे माझ्या वडिलांनी सांगितले व जाण्याची सोय करून दिली; चांदोरकरांची त्यांच्या बंधुवर चिठ्ठी वगैरे आणवून माझी जाण्याची त्यांनी व्यवस्था केली व मी शिरडीला गेलो. तेथे पूर्वी वर्णन केल्याप्रमाणे आठ दहा दिवस राहून परत आलो, तेव्हा मला कान्तिलालचे वडील नानाभाईंचे कार्ड मिळाले की कान्तिलालने बॅप्टीझम घेतला व तो खिश्चन झाला आहे. नंतर हे पिता-पुत्र मला भेटले. कान्तिलालला मी विचारले, "तू काय बघून बॅप्टीझम स्वीकारलास? आपल्या धर्मात तुला काय कमी भासले व त्यांच्या धर्मात काय अधिक आढळले की म्हणून तू धर्मांतर केलेस?"

नंतर मी त्याला भगवद्गीतेची आठवण करून त्यातील काही सांगितले. कदाचित तिसऱ्या अध्यायातील तसेच अठराव्या अध्यायातील श्लोक असावेत :

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।। (३-३५)

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ।। (१८-४७)

भावार्थ :— स्वधर्म कठीण असला आणि परक्याचा धर्म सोपा असला तरी स्वधर्म परधर्माहून श्रेयस्कर होय. स्वधर्मामध्ये मरण आले तरी ते श्रेयस्कर समजावे. परंतु परधर्म भयावह आहे. (३-३५)


विगुण (सदोष) असा स्वधर्म, चांगले अनुष्ठान केलेल्या (बरवा दिसणाऱ्या परधर्माहून) श्रेयस्कर आहे. स्वाभाविक कर्म करणाऱ्यास पापाची भीति नाही. (१८-४७)

या श्लोकांची माझ्या मनावर जी गहन छाप पडली होती त्यावरून मी त्याला म्हणालो, ''गीताई अशा धर्मांतराविरूद्ध आहे.'' तेव्हा कान्तिलाल म्हणाला, ''आपल्या धर्मात गीतेसारखा ग्रंथ आहे हे मला माहित सुद्धा नाही.'' यानंतर त्याचे वडील नानाभाई त्याला आपल्या गावी पेटलादला घेऊन गेले व तेथे कान्तिलाल मृत्यू पावला. त्यायोगे माझे अंतःकरण व्यथित झाले; मला फार दुःख झाले. याच सुमारास महादेवभाई देसाईनी आपले वडील हरीभाई यांचा व माझा परिचय करुन दिला, त्यांना माझ्या येथे सांताक्रुझच्या बंगल्यात घेऊन आले तेव्हा त्यांना माझा मित्र कान्ति बाटून खिश्चन झाल्याचे वृत्त सांगितले. त्यांच्यापाशी माझी हृदयव्यथा व्यक्त केली तेव्हा वेदांताचे अभ्यासी हरीभाई म्हणाले, ''कोण बाटला? आत्मा कधी बाटतो? हा तर ज्याच्या त्याच्या मान्यतेचा विषय आहे.'' याने माझे दुःख कमी झाले नाही. पहिल्यापासूनच मी धर्माभिमानी. त्यातून माझ्याच मित्राला एक पाद्री स्वधर्म सोडण्यास प्रवृत्त करू शकला ही तर माझ्यासाठी शरमेची गोष्ट तर खरीच असे मला वाटे. आणि नंतर कान्ति मरण पावल्याचे वृत्त ऐकून तर माझी व्यथा वाढली. सुधारलेल्या, सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या नागर ज्ञातीच्या युवकाला भगवान श्रीकृष्णाने आपल्या धर्मासाठी ठेवलेल्या भगवद्गीतेसारख्या अमुल्य वारशाचे अज्ञान असावे हे केवढे आश्चर्य! अशा रीतीचे अज्ञान गुजराथमध्ये ठिकठिकाणी व घरोघरी असावे, व ते कोठल्याही रीतीने दूर झाले तरच या खिश्चनांची बाटविण्याची प्रवृत्ति काही अंशी कमी होईल अशी माझ्या मनाची भावना झाली. काय भारतभूमीच्या रहिवाशांना भगवद्गीतेच्या अस्तित्वाची पण जाणीव नाही! माझी धर्माभिमान-स्वदेशभिमानाची भावना हे कसे सहन करणार? हे लिहिताना मला वाटते की वरील प्रसंगात बाबांनी अंतरिक्षातून विष्णुबुवा ब्रम्हचारींचे नाव सुचवून त्यांच्या भगवद्गीतेवरील टीकेची यासाठी सूचना केली असेल. कारण त्यांच्या जीवन चरित्रावरून मला समजले की हे विष्णुबुवा ब्रम्हचारी चौपाटीवर एका स्टूलावर किंवा टेबलावर उभे राहून भाषणे करीत. त्या भाषणांतून ते खिश्चन मिशनरी खिस्ती धर्माच्या प्रचारासाठी तेथेच भाषण करीत, त्यातील त्यांचा युक्तिवाद किती पोकळ आहे हे दाखवून हिंदुधर्माची सत्यता-नित्यता वगैरे अत्यंत ज्वलंत शब्दात ते सिद्ध करून दाखवत.

मी जेव्हा शिरडीला होतो त्या दरम्यान कान्तिने परधर्म स्वीकारल्याची खबर नव्हती, परंतु बाबा सर्वज्ञ असल्यामुळे त्यांना माझ्या परम मित्राच्या धर्मान्तराने माझ्यावर होणाऱ्या आघाताची जाणीव होती, आणि म्हणूनच त्यांनी मला विष्णुबुवा व त्यांची पुस्तके

पाहण्याची अंतरिक्षातून सूचना केली हे आज (१५-७-५९) मला स्पष्ट होत आहे. यावरून मला विचार सुचला की भारतभूमीतील युवकांचे भगवद्गीतेच्या अस्तित्वाचे अज्ञान टाळण्यासाठी भगवद्गीतेचे काही मौलिक सिद्धांत त्यांच्यासमोर ठेवण्यात आले तर त्यांचे अज्ञान दूर होऊन भरतखंडाच्या सर्व दिशांना ज्ञान पसरेल. जणु काय ह्या विचाराचा बाबांनी पुरस्कार करून १९१६ मधे जेव्हा जेव्हा बाबा मला अंतरिक्ष वाणीने बोध देत तेव्हा मला 'पार्था' असे संबोधत व भगवद्गीतेच्या सिद्धांतांचा गूढ अर्थ सांगत. याने मला संतोष झाला की बाबा भगवद्गीतेचा स्वमुखाने उच्चार करत आहेत त्या अर्थी आता स्वदेशात भगवद्गीतेची चौफेर प्रसिद्धी होईल, आणि बी.ए. पर्यंत पोचणारा किंवा पास झालेला पदवीधर युवक भगवद्गीतेविषयी अजाण तर राहणार नाही. कान्तिचा जो आघात १९११ साली मला झाला तो बाबांच्या या कृतीने १९१६ मधे दूर झाला. पूज्य स्वामी श्री विद्यानंदजींचा भगवद्गीतेचा प्रचार त्यानंतरच गुजराथमधे सुरू झाला. स्वामीजींचे प्रथम प्रवचन बोरडी मिलमध्ये या नंतरच झाले व त्याला मी उपस्थित होतो.

एके दिवशी दुपारी दोन-तीन वाजता या सुमारास मी बाबांकडे गेलो तेव्हा बाबा धुनीच्या मागील भागात उत्तराभिमुख होऊन शिरावर लाल रेशमी फुल्याफुल्यांचा रूमाल बांधून बसले होते. ते स्वतः काहीच बोलले नाहीत, पण माझ्याकडे बघून जणु काय म्हणाले, 'मी मुंबईला जात आहे-तुझी खबर पोचविण्यास,' असा मला भास झाला. या गोष्टीला शिरडीत मी त्यावेळी काहीच महत्व दिले नाही, परंतु नंतर जेव्हा मी विलेपार्ल्याला गेलो तेव्हा माझी मोठी बहीण मला म्हणाली की त्याच सुमारास लाल ब्लँकेट शरीरावर ओढलेला एक फकीर दुपारी तिच्या घरी आला व म्हणाला 'तुझा भाऊ कुशल आहे? त्याने अक्षता-कुंकु मागवून घेतले व तिला व तिच्याजवळ उभ्या असलेल्या शेजारणीला दिल्या व म्हणाला, 'या पुड्या अमुक दिवशी उघडून बघा म्हणजे माझ्या सच्चाईची खात्री पटेल!' थोड्या दिवसांनी सांगितल्याप्रमाणे पुड्या उघडल्यावर अक्षतांच्याऐवजी दोघींच्या हाती सोन्याचा एक एक तुकडा आला त्यावरून खात्री झाली की असा चमत्कार दाखविणारे साईबाबाच होते. यानंतर मी तिला माझा दुपारचा वरील अनुभव सांगितल्यावर तर माझी बहीणसुद्धा समजली की बाबा स्वतःच तिची माझ्याविषयी वाटणारी चिंता दूर करण्यासाठी आले होते.



# श्री साईंचे सत्य चरित्र — अध्याय १७ वा

## ब्रम्हज्ञान कथन — २

गद्य अनुवाद — ले. कर्नल मु.ब. निंबाळकर
(निवृत्त)
१/१४, फाईव्ह स्टार अपार्टमेंट्स,
बंड गार्डन रोड, पुणे-४११ ००१.

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरु महाराजानां नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्गुरु साईनाथांना नमस्कार असो.

गेल्या अध्यायात वचन दिले होते की या अध्यायात श्रेय (उत्कृष्ट नीतिपूर्वक सदाचार) व प्रेय (आवडणारे सुखावह आचार) यांच्या लक्षणांचे निरुपण होईल. ते आता आदरपूर्वक श्रवण करावे. प्रकाश आणि अंधःकार दिसायला एकमेकांवर अवलंबून दिसले तरी ते जसे एकमेकांपासून भिन्न आहेत तसेच श्रेय व प्रेयही आहेत. प्रेयाकडे ज्याचे मन धाव घेते तो स्वार्थापायी पतित होतो. श्रेय हे विवेकरुप आहे व प्रेय अविवेक रुप आहे. श्रेयाचा विषय केवळ विद्या आणि प्रेयाचा निव्वळ अविद्या. प्रेय कधी शहाण्याला भुलवीत नाही व श्रेय अज्ञानी जनांना आवडत नाही. जोवर कनक (सोने) व कामिनी (स्त्री) यांची ओढ आहे, इंद्रियांना विषयांची आवड आहे आणि विवेक व वैराग्य जोडलेले नाही तोवर प्रेयच गोड वाटते. पाणी व दुध जसे एकत्र मिसळलेले असते तसेच प्रेय व श्रेयही एकत्र गुंतलेले असतात. जसे मानस सरोवरात हंस दूधच तेवढे वेगळे करुन पीतात तसे दृढनिश्चयी, बुद्धीमान्,विवेकी व भाग्यवान माणसे श्रेयाकडेच आसक्त असतात व प्रेयाकडे सदा पाठ फिरवितात. परंतु तेच मंदबुद्धीचे लोक पहा! शरीर,पशु, पुत्र , धन, मान वगैरे योगक्षेमाच्या नादी लागून फक्त प्रेयच साधतात. श्रेय काय आणि प्रेय काय जरी दोन्ही समजले तरी मनुष्यप्राणी बुद्धीने स्वतंत्र असल्याने त्यालाच यातून कोणते पसंत करायचे हे ठरवायचे असते. दोन्ही पुढे असल्यावर त्याची निवड करणे अवघड आहे. कारण त्याच्या मंद बुद्धीवर विजय मिळवून प्रेयच त्याला चिकटते. प्रेय बाजूला सारून श्रेयाचा आदर करणे हाच तो पुरूषार्थ होय. पाण्याने भेसळलेले दूध असले तरी हंस दूधच तेवढे घेतो. श्रेय आणि प्रेय ही दोन्ही जरी पुरूषाचे स्वाधीन असली तरी विवेक नसलेला मंदमती पुरूष याचा उहापोह करण्यास समर्थ नसतो. श्रेय कशात आहे हे प्रथम निश्चित जाणले पाहिजे, नंतर त्याच्या मार्गात जे अडथळे येतील त्यांचे संपूर्णपणे निवारण करण्याचे उपाय योजिले पाहिजेत. येथेच पुरूषार्थ दृष्टीपुढे दत्त म्हणून छाती ठोकून उभा राहतो. म्हणून बुद्धीचा पक्का निश्चय करून श्रेयप्राप्त करण्यासाठीच झटा. (ओ. १-१४)

संसार चक्राचे भ्रमण अतर्क्य आहे. ते अखंड अष्टौप्रहर फिरत असते. त्यात माणूस आध्यात्मिक (मनापासून होणारा म्हणजे ताप येणे, हाड मोडणे, क्रोध,चिंता वगैरे मुळे

दुःखी होणे वगैरे) आधिभौतिक (पंचमहाभूतांपासून होणारा म्हणजे चोर, साप वगैरे) आधिदैविक (देवांपासून होणारा म्हणजे अतिवृष्टि, दुष्काळ पडणे) असा तीन प्रकारचा प्रखर व निवारण्यास कठीण असा ताप (दुःख) सहन करीत असतो. त्यामुळे अत्यंत दुःखाचा कळस सहन करून जर्जर झालेला तो ते निवारण्याची सोपी सुखकर साधने शोधू लागतो. संसार चक्राचे हे भ्रमण सहन करायला कठीण आहे. हे कसे थांबविले जाईल? त्यासाठी काही साधन असेल का? याचा शोध (अन्वेषण) तो करू लागतो. थोर भाग्याने अशी बुद्धि उपजली की तेथून पुरूषार्थाचा उदय होतो आणि मग तो पुरुष आपल्या हिताचे योग्य उपाय साधणारा होता. अनादि अशी अविद्या किंवा माया शिंपल्यावरच्या रुप्यासारखी आणि मृगजळातील पाण्यासारखी निकामी आहे. तिच्या अध्यासरूप (खोटा भास रूप) मोठ्या अडथळ्याचा नाश केला पाहिजे. स्वप्नांत सोन्याच्या गारांचा पाऊस पडतो. वेळी कामास येतील असे वाटून त्या प्रयत्नपूर्वक खूप गोळा केल्या तरी जागे झाल्यावर त्या हरवून जातात. दिसणाऱ्या व न दिसणाऱ्या (देखील) विषयांच्या भोगांची वासना असणे किंवा आशा, तृष्णा (तहान) वा इच्छा असणे ही सुद्धा विघ्ने आणतात म्हणून त्यांना मुळासकट खणून काढा.

जे सूर्यप्रकाशाने दिसण्यास अशक्य, जेथून बुद्धि माघारी फिरते व जेथे वेद व श्रुतीचे पाऊलही शिरत नाही (त्यांना वर्णन करता येत नाही) असे ते ब्रह्म गुरु स्वतःच्या (नुसत्या) हाताने दाखवितात. काम व क्रोध या दोन वृत्ति ज्ञानाची प्राप्ती होऊन देत नाही. श्रवण, मनन व समाधि यांचा त्या हातोहात भंग करतात. दीवा व कापूर यांचा समागम झाला कीं एकमेकांची ढकलाढकली शक्य होईल काय? उभयतांची भेट होण्याची खोटी की कापूर दीवाच होऊन जातो. श्रुति व स्मृतिला जे त्याज्य त्या दुष्कर्मात जो सदा लोळत असतो व ज्याला योग्य व अयोग्य कर्म कळत नाही तो ज्ञानी असून स्वतःचे कोणते हित साधेल? तसेच जो नेहमी अशांत असून ज्याचे अंतःकरण अस्वस्थ आहे व इंद्रियांच्या लाडाने ज्याचे चित्त क्षुब्ध आहे तो ज्ञानाने परिपूर्ण होऊ शकत नाही. ज्याचे चित्तास समाधान आहे, जो गुरूचा शिष्य सदाचारी आहे, ज्याचे आत्म्यावरील ध्यान निश्चल आहे तोच एक ज्ञानसंपन्न होय. (ओ. १५-२७)

संसारात असो किंवा मोक्ष मिळविण्याच्या खटपटीत असो शेवटी तर स्वस्थानीच (ईश्वराकडेच) जायचे असते. शरीर रूपी रथाचा मालक हो. नुसता शब्दच्छल करणारा काय करणार? येथे नुसत्या बडबडण्याला थारा नाही. अभ्यास हेच खरे सार आहे. शरीराला रथाच्या ठिकाणी लाव व तू त्यात स्थिर बैस. या स्वतःच्या शरीराच्या रथाचा आपल्या बुद्धिला सारथी कर व स्वतः मालक होऊन रथात स्वस्थ चित्ताने बैस. मग विषयांच्या अनेक मार्गांची बिकट परंपरा ओलांडायला सारथ्याला सांग आणि मनरूपी लगामाने दहा इंद्रियरूपी उच्छृंखळ घोड्यांना आवरायला लाव. घोडे जरी सैरावैरा धावले तरी लगाम त्यांना आपल्या जागी ठेवील. अशी ती लगाम सारथ्याच्या हातात सोपून तू खुशाल स्वस्थ चित्ताने बैस. सारथी कुशल व निपुण असला तरच घोडे कसून चालतात. परंतु तोच मनरूपी लगामाच्या आधीन असला तर ते शक्तिहीन होतात

(चालू शकत नाही.). जेथे विवेकरूपी बुद्धिचे सारथ्य असते, ज्याचा मनावर ताबा आहे (समनस्क) व ज्याचे चित्त एकाग्र झालेले (समाहित) आहे त्यालाच परमपद प्राप्त होते. इतर लोक मार्गातच थकतात. ज्याचे मन सदा ताब्यात नसते, ज्याला कधी समाधान नसते तो त्या पदापर्यंत पोहोचतच नाही व त्याला संसाराचे फेरे चुकत नाहीत. ऐसे ते मोठे परमपद आपण होऊन जसेच्या तसे प्रकट होते व ते कुठे आहे या विषयीची मनाची शंका फिटते. (ओ. २८-३६)

येथे तर्कवाद (युक्तिवाद), अनुवाद (स्पष्टीकरणासाठी पुनरावृत्ति), प्रवाद (अफवांची बोलणी) किंवा संवाद (सल्लामसलत) चालत नाही. येथे ईश्वरकृपेनेच दाद लागते. वादांचा काही उपयोगच होत नाही. येथे तर्काची चतुराई (शहाणपणा) चालत नाही. तर्क जाणणाऱ्याची मति कुंठीत होते. भोळा भावच सिद्धीस जातो. हीच येथली नवलाई आहे. उत्तम ज्ञानाला जे मूळ त्याची वाटचालच वेगळी व ती बुद्धिही वेगळी. आणि ते उत्तम ज्ञान देणारा शास्त्रज्ञही वेगळाच असतो हे जाणावे. अमूल्य हे शरीर वाया चालले आहे, धनाची तृष्णा ही दुपारच्या सावलीसारखी फार टिकणारी नाही व हरीची माया पार करायला अवघड आहे हे सर्व जाणून संतांच्या पायी लागावे. संत हे संसाररूपी सागराची नाव आहे. त्यातील तू एक उतारू हो. त्यांच्या शिवाय पलीकडे नेण्याला कोण समर्थ आहे? विवेक व वैराग्य या जोडीला जो जुंपील तो जड, मूर्ख किंवा दगड असला तरी त्याला संसाररूपी सागर अवघड नाही. भगवंताचे ऐश्वर्य सहा गुणांचे आहे. त्यातील 'वैराग्य' हे खरोखर पहिले ऐश्वर्य आहे. जो महा भाग्यवान् आहेत त्यांच्याच वाट्याला हे येते, इतरांच्या नव्हे. शास्त्राने योग्य ठरविलेले (विहित) कर्म केल्याशिवाय चित्त शुद्ध होत नाही व जोवर चित्तशुद्धि होत नाही तोवर ज्ञान संपादन होत नाही. म्हणून ज्ञानप्राप्तीचे मूळ कारण कर्म हेच जाणावे. नित्य (रोज करण्याची देवपूजा, उपासना, पंचकर्म वगैरे) व नैमित्तिक (ठराविक वेळी व प्रसंगी करण्याची उदा. वर्षश्राद्ध) कर्मे आचरल्याने (चित्ताचा) मळ धुऊन निघतो. अशा प्रकारे शुद्ध झालेल्या चित्तात विवेक व वैराग्य आणि शम (मनाचा निग्रह), दम (इंद्रियांचा निग्रह), उपरति (बाह्य प्रवृत्तिपासून निवृत्ति, विषयांच्या ग्रहणांची अरूचि), तितिक्षा (दुःखांच्या निवारणाचे उपाय केल्याशिवाय आणि त्यांच्याबद्दल चिंता व पश्चाताप केल्याशिवाय ती सहन करण्याची शक्ती), श्रद्धा आणि समाधान या साधनसंपत्ति उत्पन्न होतात व याच देही मुक्ति प्राप्त होते. फलाच्या इच्छेला व संकल्पाचा त्याग करून व मन एकाग्र करून जो सद्‌गुरूला अनन्यपणे शरण जातो त्याला सद्‌गुरू पदरी घेतो. ज्याने इंद्रियांच्या बाहेरच्या प्रवृत्ति टाकलेल्या आहेत व जो अनन्य व भाविक भक्त आहे तोच ज्ञानामुळे प्रज्ञावान् होतो. दुसरा उपाय चालत नाही. ज्ञान प्राप्त झाल्यावर देखील जर तो अधर्म मार्गाचे आचरण करील तर खाली या पृथ्वीवर (अत्र) किंवा वर स्वर्गात (अमुत्र) न राहता त्रिशंकूसारखा मधेच लोंबकळत राहील. जीवाची जी (आपण शरीर आहोत आत्मा नाही) ही अज्ञानाची वृत्ति तीच संसाराकडे त्याला प्रवृत्त करते. आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर तोच जीव संसारातून निवृत्त होतो. आत्म्याला (खरोखर) जाणणाऱ्याला अहंभाव कधीही नसतो, धर्म किंवा

अधर्म नसतो, शुभ किंवा अशुभ नसते. त्याला या संसारातले हित व अहित काय करायचे? देहाची अहंकार वृत्ति शांत झाली की तेथेच तात्काळ निवृत्ति घर करते व तीच जीवाची परमात्मस्थिती होय, ही खूण निश्चित बांधावी. प्रवृत्तिच्या ठिकाणी शत्रु व मित्र असतात. निवृत्तिचे नवल तर हेच की मीच मी सर्वत्र आहे हे पाहता शत्रुत्त्व किंवा मित्रत्त्व ते कुठले? अशा महासुखापुढे शरीराचे महादुःख ते काय बापुडे? जेव्हा महान् सुख आवडायला लागते तेव्हा ऐहिक (या पृथ्वीवरील) सुखासाठी कोण रडेल? ऐहिक दुःखाचे डोंगर जरी त्यावर कोसळले तरी केवळ धीरावा पर्वतराजच तो लवभरही हालत नाही. भगवंत ज्यावर प्रसन्न होतो त्यालाच मग तो वैराग्य देतो. त्याची विवेकाशी सांगड बांधतो व भवसागर पार उतरवितो. आरशात उमटणाऱ्या चेहऱ्याच्या प्रतिबिंबाप्रमाणे आत्म्याच्या स्पष्ट दर्शनाचा जो हेतु धरतो त्याला ही पृथ्वी (भूलोक) किंवा वरचा ब्रम्हलोक याशिवाय तिसरी जागाच नाही. यज्ञ केल्याने देवतांची तृप्ति झाली की पितृलोकाची प्राप्ती होईल, कर्मफलांच्या उपभोगांचा लाभ होईल, परंतु आत्मज्ञान लाभणार नाही. गंधर्व, महः, जन, तप व सत्य (ब्रम्ह) वगैरे लोकांतील आत्मदर्शन अतिशय अस्पष्ट असते म्हणून ज्यांना आत्मदर्शनाची आसक्ति असते ते भूलोक (या पृथ्वीवरील आयुष्य) भरपूर मागतात, (कारण) येथेच चित्तशुद्धि होते, आरशासारखी निर्मळ बुद्धि लाभते आणि त्यात शुद्ध व पवित्र आत्मस्वरुप प्रतिबिंबित होते. दुसरे स्थान जे ब्रम्हलोक तेथेही आत्मदर्शन होते परंतु अनेक प्रकारचे अतिशय कष्टाचे प्रयत्न करावे लागतात. सापाप्रमाणे माया वेटाळते, आतून आतड्या पीळते व बाहेरूनही सर्व शरीर कवटाळते. तिला टाळण्यास कोण समर्थ आहे? (ओ. ३७-६२)

"तुम्ही खिशात पन्नासपट रुपये असताना बसल्या बसल्या सर्व पाहता? काढा पाहू बाहेर आता. ब्रम्ह तुमच्याच खिशात आहे" असे बाबा त्या ब्रम्हजिज्ञासूला म्हणताच त्याने हात घालून खिशातून पुडके बाहेर काढले व मोजताच त्यात दहादहाच्या पंचवीस नोटा निघाल्या. हे पाहून तो गृहस्थ मनातल्या मनातच विरघळला. केवढे महाराज अंतर्ज्ञानी असे आश्चर्य करीत त्याने बाबांचे चरणांवर मस्तक टेकले आणि आशीर्वचनाची उत्कंठेने वाट पाहू लागला. मग बाबा त्याला म्हणाले, "गुंडाळ आपले ब्रम्हगुंडाळे. लोभाचे वाटोळे झाल्याखेरीज तुला ब्रम्ह मिळणार नाही. पुत्र, पशु वगैरे आणि धन कमावणे यातच ज्याचे मन आसक्त आहे त्याला द्रव्यरूपी विघ्न (व्यवधान) दूर झाल्याशिवाय ब्रम्हज्ञान कुठले? द्रव्याचा मोह फार कठीण. तृष्णारूपी भोवरे असलेला दुःखाचा जणूकाय हा डोहच. मद, मत्सर या मगरांच्या अस्तित्वामुळे सहन करण्यास कठीण. एक निःस्पृहच पार करू शकेल. लोभाशी ब्रम्हाचे अखंड वैर. तेथे ध्यानाला स्थान नाही. मग कुठली मुक्ति व विरक्ति? खरोखर लोभिष्ट माणूस आचार—भ्रष्टच असतो. लोभाच्या ठिकाणी शांति नसते, समाधान नसते व निश्चिंतताही नसते. चित्तांत एक हा लोभ जरी ठाण करून बसला तरी सर्व साधने मातीत जातात. श्रुति व स्मृति यांना असंमत असे जे निषिद्ध (मना केलेले) पापकर्म यांतच जो सदैव आसक्त असतो त्याचे चित्त स्वस्थ नसते. त्यालाच "विक्षिप्त-चित्त" म्हणतात. तो सदा दुष्कर्मात गढलेला असतो, विषयरूपी चिखलांत लोळत असतो व आपले हित व अहित त्याला दिसत नसते. ब्रम्हविज्ञान

(दृश्यमात्राचा लय होऊन एकच अद्वितीय ब्रह्म आहे असा अनुभव) प्राप्त होऊनही ज्याला (कर्म) फलाच्या इच्छेची विरक्ति नसेल तर फुकट त्याचे ब्रम्हविज्ञान. त्याला (खरा) आत्मलाभ झालेला नाहीच . कोणी काही मागावयास आला तर संत प्रथमता त्याचा अधिकार पाहातात व मग जशी ज्याची योग्यता किंवा अयोग्यता असेल तसेच त्याला ते देतात. ज्याच्या मनात रात्रंदिवस देहाचा अभिमान व विषयांचे चिंतन असेल त्याला गुरूच्या उपदेशाचा शीणच की! दोघांच्या इच्छितांची व्यर्थ नासाडीच की! चित्तशुद्धि झाल्याशिवाय जो परमार्थात शिरू पाहतो त्याची ती नुसती ज्ञानगर्वाची मिरवणूक असते. त्यातून काहीच निष्पन्न होत नाही. म्हणून रूचेल (दुसऱ्याला आवडेल) तेच बोलावे व पचेल तितकेच अन्न खावे. नाहीतर व्यर्थ अजीर्ण होईल हे सर्वांना ठाऊकच आहे. माझा भांडार भरपूर आहे. जो जो जे जे मागेल ते ते मी देईन. परंतु घेण्याची शक्ति पाहिजे. मी तर सहन करू शकेल तितकेच देतो. हे जर लक्ष देऊन ऐकाल तर तुमचे कल्याण होईल. या पवित्र मशिदीत बसून मी खोटे बोलत नसतो.'' (ओ. ६३-७९)

ही संतवाक्यरूपी अमृताची जणू काय नदीच, त्यात भावार्थाने (वाक्यांचा अर्थ नीट समजून घेऊन) बुडी देताच अंतर्बाह्य शुद्धता लाभेल व मळ धुऊन निघेल. साई नाथांचा महिमा असा आहे की वर्णन करू जाता सीमाच पुरत नाही. त्या वर्णनाला कसली उपमा द्यावी? बाबा शुद्ध प्रेमाच्या आधीन आहेत. ते सगळ्यांचे 'माऊली' (माता) आहेत, दुःखाने पिडलेल्यांचे व कष्टाने थकलेल्यांचे विश्रांति स्थान आहेत. आश्रितांचे कल्पवृक्ष आहेत व दीनदुबळ्यांची छाया आहेत. संसारावर पाणी देऊन, पर्वतांत व रानांत मौन धरून, एकांतवास स्वीकारून स्वतःच्याच कल्याणासाठी दक्ष असणारे संत पुष्कळ असतात. ते केवळ आपला स्वार्थ व परमार्थ साधतात. त्यांना इतरांची काय पडलीय? परंतु साईबाबा तसले संत नव्हते. आप्तेष्ट व गणगोत नसताना आणि घरदार व स्त्रीपुत्र नसताना देखिल ते प्रपंचात राहात होते. पाच घरी मूठमूठच भिक्षा मागून आठही प्रहर झाडाखाली निवास करून, तुटपुंज्या (थित्या) संसाराचा पसारा मांडून लोकांना ते व्यवहार शिकवीत होते. स्वतः ब्रम्हस्थिती प्राप्त केल्यावर जनतेच्या कल्याणासाठी झिजणारे महाज्ञानी संत या जगात फारच थोडे. धन्य तो देश, धन्य ते कुळ, धन्य ते निर्मळ आईबाप की ज्यांच्या पोटी असे हे शुद्ध रत्न जन्माला आले. प्रयत्न केल्याशिवाय परिस सापडावा व तो दगड समजून बहुतांनी दूर फेकून द्यावा तसेच या परम भागवताला या शिरडीत बहुत काळ कोणी ओळखिला नाही. उकिरड्यात पडलेले रत्न पोराबाळांस सापडले म्हणजे ते जसे वाटेल तेथे फेकतात व खुशाल दगडासारखे तुडवतात (तसेच साईबाबांच्या बाबतीत सुरवातीला झाले.). (ओ. ८०-९०)

असो. या प्रमाणे तो ब्रम्हाचा भोक्ता बाबांच्या आशीर्वादानेच तृप्त झाला (व परत गेला). तुमची आमची सर्वांची हीच गत. अवघड रस्ता सोडून द्यावा. जोवर जीभेने बाह्य विषयांचा स्वाद घेणे, कानाने शब्द ऐकणे, त्वचेने स्पर्शाचे सुख भोगणे, नाकाने सुगंध घेणे, व डोळ्याने सुंदर अवयवांचे दर्शन घेणे असते तोवर विषयांचे संयमन

अशक्य. सर्व एषणा (इच्छा) आधी सोडून सद्गुरूला अनन्य शरण गेलेला असा दृढ श्रद्धायुक्त जो साधक तोच आत्मज्ञानाला पात्र होय. कान वगैरे पाच इंद्रिये जेव्हा आपापल्या विषयांना सोडतील, मन जेव्हा संकल्प व विकल्प करणे खात्रीने स्वतःच सोडून देईल व बुद्धिदेखील जेव्हा अशाप्रकारे निश्चल झालेल्या अंतःकरणात आपला निश्चय करण्याचा व्यापार बंद करेल, तेव्हा (होणारी स्थिती) हीच खरी परमगति आणि तेच निर्विकार ब्रम्ह. बुद्धि निश्चय न करणारी होईल व चित्तात मी तोच एक आहे, माझ्याशिवाय दुसरे जगात काही नाही, असे चैतन्य प्रकटेल तोच भाग्यवान आत्याला जाणेल. विषयांपासून तोंड फिरविले की इंद्रिये आत्म्याकडे तोंड करतील आणि तेव्हाच आत्मसुख प्रकट होईल. इतर सर्व सुख नव्हेच. जे विषयांच्या विकारांनी झाकलेले आहेत त्यांना अतिसूक्ष्म व दिसण्यास अवघड असे परमानंद प्राप्तीचे साधन जे आत्मज्ञान ते समजणे फार कठीण. ब्रम्हदेवाच्या पदापर्यंत या लोकाच्या व परलोकाच्या विषयांमध्ये ज्याला आसक्ति नाही तोच एक ब्रम्हपदाचा अभिषेक झालेला व मुक्त जाणावा. चित्ताला विषयांपासून हळूहळू माघारी फिरवून आत्मरूपी स्थिर करून आत्मज्ञान जोडावे, या लोकी व परलोकी (कर्म) फलांची विरक्ति व हर्षशोक वगैरे द्वंद्वांचा त्याग हे बुद्धिमंत लोकच भोगू (सहन करू) जाणे व हाच तो अध्यात्माचा (आत्मज्ञानाचा) मार्ग. (ओ. ९१-१०२)

# मज नको हे मोठेपण

मी कोण? असे काय हो पुसता
मी याचक आहे साई माझा दाता
नका म्हणूत मजला श्रेष्ठ श्री साई भक्त
मज हवे प्रेम अन् अषिश साईंचे फक्त

* * * *

तुम्ही वय परत्वे थोर मंडळी सज्ञान
भक्तीत रंगला कसे द्यावे सांगून
मज पुसती जन हे साई कोण कोठून आले
या भाग्य विधात्याचे कोडे कधी न सुटले

* * * *

जात, पात वा धर्म कोणता हेही कुणा नच कळले
वय मर्यादाही कुणी न सांगू शकले
वेदशास्त्र अन् बुद्धी वाद हे थकले हाय खावून
"पोतनीस" म्हणे नको हे मोठेपण.

— श्री. डी. बी. पोतनीस
पिंपरी, पुणे-४११ ०१७.

# द्रौपदीची थाळी आणि बाबांची उदी

**— श्री. शं.ग. सारंगधर**
अ/८, 'साईकुटीर', डहाणूकरवाडी,
पां. साळुंके मार्ग, दत्तमंदिर रस्ता,
कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०० ०६७.

द्यूतात हरलेला धर्मराज अधोवदन वनवासाला निघाला होता, बरोबर द्रौपदीसह बाकीचे चार पांडव पण होते. द्यूताचे आव्हान नाकारणे हा अधर्म आहे असे मानणाऱ्या धर्मराजाला. द्यूतात हरल्याचा विषाद नव्हता. पण आता अतिथी, ब्राह्मण विन्मुख जातील याची त्याला खंत वाटत होती. वैभव काळात असे घडले नव्हते. म्हणून धर्मराजाने सूर्यनारायणाची उपासना सुरु केली.

भगवान आदित्यनारायण प्रसन्न झाले. धर्मराजाला एक थाळी देऊन म्हणाले, "लक्षावधि ब्राह्मण जेवून उरेल असे तू इच्छिशील ते षड्रस अन्न ही थाळी बारा वर्षे पर्यंत देईल. मात्र शेवटी द्रौपदी जेवून थाळी स्वच्छ करुन ठेवल्यावर पुन्हा त्या दिवशी अन्न निर्माण होणार नाही."

सूर्याने दिलेल्या थाळीमुळे विजनवासांतही हजारो ब्राह्मण धर्मराजाच्या पर्णकुटीत जेवून जातात हे ऐकून दुष्ट दुर्योधनाचा संताप अनावर झाला. पांडवांचे सत्व हरण करण्यासाठी काय उपाय योजावा याचा विचार त्याच्या मनात चालू असतानाच दुर्वास ऋषि आपल्या हजारो शिष्यांसह हस्तिनापूरात आले. नुकताच चातुर्मास सुरु झाला होता. पांडवांच्या सत्व हरणाचा उपाय सापडल्याच्या आनंदात दुर्योधनाने दुर्वासांचे स्वागत केले. आता चातुर्मासात इथेच वास्तव्य करावे व आपल्या सेवेची संधी दुर्योधनाने मला द्यावी अशी त्यांची प्रार्थना केली. दुर्वासांनी ते मान्य केले. चार महिने कलिपुरुषाचे घरचे अन्न खाल्याने मतिभ्रंश झालेल्या दुर्वासांनी दुष्टाने मागितलेला वर त्याला दिला. वर असा होताः— दुर्वासांनी आपल्या सर्व शिष्यांसह पांडवांकडे जाऊन रात्री बारा वाजता भोजन मागावे. सूर्याने दिलेल्या थाळीमुळे धर्मराज वनवासातही लक्षावधि ब्राह्मणांना भोजन घालतो. तेव्हा त्याला हे अशक्य नाही.

रात्री बारा वाजता दुर्वास आपल्या शिष्यांसह पांडवांच्या पर्णकुटीजवळ आले. दारातील हाक ऐकून धर्मराजाने दार उघडले. इतक्या मध्यरात्री दारात दुर्वासांना पाहून क्षणभर तो गांगरलाच. पण स्वतःला सावरुन त्याने दुर्वासांचे स्वागत करुन आपली काय सेवा करु असे त्यांना विचारले.

"येथे ब्राह्मण भोजने चालतात, ब्राह्मण येथून विन्मुख जात नाहीत, असे ऐकले म्हणून तुझ्या दारी आलो आहोत. आम्ही सर्व क्षुधेने व्याकुळ आहोत. तरी आम्हाला भोजन दे" असे दुर्वासांनी सांगताच, संभ्रमित झालेल्या धर्मराजाने द्रौपदीकडे पाहिले. प्रसंगावधान राखून द्रौपदी म्हणाली, 'आपण सर्व नदीवर जाऊन स्नान करुन या. तोपर्यंत भोजन तयार होईल.'

सर्वजण स्नानाला गेल्यावर द्रौपदीने द्वारकेकडे तोंड करुन जगदीशाची प्रार्थना केली. तिकडे श्रीकृष्णाच्या भोजनाचे ताट वाढून तयार होते. पण द्रौपदीची हाक ऐकून ताट बाजूला सारुन जगजेठी पांडवांच्या पर्णकुटीत आला. द्रौपदीने श्रीकृष्णाला वंदन करुन आपण कुठल्या संकटात आहोत ते त्याला सांगितले. पण भगवान तिला म्हणाले, "द्रौपदी, तुझी हाक ऐकून न जेवताच मी येथे आलो आहे. मला भूक लागली आहे. काहीतरी खायला दे." यावर द्रौपदी म्हणाली, "श्रीकृष्णा, दुर्वासां पूर्वी तूच माझं सत्व पाहतोस काय? घरात काही नाही. थाळी तर विसळून ठेवली आहे."

"नाही, द्रौपदी , नीट निरखून पहा. मला भाजीचा वास येत आहे'. द्रौपदीने थाळी पाहिली. खरोखरीच थाळीला भाजीचे पान चिकटले होते. द्रौपदीने ते पान श्रीकृष्णाचे हातावर भक्तिभावाने ठेवले. विश्वंभराची क्षुधा शान्त झाली. त्याबरोबर विश्वात कुणालाही जेवावेसे वाटेना. दुर्वासांची व त्यांच्या शिष्यांची तीच अवस्था झाली.

श्रीकृष्णांनी भीमाला नदीवर पाठवून पानं वाढून तयार असल्याचे दुर्वासांना कळविले. श्रीकृष्णही आज आपल्या पंगतीला हजर असल्याचे सांगायला भीम विसरला नाही. "श्रीकृष्ण भगवान ज्यांचा पाठीराखा आहे त्यांचे सत्व मी काय हरण करणार?" असे म्हणून तिथूनच दुर्वासांनी भगवंताला दंडवत घातले आणि भीमाला म्हणाले, "अज्ञातवासात तुम्हाला कुणी ओळखणार नाही. असा धर्माला माझा आशिर्वाद सांग." द्रौपदीच्या थाळीने असे पांडवांचे सत्व रक्षण केले.

श्रीसाईबाबांच्या उदीने असेच एका भक्ताचे सत्वरक्षण केले. त्याची हकीगत श्रीसाई-सच्चरितकारांनी पस्तीसाव्या अध्यायात सांगितली आहे. त्या भक्ताचे नाव श्री. बाळासाहेब नेवासकर! या नेवासकरांनी श्रीबाबांच्या चरणी आपलं सर्वस्व अर्पण केलं होतं. शेताची कापणी-मळणी झाली की आलेले सर्व उत्पन्न द्वारकामाईत नेऊन भक्त नेवासकर श्रीबाबांचे चरणी अर्पण करीत. श्रीबाबा त्यातील जेवढे देत तेवढेच घरी नेऊन त्यात ते कुटुंबाची गुजराण करीत. पण नेवासकर कुटुंबाची कधीच आबाळ झाली नाही. कशी होणार? श्रीबाबांना भक्तांची काळजी असते ना! श्रीबाबा नेहमी सांगतः—

दक्षिणेलागी ज्याने मजला। असेल एक रुपया दिधला।
दश गुणे मज तया मोबदला। द्यावा लागला मोजून।।

(ओ. १२९ अध्याय ३५)

बाळासाहेबांच्या मागे त्यांच्या मुलांनीही वडिलांचे हे व्रत असेच पुढे चालू ठेवले. एकदा बाळासाहेबांचे श्राद्धाचे दिवशी अंदाजापेक्षा तिपटीने ब्राह्मण भोजनास आले. सुनबाई गांगारुन गेली. पण सासूबाईंची श्रीबाबांवर अचल निष्ठा होती. श्रीबाबा आपली लाज राखतील याची त्यांना खात्री होती. त्या सुनबाईंना म्हणाल्या, "यात घाबरायचं कारणच काय? हे आपल्या घरचं अन्न नाही. हे तर श्रीबाबांच्या घरचे अन्न. ते अपूरं कसे पडेल?"

हे साईच्या घरचे अन्न। आपुला नाही एकही कण।
तोच करील लज्जा रक्षण। त्याचे उणेपण तयाला।।

(ओ. १९३ अध्याय ३५)

असे सांगून थोडी थोडी उदी त्यांनी प्रत्येक तयार अन्नाच्या भांड्यांत टाकून त्यावर वस्त्र आच्छादन टाकलं. "वाढताना वस्त्र दूर कर पण पुन्हा भांडी वस्त्राने झाकत जा" सासूने सुनेस सांगितले. सुनेने सांगितल्याप्रमाणे केले. आणि काय आश्चर्य! सर्व ब्राह्मण जेवून गेले तरी भांड्यांत अन्न शिल्लकच! द्रौपदीच्या थाळी सारखाच हा श्रीबाबांच्या उदीचा चमत्कार!

*****

# तिसरा शोध — श्रीसाईदत्ताचा

**"भज सर्वेश्वर श्री औदुंबर परमसुखाचे धाम"**
**(श्रीसाईगीतायन)**

— **श्री. चकोर आजगांवकर** एम.ए.
उपसचिव, शिक्षणखाते, महाराष्ट्र
वाय् ११/१७०, सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

मागील दोन लेखात श्रीरामजन्मानिमित्त **'एक शोध श्रीसाईरामाचा'** व श्रीकृष्ण जयंती निमित्त **"शोध श्रीसाईकृष्णाचा"** असे दोन लेख मी लिहून श्री साई मधील रामतत्व व कृष्णतत्त्व यांचे विवेचन केले. श्रीरामतत्त्व हे आदर्श दैवी व प्रांपचिक जीवनाचे प्रतीक आहे तर श्रीकृष्ण तत्त्व हे लीलामय पण प्रपंच-उद्धारक आहे. त्याहून निराळे पण त्या रामकृष्णांना पुरुन उरणारे गुरुकृपामय श्रीदत्ततत्त्वही श्रीसाईबाबांच्या ठायी विराजत होते. त्या गुरुतत्त्वाचा प्रपंचातून परमार्थाकडे नेणारा परिसस्पर्श फक्त मुमुक्षू भक्तांनाच कळण्याजोगा आहे. प्रपंचातील त्रितापाती पिडलेल्यांना व अडचणीत आधारासाठी येणाऱ्या अति व अर्थार्थी भक्तांना बाबांच्या गुरुदत्त तत्त्वाचा प्रत्यय यावयास थोडा वेळ लागत असल्याने त्यांना त्याचे यथार्थ ज्ञान होणे मूलतः अपेक्षित नाही.

श्रीराम हे नाव श्रीसाईबाबांच्या हृदयातून स्फूरत असे. त्यांनी शिरडीत रामनवमी ७५ वर्षापूर्वी सुरु केली, त्यांच्या घराण्यात हनुमान कुलदैवत होते व त्यांच्या विभुतिमत्वातील, **"अल्लाकेबंदेपण"** हे हनुमानाच्या सेवा भक्तीचे होते. त्यांचे चरित्र लीलात्मक श्रीहरीच्या लाघवाचे होते तथापि त्यामधली गुरुतत्त्व मात्र त्या फकीर सरकारच्या, त्या वटपात्राशायी जगद्गुरु मूलशक्तीच्या योगस्पंदनांनी भारलेले होते. त्या दत्तांच्या गुरुतत्वाला बाबांनी प्राणप्रिय मानले. ते सामान्य अर्थार्थी व अति भक्तासाठी जीवनदायी रामकृष्ण बनले तरी उच्च साधकासाठी ते शिवशक्तीस्वरुप गुरुमूर्ती होते. **"ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः"** ध्यान करायचे तर ते श्रीगुरुमूर्तीचे करावे, गुरुरुपाचे करावे असे बाबांनी गुरुगीतेच्या अविर्भावात सांगितले. ते म्हणाले **'तू माझ्याकडे पहा'** (Look up to me) माझ्या रुपाचे ध्यान कर. माझी मूर्ती मनात, हृदयात, बुद्धीत आणि अहंकारात भर! त्या गुरुमूर्तीच्या ध्यानातूनच शिष्याला गुरुकृपेचा लाभ होणार आहे. बाबांनी आपल्या गुरुंच्या मुखाचे नित्य ध्यान व अवलोकन केले. त्यातूनच त्यांच्या गुरुंनी त्यांना

कासवीदृष्टीने सांभाळले. त्यांनी श्रद्धा व तितीक्षा या दोन पैशांची गुरुदक्षिणा गुरुरायांना दिली. बाबांनी गुरु पौर्णिमेस ते ज्या खांबाला टेकीत असत त्याची प्रतीक पूजा करावयास भक्तांना लावले. थोडक्यात गुरु ही व्यक्ती नसून शक्ती आहे. खांब पादूका ह्या त्या गुरुंच्या प्रतीक खुणा आहेत. या खुणांचे पूजन केले पाहिजे, असे बाबांचे सांगणे होते. गुरु हा भृंग आहे, असे बाबा कबीर अवतारात म्हणतात. कीटकाने या भृगांचे ध्यान करुन स्वतः गुरु व्हायचे आहे. म्हणजे भक्ताने गुरुंच्या ध्यानातून स्वतः गुरुस्वरुप व्हावयाचे आहे, अशी बाबांची शिकवण आहे. त्या ब्रह्माविष्णू महेशस्वरुप पण या तीन रुपा पलीकडे असलेल्या साक्षात्परब्रह्म अशा श्रीसाईदत्ताचा शोध खऱ्या साधकाने बाबांच्या दगडावर बसून सो ऽ हं ध्यानांत गढलेल्या प्रतीक मूर्तीतून वा प्रतीक पादुकातून घ्यावयास हवा.

# वेळ आली होती पण बाबांनी वाचविले

**श्री. पी.जी. कोरगांवकर**
कोंडाजी चाळ क्र. ४/२६,
जेरबाई वाडीया रोड,
परेल, मुंबई - १२.

तो प्रसंग आठवला की, अजूनही अंगावर शहारे येतात. परंतु त्याचबरोबर बाबांची आठवण होऊन मनात बाबांच्याबद्दल अनन्य असा भक्तिभाव भरून येतो व मन आनंदाने प्रफुल्लित होते. मला वाटते, तो बुधवारचा दिवस होता. जवळच्या नातलगांना भेटण्यासाठी म्हणून मला गाडीतून जायचे होते. गाडी चुकू नये व सर्व भरभर आटपावे म्हणून जरी सवय नव्हती तरी माझी पत्नी पाणी आणण्यासाठी विहिरीवर गेली होती. याची कुणालाच कल्पना नव्हती. मी आंघोळ करून माझ्याजवळ असलेली बाबांची लहानशी पोथी वाचीत घरात बसलो होतो. एवढ्यात कसलातरी गलका बाहेर ऐकू आला म्हणून मी बाहेर आलो. माझी पोथी पण वाचून आटोपली होती. मी ते दृश्य पाहिले आणि मनोमनी बाबांची प्रार्थना केली की, बाबा आज तुम्ही होता म्हणूनच हा दुर्धर प्रसंग टळला. माझी पत्नी दोराला अडखळून विहिरीत पडली होती, परंतु तिला काही झाले नव्हते. ती अतिशय सुखरुप होती. लोकांनी तिला वर काढले होते. विहिर पाण्याने संपूर्ण भरलेली होती. परंतु बाबांनी दयावंत होऊन पत्नीच्या जीवाला कोणताही अपाय होऊ दिला नाही. एवढेच नव्हे तर पुढे होऊ घातलेला मोठा बिकट प्रसंग त्यांच्या कृपेमुळेच टळला होता. बाबांनी दिलेला कौल किती सूचक होता; हे आम्हा सर्वांना त्यावेळी पटले.

# भक्ती तुज मुक्तीकडे!

— श्री. सिताराम नारायण पवार
१३/२, प्रतिरक्षा नगर,
वाकोला ब्रिज, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई - ४०० ०५५.

आपल्या हिंदू धर्मात असे मानले गेले आहे की, आपले शरीर नश्वर असून त्या शरीरात आत्मा असतो, तो अमर असतो, शरीर नष्ट झाल्यावर त्या शरीरातील आत्मा, ते शरीर सोडून दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो. म्हणजेच काय, शरीर हे नश्वर असून आत्मा अमर आहे.

मरणाचे भय हे सर्वांनाच असते. म्हणून त्या भितीच्या आहारी जाणे खचित उचित नव्हे. काही लोक तर सतत मरणाच्या छायेखालीच वावरत असतात. मरण म्हणजे माणसाला मिळालेला एक भयंकर शापच आहे, असे त्यांना वाटते. मरणाची कल्पनाही नकोशी वाटते.

मला वाटते की, जीवन हे मानवाला मिळालेले महान वरदान आहे. आणि मरण हा त्या जीवनाचा गोड शेवट आहे. मरण हा मानवाला मिळालेला शाप नसून, मिळालेली एक देणगी आहे. मरण जर नसते तर जीवन सागराचे पाणी गढूळ झाले असते. मानवाला मुक्ती मिळविण्यासाठी देवाने दिलेला तो उःशापच आहे. अशी एकदा मनाची खात्री केल्यावर मरणाचे भय आपल्या मनातून कायमचे नाहीसे होऊन, मरण आपल्याला प्रिय मित्रासारखे वाटू लागेल.

परमेश्वराकडून आपल्याला मिळालेला जीवनरुपी अमृत देणगीचा उपयोग आपण कशाप्रकारे करीत आहोत, याचा प्रत्येकाने मनाशी विचार केला पाहिजे. आजच्या धावपळीच्या जगावर जर नजर टाकली तर आपल्याला असे दिसून येईल की, बहुतेकजण भौतिक सुखाच्यामागे लागण्यातच दंग आहेत. पैसा मिळविण्यासाठी प्रत्येकजण शर्यतीच्या घोड्याप्रमाणे धावत सुटलेले दिसून येतात. आपल्या घरात आरामाचे व चैनीचे असे प्रत्येक साधन असावे, पैशानेच सगळी सुखे विकत घेता यावीत, असे त्यांना वाटू लागते. त्यामुळे साहजिकच हळू हळू नितिमत्ता ढासळत चालली आहे, माणसा-माणसातील प्रेम, बंधुभाव कमी कमी होत चालला, असे दिसून येते. आपले घर एवढेच मर्यादित जग त्याला पुरेसे वाटत आहे. आपण ह्या समाजाचे काही देणे लागतो हे तो पूर्ण विसरुन जातो. भक्तीमार्गाकडे लक्ष देण्यास त्याला फुरसत नसते. काही वेळा वाटू लागते की, पैशानेच आपल्याला सगळी सुखे विकत घेता येतील का? पैशानेच आपल्या मनाची शांती मिळविता येईल का? पैशानेच आपल्याला देव प्रसन्न करुन घेता येईल का? या तीनही प्रश्नाची उत्तरे आपल्या मनाचे समाधान करु शकत नाही.

ज्याप्रमाणे —

१) पैशाने अन्न विकत घेता येते, पण चांगले आरोग्य विकत घेता येत नाही.

२) पैशाने ग्रंथ विकत घेता येतो, परंतु शहाणपणा विकत मिळत नाही.

३) पैशाने आयुष्याचा विमा उतरविता येतो, पण अधिक आयुष्य लाभण्यासाठी ते विकत मिळत नाही.

आजच्या जगात पैसा ही चीज आवश्यक आहे, हे निर्विवाद सत्य आहे; परंतु जर आपण अधिक पैशाची हाव धरुन सतत तो कमावण्यातच गर्क राहिलो, भौतिक सुखाच्याच मागे लागलो तर आपण देवापासून अधिकाधिक दूर जात आहोत असे दिसून येईल. आपल्या जीवनाला आकार देण्यासाठी, ह्या जगात तग धरुन राहाण्यासाठी, माणसाला जशी कर्मयोगाची गरज असते, त्याचप्रमाणे भक्तीयोगाचीही गरज असते. मनाला शांती मिळवून देण्याचे फार मोठे सामर्थ्य परमेश्वराच्या भक्तीत आहे. माणसाला संपत्ती शेवटपर्यंत कमीच पडत असते. पण देवाची देणगी कधीही कमी पडणार नाही. त्यांच्या देणग्या या संपत्तीहून अधिक मौल्यवान आहेत. संपत्ती कालांतरापर्यंत टिकत नाही. खरे समाधान देऊ शकत नाही.

आपल्या देशात जे महान संत होऊन गेले, त्यांनी कर्म व धर्म या दोघांची सांगड योग्य प्रकारे घालून मानवाला परमेश्वराजवळ जाण्यास महामार्ग खुला करुन दिला आहे, हे त्या संतांचे प्रचंड कार्य होय. परमेश्वराची भक्ती कशाप्रकारे करावी हे त्यांनी फार सुंदर रितीने लोकांना पटवून दिले आहे. एवढेच नव्हे तर स्वतःही त्याप्रमाणे आचरण ठेवले होते. ह्या संतांचे उपकार माणसाला कधीही विसरता येणार नाही.

आपल्याला असे वाटणार की अदृश्य परमेश्वराची भक्ती कशी करावी? कारण त्याला आपण ओळखू शकत नाही. पण परमेश्वराची काही साकार रुपे आहेत. उदा. गणपती, आपली कुलदेवता, दत्तगुरु, श्रीसाईबाबा, शिवशंकर, श्रीराम, श्रीकृष्ण, मारुती वगैरे. तसेच काही देवींचीसुद्धा साकार रुपे आहेत. तेव्हा ज्या व्यक्तीला जो देव अथवा देवता आवडेल त्या देवतेची त्याने मनापासून भक्ती (पूजा) करावी. शेवटी जो अदृश्य परमेश्वर त्याला ती पोहचते. परंतु ही पूजा करताना प्रथम श्रद्धा, समाधान व अनन्यभाव या तीन गोष्टी परमेश्वराची भक्ती करताना अत्यंत आवश्यक आहेत. जेणे करुन आपल्या मनाला समाधान व परमेश्वराला आपल्याबद्दल दया निर्माण होईल. मनापासून जर श्रद्धा भक्तीने पूजा करु तरच या साऱ्या गोष्टी सफल होतील.

जसे आपल्या घरातील मुख्य कर्ता पुरुष जर संतुष्ट असेल तर घरातील सर्व माणसांना तो संतुष्ट ठेवतो. म्हणून त्याला संतुष्ट ठेवण्यासाठी घरातील सर्व माणसे आपआपल्या परीने तसा प्रयत्न करीत असतात. जेणेकरुन कर्ता पुरुष समाधानी होईल असे वातावरण घरात निर्माण करतात, तसाच ब्रम्हांडाचा व्यवहार चालण्यासाठी जो कर्ता परमेश्वर आहे, त्यालाही संतुष्ट ठेवणे हे आपले (प्रत्येकाचे) कर्तव्य आहे. ते प्रत्येकाने शक्यतो पाळले पाहिजे.

परमेश्वर असे म्हणत नाही की, आपला संसार सोडून अहोरात्र माझेच गुण-गाण गात राहा. जोपर्यंत आपण दुसऱ्यांचे अंतःकरण ओळखू शकत नाही तोपर्यंत आपल्याला भक्तीचा खरा अर्थ समजू शकणार नाही, मला वाटते की, आपल्या महान संतांनी

दाखवून दिलेला मार्ग जर आचरणात आणला, माणसातील परमेश्वर ओळखण्यास शिकलो, निष्काम वृत्तीने दुसऱ्यांची सेवा करण्यात धन्यता मानली, भौतिक सुखाच्या मागे न लागता समाधान वृत्तीने जगण्यास शिकलो, काम-क्रोध-मद-मत्सर वगैरे षडरिपुंपासून आपण राहाण्यास शिकलो, दुसऱ्याबद्दल बंधुभाव-प्रेम बाळगून दया बुद्धीने आपण इतरांना मदत केली, अशा रीतीने आपल्या जीवनाची बांधणी केल्यास परमेश्वराची वेगळी भक्ती करण्याचीसुद्धा आवश्यकता भासणार नाही. आपल्या मनाची हरवलेली शांती परत मिळू शकेल. मरणाचे भय आपल्या मनात औषधालासुद्धा राहाणार नाही. मुक्तीचे एक महाद्वार आपल्यासाठी खुले होईल. एवढेच नव्हे तर आपण अंतःकरणापासून साद घातल्यास प्रत्यक्ष परमेश्वरालासुद्धा आपले स्थान सोडून (तुमच्यासाठी) धावत यावे लागेल.

# ओम जय श्रीसाई हरि

(चाल - ओम जय जगदीश हरे)

ओम जय श्रीसाई हरि। स्वामी जय श्रीसाई हरी।
भक्तांचा कैवारी। वससि गोदा तीरी॥ धृ०॥
ब्रह्मा विष्णु महेश्वर। असती तव ठायी।
दिशा दिशातुनि भाविक। येती तव पायी॥ १॥ ओम....
तू करुणेचा सागर। तू संकट हर्ता।
दीनांचा तू आश्रय। तू पालनकर्ता॥ २॥ ओम....
श्रद्धा आणि सबूरी। जे चित्ती धरती।
ऐसे त्या भक्तांचे इच्छित। साई पूर्ण करती ॥ ३ ओम...
दुःखित भाविक येती। लोटांगण घेती
उदी देऊनी त्यांचे। रोगहरण करती॥ ४॥ ओम....
साई साई ऐसे। नित्य ध्यान करिती।
त्या भक्तांना साई। सुख-शांती देती॥ ५॥ ओम....
भांव-भक्तिची माला। वाहू (अर्पू) देवाला।
साई-श्रीहरी चरणी। शरणागत कमला॥ ६॥ ओम....

***या आरतीच्या रचयित्या कै. सौ. कमलिनी देशपांडे यांचे काही महिन्यापूर्वी जिव्हा-कर्करोगाने निधन झाले. निधनापूर्वी त्यांनी कागद-पेन्सिल आपल्या कन्या सौ. जयश्री देशपांडे, पुणे यांचेकडून मागून घेऊन वरील आरती केली, लिहिली व त्यानंतर त्यांचे सर्व व्यवहार हळूहळू बंद झाले. त्या तरुणपणात काव्यरचना करीत. साईंची सेवा त्या ३५ वर्षे करीत होत्या. कै. सौ. कमलिनी देशपांडे यांची ही आरती प्रसिद्ध करून त्यांना अंतिम श्रद्धांजली वाहात आहोत. — का. संपादक***

# श्री साईंच्या दरबारी वारी परमार्थाची

— श्री. वि.म. हटवार
रेशीमबाग, नागपूर.

आपण आपल्या जीवनातील अनेक कर्मांत ज्ञान व भक्ती मिळून अद्‌भूत, प्रेममय व ज्ञानमय सेवा साधतो. साईनाथांवर माझे प्रेम आहे. हे प्रेम सेवेत प्रगट होत असेल तर ती खरी सेवा! श्री साईंची शिकवण आपल्या जीवनात उतरविण्यासाठी झटणारे असतील त्यांना शुद्ध चित्ताने परमार्थ साधने शक्य आहे. अध्यात्मज्ञानाची आवड पाहिजे. प्रत्येक कृत्य शुद्ध अंतःकरणाने सेवामय, प्रेममय व ज्ञानमय व्हावे. खरे सांगावयाचे तर चांगल्या व वाईट प्रवृत्तींचा झगडा आपल्या मनातच असतो. माझ्याच मनातील विकार साकार होऊन उभा असतो. आपल्यात सद्‌गुण व दुर्गुण दोन्ही विद्यमान असतात. स्वैराचाराने दुर्गुणांची वाढ होते. सदाचाराने सद्‌गुण वाढतात. सद्‌गुणांस नम्रतेची जोड पाहिजे. निर्भयतेने प्रगति व नम्रतेने बचाव होतो.

माणूस आपल्या कर्तबगारीने संपत्तिवान बनतो. सम्पत्ति दोन प्रकारची आहे, एक दैवी संपत्ति व दुसरी आसुरी संपत्ति. दैवी संपत्तीचा विकास करावा व आसुरी संपत्तीपासून दूर रहावे. आपली संस्कृती उत्तम असेल तर आपल्या कृतीतून ती दिसली पाहिजे. आसुरी संपत्ति म्हणजे आपल्यातील काम, क्रोध, लोभ आहे. क्रोध व लोभ कामातून उत्पन्न होतात. संयमाचा मार्ग स्वीकारुन काम क्रोधापासून बचाव करता येतो . संयमपूर्वक वागावे, बेताल वागणे हितकारक नाही. प्रत्येकाने आपली नैतिक शक्ती वाढवावी. संसारात राहून अलिप्त राहण्याची वृत्ती संतांची आहे. ज्याच्या अंगी संसारापासून अलिप्त असण्याची कला आहे तो स्वतः आनंदी असतो, दुसऱ्यांच्या दुःखात सहभागी होतो. जितकी प्रगती अध्यात्मज्ञानात होईल तितका हा संसार पसारा क्षुद्र दिसेल. संसार व्यवहारात मग लक्षच लागणार नाही. शक्य असेल तेवढी आसुरी संपत्ती दूर करून दैवी संपत्ती जवळ करावी हा गीतेचा आदेश आहे. आपल्या स्वभावातील दोष दूर करून अंतःकरण शुद्ध झाले तर सात्विक चित्तात ईश्वरी ज्ञानाचा उपाय सूचतो. आत्मविकासाकरिता ज्या गुणांची आवश्यकता आहे त्यांचा थोडक्यात विचार केल्यास ते खालीलप्रमाणे सांगता येतील. १) निर्भयता असेल तर प्रगति करून घेता येते. २) चित्ताची शुद्धता असणारा माणूस सात्विक ज्ञान प्राप्त करतो. ३) ज्ञानयोग म्हणजे सर्वांच्या ठिकाणी एकच साईचा सहवास व अनुभव — ईश्वरी साक्षात्कार. सर्वांच्या अंतरी आपण साईनाथास ओळखावे. ४) दान माणसाने यथाशक्ती करावे. ५) इंद्रियनिग्रह करून देहाचा दंभ टाळणे. सहनशक्ती असावी. ६) आत्मस्वरुप जाणून सर्वांना साधणारा यज्ञ म्हणजेच लोकसंग्रह करणे. नीतीमार्ग लोकांस दाखविणे. सहजीवनाचा मार्ग अनुसरणे. ७) स्वाध्याय-धर्मग्रंथाचे पठण, मनन व तत्वचिंतन. ८) आत्मसुख प्राप्त करावयास देहसुखाचा त्याग करावा. काया, वाचा व मनाने श्रीसाई पूजेत मग्न असावे. ९) मनाचा सरळपणा असला म्हणजे परस्परांचे सहकार्य लाभते. १०) कोणतीही हिंसा टाळणे. ११) सत्य भाषण व आचरण आणि सत्य व्यवहार. जे

ऐकले, पाहिले व अनुभवले तेच सांगावे. १२) काम, क्रोध व लोभाचा त्याग केल्याने चित्ताचा प्रक्षोभ होत नाही. १३) कर्मफलाचा विचार न करता उचीत कर्म करीत राहणे. १४) मन:शांति करिता साईची अनन्य भक्ती, मनोभावे शरण जावे. प्राप्त परिस्थितीत संतोष मानावा. १५) दुसऱ्याचे दोष काढण्यात व्यर्थ वेळ घालवू नये. कोणाचीही निंदा न करणे. १६) प्राणिमात्रांवर दया करावी. दुसऱ्याचे दुःख निवारण करणे व कंटकांचे निर्दालन करून सज्जनास संरक्षण द्यावे. १७) विषयलोलुपता नसावी, विषयांची संपूर्ण अनासक्ती असणे. १८) आपल्या वागण्यात व बोलण्यात मृदुता किंवा मार्दव असावा. १९) जणांची नसली तरी मनाची लाज बाळगावी. २०) मन चंचल नसावे. २१) सात्विक उच्च जीवन मूल्याने तेजस्वी बनावे. परमार्थी चेहरा तेजस्वी दिसतो. २२) क्षमा शांति, मनाचा उदारपणा व सहनशीलता असावी. २३) आत्मसंयमाने धैर्यशक्ती वाढवावी. २४) मन शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न करावा. २५) कधीही कोणाबद्दल द्वेषभावना नसावी. २६) मानाची किंवा प्रतिष्ठेची भावना न ठेवता कर्म करीत राहावे.

सात्वीक आहार, साई श्रद्धा, सर्वांभूती दया भाव, संतसंगतीने भक्तीमार्ग सोपा होतो. श्रीसाईची पूजा अनन्य भावाने शरण येऊन केल्यास मनोकामना पूर्ण होऊन प्रसन्नता कायम राहते. स्वतः संतुष्ट राहून इतरांनाही संतुष्ट ठेवता येते. श्रीसाईसारखे संत समाजाला निरंतर जागृत ठेवतात. चंदन स्वतः झिजते पण इतरांस मानसिक समाधान, शांतता व सुगंध देते. माणसाच्या अंगी दैवी गुण असतील, साईनिष्ठा असेल तर तो परमार्थ प्राप्त करून ईश्वराप्रत जाण्याचा अधिकारी बनतो. तीर्थाने जसे तन पवित्र होते सते आत्मविचाराने मन पवित्र होते. आपण योजलेल्या कार्यास श्रीसाई अनेक रुपाने मदत करतात. व्यवहारात संकटकाळी धावून येईल त्यालाच आपण देव मानतो. प्रत्येकाने आपली माता पिता व गुरु यांना वंदन करण्यास तत्पर असावे.

# साईकृपेने पास झाले

— कु. विद्या परशुराम बोराडे
८९, बियावानी रोड क्र. १,
इन्दोर-४५२ ००२.

माझी लॉ कॉलेजची द्वितीय वर्षाची पुरवणी परीक्षा चालू होणार होती. त्या परिक्षेसाठी मी पूर्ण तयारी करीत होते. परंतु अचानक माझ्या वडिलांचे देहावसान झाले. वडिलांच्या निधनानंतरच्या सहाव्या दिवशीच माझा पेपर होता. मी पार भांबावून गेले होते. परिक्षेला बसावे की बसू नये ह्या विवंचनेत मी सापडले. परंतु सर्व भार बाबांवर सोपवून मी परीक्षा दिली. दोनपैकी एक पेपर मला फारच कठीण गेला होता. त्यात मी काय लिहिले तेच मला कळत नव्हते. मी पास होण्याची मला सुतराम आशा नव्हती. परंतु बाबांच्या कृपेने मी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. श्री. साईबाबांची ही कृपादृष्टी सर्व साईभक्तांवर सदोदित राहो हीच त्यांच्या चरणी प्रार्थना.

# पतित पावन साईनाम

**श्री. जनार्दन बांदेकर**
१/११, रायगड निवास,
मुंबई-४०० ०३३.

**[कै. दाभोळकर यांनी लिहिलेल्या श्री साई सत्चरिताच्या आधारे]**

साईबाबांच्या छोट्या मोठ्या भक्तांसाठी, बाबांचा आशीर्वाद घेऊन, बाबांच्या जीवन कार्याबद्दल लिहित आहे. माझ्याकडून काही चुका झाल्यास मला बाबांच्या भक्तांनी क्षमा करावी ही विनंती.

श्री. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यामध्ये "हर हर महादेव" अशी गर्जना ऐकल्याबरोबर मावळे झोपेमधून जागे होत. मावळ्यांच्या अंगामध्ये भवानी माता शक्ति, चैतन्य, जोम निर्माण करी. हिंदुधर्म अस्तित्वात रहाण्यासाठी, टिकविण्यासाठी मावळे प्राण पणाला लाऊन लढले आणि मावळ्यांनी महान् संतांचा उपदेश खरा करून दाखविला. भारत मातेचे तसेच हिंदु धर्माचे रक्षण केले.

त्याच प्रमाणे "अनंत कोटी ब्रम्हांड नायक राजाधीराज योगीराज परब्रम्ह श्री सच्छिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज" अशी बाबांच्या समाधी मंदीरामध्ये पहाटे आणि प्रत्येक आरतीच्या वेळी शेवटी, भालदार/चोपदार ह्यांनी म्हटलेली बिरुदावली (ललकारी) ऐकल्यावर, प्रत्येक भक्ताच्या रोमारोमात चैतन्य, प्रसन्नता आणि साईबाबांवरील खरी श्रद्धा निर्माण होऊन स्वतःचे स्वतःला भान रहात नाही. आरती संपल्यावर बाहेर गेल्यानंतर पुन्हा पुन्हा बाबांच्या समाधी मंदीरामध्ये येण्यासाठी आणि समाधीचे दर्शन घेण्यासाठी पाऊले वळतात. ह्याची दोन कारणे आहेत, एक म्हणजे बाबांवरील श्रद्धा आणि दुसरे म्हणजे आपल्या प्रिय भक्तांना आपल्याजवळ ओढून घेण्याची बाबांची शक्ती. म्हणूनच भक्तांना प्रवासामध्ये झालेला त्रास, बाबांचे दर्शन घेताच, दोन्ही हात जोडून नमस्कार करताच दूर होतो.

प्रत्येक भक्ताच्या मनामध्ये देव/देवतेबद्दल प्रेम असते. त्याचे/तिचे प्रत्यक्ष दर्शन बाबांच्या ठिकाणी होते. आणि म्हणूनच दिवसेंदिवस भक्तगणांची संख्या वाढते आहे. बाबांनी आपला देह जरी ठेवला असला तरी आजही ते समाधीमंदीरात आणि शिर्डी क्षेत्रात प्रत्यक्ष वावरतात हे सत्य असून शिर्डीला आलेल्या प्रत्येक भक्ताला ह्याचा अनुभव येतो. भक्तांच्या संकटाला धावत येऊन बाबा भक्तांची व्यथा, दुःख आणि संकटे दूर करतात. ह्यावरून साईबाबा आजही ह्यात आहेत याचे प्रत्यंतर घडते.

आपण परमेश्वर आहोत! असे उद्गार केव्हाही बाबांच्या मुखातून आलेले नाहीत. दासगणूने बाबांच्या पायावर मस्तक ठेवले असता बाबांच्या दोन्ही पायांच्या अंगठ्यांमधून उदक निथळू लागले आणि प्रत्यक्ष गंगा यमुना यांचा पाझर वाहू लागला.

बाबा ना मानव होते, ना हिंदु, ना मुसलमान. ना सुशिक्षित ना अशिक्षित. एकदा तर नानासाहेब चांदोरकरांना बाबांनी संपूर्ण भगवद्गीता सांगितली होती. बाबा हे दत्त अवतार होते.

आपल्या देशात ईश्वर अवतार घेतो, आपले कार्य करतो आणि देह ठेवतो. परंतु आपण कोण आहेत? हे बाबांनी कधीही कोणालाही सांगितले नाही, अगर कळू दिले नाही. मात्र जे कार्य बाबांनी हाती घेतले होते, ते मात्र त्यांनी पूर्ण केले. सुरूवातीला गावातील लोक बाबांना एक वेडा फकीर समजत. लहान पोरे बाबांच्या अंगावर दगड, कागदाचे गोळे फेकीत आणि आपली हौस पुरवून घेत. परंतु कालांतराने त्याच शिरडी गावातील जनतेने बाबांना ईश्वर मानले. सुरुवातीपासून शेवटपर्यंत बाबांनी सर्वांना एकच आदेश दिला - तो म्हणजे, "अल्ला भला करेगा."

शिरडी गावामध्ये वर्षाचे बारा महीने दुष्काळ! पाणी नाही, गुरांना चारा नाही, शेते पिकत नव्हती, बागा फुलत नव्हत्या, लोक दारिद्रयामध्ये खितपत पडले होते. परंतु बाबांच्या सामर्थ्यामुळे आणि प्रभावामुळे शिरडी गावामध्ये पाऊस पडू लागला, शेते पिकू लागली, गाई दूध देऊ लागल्या, लोकांना पोटभर अन्न-पाणी आणि वस्त्र मिळू लागले. गावातील जनता हळूहळू बाबांचे सेवक बनू लागली. कुणावार संकट आले असता अगर कुणी आजारी पडल्यास लोक बाबांजवळ येत. बाबा प्रत्येक आजाऱ्याला मनाला येईल तो उपाय सांगत. परंतु त्याने रोगी बरा होई. उदा. कुणाला उलटी जुलाब झाले तर, बाबा सांगत, शेर दोन शेर भुईमुगाच्या शेंगा खा! कर्ण रोग झाला असता, किंवा क्षयासारखा महारोग झाला म्हणजे बाबा त्या रोग्याला मुखातून जो उपाय सुचे तो सांगत. डोळे येणे या सारखा रोग झाल्यास मिरची पावडर बांधा! सर्पदंश झाल्यास, रोग्याला कुठल्यातरी देवळात, जिथे कुणी चुकूनसुद्धा जात नाही अशा भितीग्रस्त जागेत नेऊन ठेवा! कॉलरा रोगाची साथ असता, स्वतःच गहू दळून त्याचे पीठ वेशीवर नेऊन टाकीत. असे विचित्र प्रयोग बाबांनी करुन शिरडी गावात लोकांना सुखी केले आणि सर्व जातीच्या लोकांना एकत्र आणले. आता मात्र बाबांविषयी लोकांच्या मनामध्ये आदर निर्माण झाला आणि बाबा सर्वांचे साई झाले.

हळू हळू बाबांची किर्ती गावाबाहेर पसरू लागली. हवेप्रमाणे गावोगावी, खेडोपाडी, देशोदेशी बाबांच्या किर्तीच्या आणि कर्तृत्वाच्या बातम्या लोकांच्या कानी पडू लागल्या. दूरदूरचे लोक, त्रासलेले रोगाने पिडलेले, आजाराने जीर्ण झालेले, संसारातील दुःखाने पोळलेले, गरीब, श्रीमंत, विद्वान, पंडीत, अज्ञानी इत्यादी सर्वांची शिरडी गावाकडे रीघ लागली.

द्वारकामाई मंदिरात बाबा भक्तांकडून ग्रंथांची पारायणे करून घेत. त्यामुळे भक्तांचे भक्तिमार्गामध्ये मन रमू लागले. बाबांवर भक्तांची श्रद्धा पक्की बसली. बाबा ईश्वरी अवतार आहेत ह्याची भक्तांना खात्री पटली.

काही भक्तांच्या मनामध्ये स्वार्थाची जाणीव असते हेही बाबा ओळखून होते. काही भक्त बाबांजवळ मनामध्ये मागणी करीत, मी मोठा धनीक व्हावा, दारासी मोटार असावी, घरी नोकर चाकर असावेत, घरा सभोवती फुलांनी फुललेली बाग असावी, मी सुखासमाधानाने हिंदोळ्यावर बसून झोके घेत रहावे इत्यादी. परंतु बाबा तसे त्यांना सुखाच्या उंच शिखरावर केव्हाच पोचू देत नव्हते. तर काही भक्त बाबांजवळ मागणी मागत, सद्गुरु साईबाबा, मला मेहनतीची चटणी भाकरी मिळू दे, मला तुमची भक्ति

करण्याची शक्ती द्या, तुमची जास्तीत जास्त माझ्याकडून सेवा करून घ्या. अशा भक्तांच्याच पाठीशी बाबा असत.

द्वारकामाईच्या मंदीरात बाबा रोज संध्याकाळी स्वतः पणत्या लावीत असत. सुरुवातीला कुत्री, मांजरे, शेंबडी पोरे आणि जीवजंतु ह्यांनाच घेऊन बाबा दिवाळी सारखे सण साजरे करीत कारण त्यावेळी बाबांना लोक एक वेडा फकीर समजत. परंतु तशीच परीस्थिती राहिली नाही. पुढे पुढे तर भक्त बाबांच्या पायांवर लोटांगणे घालीत. आणि आज तर बाबांचे लाखो लोक भक्त बनले आहेत.

बाबांना संगीताची फार आवड होती. भक्तांकडून बाबा, अंभग, गण-गौळण, नाच कव्वाली गाऊन घेत

आपल्या लाडक्या भक्तांना बाबा नेहमी सांगत, आपण सारे ईश्वराचे बंदे गुलाम आहोत, मीपणा सोडून ईश्वराच्या चरणी मस्तक लीन ठेवा. सदा हात जोडा. माझ्या मागे माझ्या समाधीमधून माझी हाडे सुद्धा तुम्हाला हाच उपदेश करतील हे पक्के ध्यानात ठेवा!

'साईबाबा आणि अवतार कार्य' ह्या पुस्तकात लेखक श्री. धोंड यांनी दिलेले एक उदाहरण भक्तांसाठी येथे मुद्दाम देत आहे. मुंबईमध्ये माधव बागेजवळ रहाणारे एक गृहस्थ श्री. हरिचश्चंद्र पितळे यांच्या मुलाला अपस्माराचा आजार होता. अगदी शेवटचा उपाय म्हणून पती-पत्नी मुलाला घेऊन शिर्डीला साईबाबांच्या समाधीच्या दर्शनासाठी घेऊन आले. बाबांची आणि मुलाची नजरानजर होताच मुलगा एकदम बेशुद्ध पडला. अति भयंकर प्रसंग ओढवला. आपला मुलगा मृत पावला असे समजून पितळे दांपत्य शोकाकूल झाले. मुलाला उचलून बिऱ्हाडी न्या, मुलाची कुडी घटकाभरात सजीव होईल! अशी बाबांनी आज्ञा दिली. आणि अगदी तसेच झाले. मुलाचा आजार पूर्ण बरा झाला.

जगाची उत्पत्ती ब्रह्मा-विष्णू-महेश ह्या तिन्ही देवतांच्या स्वाधीन आहे. आणि बाबा गुरु दत्ताचा अवतार आहेत, असा भक्तांचा विश्वास असून आरतीच्या वेळी ते भल्या पहाटे नित्य वावरत असतात ह्याची' खरीखुरी जाणीव आरतीच्या वेळी प्रत्येक भक्ताला येतेच. फक्त भक्ताने आरतीच्या वेळी एकाग्र, शांत आणि एकचित्त होऊन डोळे मिटले असता बाबांचे चारी बाजूंना अस्तित्व जाणवते.

भक्तांच्या ठिकाणी श्रद्धा, विश्वास, एकाग्रता आणि दृढनिश्चय हवा, म्हणजे बाबा, (लोखंड परीस एक झाले असता सोने होते त्या प्रमाणे) भक्तांच्या संसारात सोन्याची कमतरता भासू देणार नाहीत. एकनिष्ठ भक्तावर संकट आले असता, बाबा बेचैन होत, त्यांच्या अंगाची आग होई, तोंडाला येतील त्या शिव्या ते पाखडत आणि भक्तावरील संकट पार पडले म्हणजे बाबा पूर्ववत शांत होत.

आपल्या कार्यासाठी बाबांनी शिर्डी गावाचीच निवड केली याचे कारण म्हणजे दीन दुबळ्या लोकांचे दुःख दूर करावे म्हणूनच.

बाबांचा एक भक्त एके दिवशी बाबांच्या दर्शनाला शिर्डीला आला होता. भक्त धनाचा फार लोभी होता (साईसच्चारित अध्याय १६). आपल्याला ब्रम्हज्ञान प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने त्याने बाबांचे दोन्ही चरणावर मस्तक ठेवले आणि बाबांना

म्हणाला, बाबा मला ब्रम्हज्ञान दाखवा. बरेच दिवस मी ह्या गोष्टीचा फार उत्सुक असून, अनेक लोकांच्या (भक्तांच्या) तोंडून मी ऐकलेले आहे की, बाबा ब्रम्हज्ञान देतात आणि म्हणून परत भाड्याचा टांगा करुन मी आपल्या चरणाजवळ आलो आहे.

बाबांनी धनीकाच्या येण्याचे प्रथमतःच अंतर्ज्ञानाने जाणलेले होते. तेव्हा बाबा त्या धनीकाला शांतपणाने म्हणाले, बैस इथे. त्या प्रमाणे उत्सुक असलेला तो धनीक मांडी घालून बाबांच्या अगदी शेजारीच बसला. त्याच्या बारीक सारीक हालचालीवर बाबांचा कटाक्ष होता. बाबांनी एका अजाण मुलाला जवळ बोलाविले आणि त्याला म्हणाले, नंदूला निरोप दे. पाच रुपये बाबांना उसणे दे. बाबांना फार गरज आहे. हात उसणे दे म्हणावे. मुलगा नंदूच्या घरी गेला. दाराला कूलूप पाहून मुलगा परत बाबांजवळ आला. पुन्हा त्याच मुलाला बाबा म्हणाले, तर मग आता बाळा वाण्याकडे जा. मुलगाच तो! पळत पळत वाण्याकडे गेला. बाळा वाणी घरी नव्हता. हेलपाटे घालून मुलगा दमला. धनीक हे सर्व उघड्या डोळ्याने पहात होता आणि कानांनी ऐकत होता. हे सर्व बाबांना माहीत असूनसुद्धा जाणून बुजून त्या मुलाला हेलपाटे घालण्यास भाग पाडले जात होते.

पन्नास अधिक दोनशे रुपयांचे नोटांचे पुडके धनिकाच्या खिशामध्ये कोंबलेले होते. परंतु त्यातील केवळ पाच रुपये काढून बाबांच्या हातात देण्याची बुद्धी त्या धनिकाला झाली नाही.

बराच वेळ बसून धनीक कंटाळला. तो बाबांना म्हणाला, बाबा मला ब्रम्हांड दाखवा ना! तेव्हा बाबा त्या धनिकाला म्हणाले, धनिका, तू फक्त धन जमा करीत रहा. तुला मी ब्रम्हांडाचे दर्शन इथेच दिले. परंतु तू ते दर्शन घेऊ शकला नाहीस त्याला माझा काय इलाज ? आता तुझ्या खिशामध्ये काय आहे? पैसे ना! मग तुझ्या मुखावाटे असे का आले नाही की हे धरा पाच रुपये म्हणून? तर मग तुझ्या सारख्याला तो ब्रम्हज्ञानाचा मार्ग सुलभ असा नाही, ब्रम्हज्ञानाचा मार्ग फार बिकट आहे. (साई सच्चरित, अध्याय १६, ओवी ७४) त्यासाठी हाडाची काडे करावयाला हवीत. तू करायला तयार आहेस का? धनिक निरूत्तर झाला. त्याच्या तोंडावर थप्पड मारल्यासारखे त्याला वाटू लागले. आणि त्याची चूक त्याला उमगली.

ज्या ज्या उद्देशाने बाबांनी आपले कार्य आरंभिले होते, ते त्यांनी पूर्ण करुन दाखविले आणि आम्ही सर्व एकाच मातेची लेकरे असून सर्व धर्मांचे तत्व एकच आहे, ईश्वर अनेक नसून एकच आहे. केवळ आपल्याला दिसणारी त्यांची रुपे अनेक आहेत. आणि म्हणून आज हयात नसतानाही लाखो भक्त बाबांचे गुणगान गात आहेत, आरती म्हणत आहेत. दीन दुबळ्या भक्तांचा सांभाळ करणाऱ्या ह्या महान भगवंताला, ईश्वराला, साईबाबांना कोटी कोटी प्रणाम.

# भक्त वत्सल कृपामूर्ति-श्रीसाई माऊली

— श्री. आंतोन शायेर फर्नांडिस
मुक्काम - उभादांडा,
चमणकरवाडी, ता. वेंगुर्ले,
जि. सिंधुदुर्ग.

भाव तोचि देव, भाव तोचि देव। ये अर्थी संदेह धरु नका।।
भाव भक्ति फळे, भावे देव मिळे। निज भावें सोहाळे स्वानंदाचे।।
भावाचि कारण, भावाचि कारण। यापरतें साधन नाहीं नाहीं।।
एका जनार्दनीं, भावाच्या आवडी। मनोरथ कोडी पुरती तेथे।। १।।

— जर परमेश्वराच्या ठिकाणी भाव, श्रद्धा ठेवली तर आपल्याला देव भेटल्याशिवाय राहणार नाही. परमेश्वराच्या ठिकाणी निष्ठा ठेवली तर आपली भक्ती यशस्वी होते व आपल्याला शाश्वत सौख्य लाभते. आपण श्री साईबाबांच्या ठिकाणी भाव, निष्ठा धरली तर आपले सर्व मनोरथ पूर्ण होतील.

प्रपंचात जसा पैसा लागतो, त्याचप्रमाणे परमार्थात भाव लागतो. प्रपंच पैशाशिवाय चालूच शकत नाही. तसाच परमार्थही भाव असल्याशिवाय होत नाही.

"जयामनीं जैसा भाव, तया तैसी अनुभव।।"

या श्रीसाईबाबांच्या वचना प्रमाणे जसा आपला भाव असेल, त्याप्रमाणे आपल्याला देवाची प्राप्ती होईल. प्रल्हादाला खांबातही देवाची प्राप्ती झाली तर नामदेवाने दगडाच्या मूर्तीलाही जेऊ घातले. आपल्याला गोपीची गोष्ट माहिती असेलच! त्या गोपीला श्रीकृष्णाला जेवण घालायचे होते. पण तिचा नवरा तिला जाऊ देईना. त्यावर तिने आपल्या पतीस सांगितले की, हा देह तुझा आहे, परंतु माझ्या मनावर तुझा ताबा नाही. असे म्हणून ती त्याच्याजवळ देह ठेवून श्रीकृष्णाकडे गेलीच की नाही! त्याप्रमाणे आपण परमार्थात भाव ठेवणे आवश्यक आहे.

प्रत्येकजण स्वतःचे जीवन साधेपणाने व सरळपणे जगला तर ह्या जगातील किती तरी कटकटींचा लोप होईल. सरळ जीवनात भाव शुद्ध राहतो. देव मिळविण्याकरिता शुद्ध भाव पाहिजे. 'भावें गावें गीत। शुद्ध करोनिया चित्त।" सर्वांशी निर्वैर व्हावे ही साधनेतील विजयाची पायरी आहे. "चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती" असा शुद्ध आचरणाचा प्रभाव आहे.

धर्माचरण, भगवद्भक्ति, नामस्मरण आणि सत्संग हे चित्त शुद्धीचे उपाय होत. चित्त शुद्धीचे लक्षण हे की, आपल्या सारखेच सर्व जग सुखी असावे ही भावना असणे. ही भावना वाढण्यासाठी सर्व जग सुखी असावे, अशी प्रार्थना करण्याचा नेहमी परिपाठ ठेवावा. 'अभिमान' हा मात्र चित्तशुद्धीत बिघाड करणारा आहे. आणि तो केव्हा डोके वर काढील व आपला घात करील याचा पत्ता लागणार नाही. पण भगवंताच्या स्मरणामध्ये अभिमानाचे मरण आहे. म्हणून आपण भगवंताचे स्मरण अखंड चालू ठेवावे.

"होय जेणें चित्त शुद्धी। जेणे अखंड ब्रह्मसिद्धि।
तेस्वधर्माचरण आधी। तप हे साधी नरदेहें।।"

साईसत्‌चरित, अध्याय ३७ वा, ओवी ८८

आपले मन शुद्ध झाले तरच आपल्याला ब्रह्माची प्राप्ती होते. या ब्रह्म प्राप्तीसाठी वर सांगितलेल्या ओवीत म्हटल्याप्रमाणे आपण स्वधर्मांचे आचरण करावे, हे तप आपण ह्या आपल्या नरदेहात साधले पाहिजे. अनमोल असे आपले आयुष्य वाया घालवण्यापेक्षा काही तरी परउपकार करावा. परपीडा पाप आहे, परोपकार पुण्य आहे, अनंत जन्मांचा शेवट असा हा नरदेह आहे, तो अति दुर्लभ आहे, म्हणून आपण हरीनाम घेवून सुखाची भांडारे भरुन ठेवावी. मिळालेल्या आयुष्याचे आपण सार्थक करावे.

कुठल्याही परिस्थितीत, कुठल्याही वेळेला आणि काही झाले तरी माणसाच्या हातून अधर्म होता कामा नये.

"देव जोड तरी कराया अधर्म। अंतरे तें कर्म नाचरावें।"

"साधुसेवा मुक्तीचे घर। स्त्रैणसंग नरकद्वार।
हे पूज्य वृद्ध जनोद्‌गार। विचारार्ह सर्वथा।।" साईसत्‌चरित, अध्याय ३७ वा, ओवी ८९.

संतांची सेवा करणे हे आपल्या मुक्तीचे घर आहे. संतांची सेवा केल्याने आपली अनंत जन्मीची पापे नष्ट होतात. आपण परस्त्रीया या आपल्या बहिणी व मातेसमान मानाव्यात. त्या स्त्रीयांशी आपण संग करुन नये. त्यांच्याशी संग केल्याने आपली अधोगती होऊन आपल्याला नरकाचे द्वार उघडे होते. हे संतांचे विचार विचार करण्यासारखे आहेत.

"सदा सदाचार संपन्न। देह निर्वाहा पुरते अन्न।
गृह दारादि स्पृहाशून्य। ऐसा जो धन्य तो साधू।। साईसत्‌ चरित, अध्याय ३७ वा, ओवी ९०.

आपले नेहमी आचरण शुद्ध ठेवावे, आपले आचार-विचार चांगले ठेवावेत. माणसाच्या गरजा किती अल्प आहेत! निर्वाहापुरते अन्न नि आच्छादन (घर) असले म्हणजे झाले. पण माणूस किती तरी गोष्टींचा संग्रह ठेवतो. निरनिराळ्या वस्तूंचा संग्रह करताना, तो निरनिराळ्या दुःखांचाही संग्रह करीत असतो, हे त्या बिचाऱ्याच्या ध्यानीही येत नाही. आपण प्रपंच करीत असताना गृह स्त्री, पुत्रादिकांची आसक्ति धरू नये. आपल्या देहावर, आपल्या पैशावर, आपल्या माणसावर आपली सत्ता नाही. म्हणून आपण आपले कर्तव्य केवळ करावे. पैसा अडका, प्रपंचातल्या सर्व गोष्टी यांचा मनाने त्याग करावा. असा त्याग केला तर कार्यभाग निश्चित होतो, हे आपण समजावे.

आपण प्रपंच करीत असताना त्याची आसक्ति कमी होऊन भगवंताचे प्रेम येण्यासाठी, शास्त्रांनी घालून दिलेली बंधने आम्ही पाळली पाहिजेत आणि त्यासाठी आपले आचार, विचार आणि उच्चार आम्ही सांभाळणे जरूर आहे. प्रपंचात सदाचाराने वागावे. सदाचार हा मूळ पाया आहे. नीतिधर्मांचे आचरण असावे. नीतिधर्माची बंधने ही आमचे विकार आवरण्यासाठीच आहेत. विचाराने आपण अत्यंत पवित्र असावे. कोणाचा द्वेष, मत्सर करू नये. आणि दुसऱ्याचे अहित चिंतू नये. उच्चार तर फार सांभाळले पाहिजेत. नेहमी सर्वांशी गोड बोलावे. असा जो आचार विचारांनी संपन्न मनुष्य असेल, तोच साधू ओळखावा.

"भक्तीची ते जाती ऐसी। सर्वस्वासी मुकावे।।"

हरीभक्ती ही खरोखरीच सुळावरील पाळी आहे. कारण भक्त भक्तीच्या मार्गाने जाऊ लागला तर देव भक्ताची कसोटीच पाहात राहातो. भक्ताला संसार धडपणे करू देत नाही. भाग्य लाभले तर अंगी ताठा येईल, म्हणून देव त्याचे भाग्यच काढून घेतो. त्याला थोरवीचा भार नको म्हणून त्याच्यावर जननिंदेचा वर्षाव करतो. पण ह्या सर्व परीक्षा उतरून त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसले की देव दूर नाही. "चित्तीं नाही आस। त्याचा पांडुरंग दास।" मनात त्याच्या भेटीची ओढ असेल, तळमळ असेल, तर तो सदोदित जवळच आहे.

"म्हणून जे भक्त भावार्थी। ते जीव निरविती संतांहातीं।

कीं ते जाणती गती-निर्गती। अंतीचे सांगाती ते एक।।" साईसत्चरित्, अध्याय ३१ वा, ओवी १० वी.

याविषयी शिरडीमध्ये साईंसमोर घडलेली कथा ऐकल्यानंतर श्री साईबाबांची भक्त वत्सलता दिसून येते. कोठे मद्रास शहर आणि कोठे शिरडी क्षेत्र आणि कोठे मानस सरोवर! ज्यावेळी भक्तांची घडी (वेळ) भरेल, त्यावेळी साई आपल्या भक्ताला स्वतःकडे ओढीत आणतात.

एकदा विजयानंद नावाचा मद्रासी संन्यासी अती आनंदाने मानस सरोवराची यात्रा करण्यास निघाला. एका जपानी प्रवाशाजवळ असलेल्या नकाशात मानस सरोवर पाहून ते पाहाण्याचा त्यांचा निश्चय ठरला. यात्रेस जाताना त्यांना वाटेत शिरडी गाव लागले. त्याठिकाणच्या श्री साईबाबांचा प्रभाव त्यांनी ऐकला. श्री साईबाबा हे एक जगद्विख्यात कीर्तिवान असे संत आहेत. त्यांच्या दर्शनाची मनामध्ये इच्छा धरून ते शिरडीचा शोध करीत चालले. शिरडीमध्ये हरिद्वारचे स्वामी सोमदेवजी होते. त्या स्वामींची व विजयानंद स्वामींची भेट झाली.

विजयानंद संन्यासी बुवांनी त्या स्वामींकडे चौकशी केली की, येथून मानस सरोवर किती दूर आहे. स्वामींनी सांगितले, येथून मानस सरोवर पाचशे मैल दूर गंगोत्रीवर आहे. तेथे बर्फ फारच पडत असतो. पन्नास कोसात भाषा बदलते. तेथील भूतानी लोकांना परदेशीय लोकांचा संशय येतो व ते त्यांना खूप त्रास, पीडा देतात.

ही स्वामींनी सांगितलेली माहिती ऐकून तो मद्रासी संन्यासी दुःखी झाला. त्यांचे मन दुश्चित्त झाले. तो चिंतामग्न झाला. त्यांनी श्री साईबाबांचे दर्शन घेतले व त्यांच्या पायी लोटांगण घातले. त्यावेळी त्यांचे मन प्रसन्न झाले. ते साईबाबांसमोर आसन घालून बसले. त्यांना पाहून साईबाबांची वृत्ती खवळली. ते तेथील मंडळींना म्हणाले की, त्या संन्याशाला काही कामाची संगती नाही. त्याला हाकलून द्या. तो संन्याशी नवा असल्यामुळे त्यांना साईबाबांचा स्वभाव माहिती नव्हता. जरी ते मनात खिन्न झाले, तरी ते स्वस्थ बसून राहिले.

शिरडीतील प्रातःकाळींचा दरबार पाहून ते चकित झाले. मशीदीमध्ये बरीच भक्तमंडळी येत होती. त्याठिकाणी साइबाबांची पूजा अर्चा, भजनपूजन चालत असे.

तेथे काही भक्त बाबांचे पाय धूत होते, तर कोणी बाबांचे चरण तीर्थ पळीत घेवून शुद्ध भावाने सेवन करीत होते, तर कोणी ते चरण तीर्थ डोळ्यांना लावीत होते, काही

लोक बाबांच्या कपाळी गंध लावीत होते, तर कोणी बाबांना सुगंधीत अत्तरे लावीत होते. ही बाबांची सेवा चालू असताना तेथे कोणताही भेदभाव नव्हता. हा ब्राम्हण, हा शुद्र, उच्च-नीच असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव नव्हता.

जरी बाबा संन्यासी बुवांवर रागावले होते, तरी बुवांना बाबांविषयी प्रेम निर्माण झाले होते. त्यांना बसल्या जागेवरून उठवेना. तसेच त्यांचे पाऊल मागे किंवा पुढेही पडेना. बुवांना शिरडीत दोन दिवस झाले असतील, इतक्यात बुवांना त्यांच्या गावावरून त्यांची आई जास्त आजारी असल्याबद्दल पत्र आले. त्यामुळे ते फार दुःखी झाले. त्यांच्या मनात असे विचार आले की, आपण गावास जाऊन आईस भेटून यावे. परंतु त्यांना श्री साईबाबांच्या आज्ञेवाचून आपले पाऊल बाहेर काढवेना. नंतर तो संन्यासी पत्र घेऊन मशिदीत गेला आणि आपल्या आईची ती स्थिती सांगून बाबांना ते विनंती करू लागले. बाबा, श्री साईसमर्था, मला आईस भेटावेसे वाटते. मला मार्गस्थाला घरी जाण्यास परवानगी मिळावी. त्यांनी बाबांचे चरण घट्ट पकडले आणि ते सांगू लागले की, माझी माता प्राण कंठात घेऊन जमिनीस खिळलेली असेल. ती मी घरी येईन म्हणून माझी वाट पाहत असेल. माझी व तिची भेट झाल्यामुळे तिचे दुःख हलके होऊन सुखाने ती प्राण सोडील.

श्री साईसमर्थ हे पूर्ण अंतर्ज्ञानी होते. संन्यासी बुवांचे आयुष्य संपलेले आहे, हे जाणून बाबा बुवांस म्हणाले, "तुला इतका आईचा लळा होता तर तू हा संन्याशाचा वेष का पत्करला होतास? तुला हे शोभत नसून, तू या भगव्या वेषाला कलंक लावलास. जा तू शांत बस. तू काही दुःखी, कष्टी होऊ नकोस. थोडे दिवस गेल्यानंतर पुढील विचार करू. तू मनात धीर (धैर्य) धर. या वाड्यामध्ये पुष्कळ चोर आहेत. ते सर्वस्व लुटून नेतील, तेव्हा आपण वाड्याचे दरवाजे लावून सावध राहावे.

"वैभव कधीही नव्हे शाश्वत। शरीर हें तो सर्वदा अनित्य।
जाणूनि मृत्यु नित्य सन्निहित। धर्म जागृत ठेवावा।। साई सत्चरित्, अध्याय ३१, ओवी ३८.

आपले वैभव, आपली धनदौलत ही शाश्वत नाही. त्या धनदौलतीची आपण आसक्ती धरू नये. तसेच आपले शरीर हे सुद्धा क्षणभंगूर आहे, त्याचा कधी नाश होईल ते आपल्याला सांगता येत नाही. आपल्या मृत्यूला आपण कधीही भिता कामा नये. मृत्यू आला तर आपण त्याचे आनंदाने स्वागत करावे. मृत्यू हा नेहमी आपल्या जवळ उभा आहे, असे समजून आपण आपला धर्म जागृत ठेवावा.

तुझी पूर्वपुण्याई श्रेष्ठ म्हणून तू इतक्या लांबून या शिरडी क्षेत्री आलास. आता माझ्या वचनांवर विश्वास ठेव, आणि आपल्या जीवाचे सार्थक करून घे.

उद्यापासून भागवत पारायण कर. या ग्रंथाचे तू काया, वाचा, मने करुन तीन सप्ताह कर. हे पारायण चालू असताना तुझे मन निर्विषय कर, तसेच या ग्रंथाचे श्रवण, वाचन व निदिध्यासन (मनन) कर. कोणत्याही प्रकारची वासना धरू नकोस. या ग्रंथाचे पारायण केल्याने तुला भगवंत प्रसन्न होईल. तुझी सर्व दुःखे नाहीशी होतील. तुझे माया मोहादि षड्विकार नष्ट होऊन तुला सौख्य लाभेल. आपण स्वतः शूचिर्भूत राहून, परमेश्वराच्या ठिकाणी एकाग्र मन करून हे व्रत आचरले तर मोहनिर्मुक्त होशील.

जेव्हा बाबांच्या देहास अपाय झाला, तेव्हा बाबांनी हाच उपाय योजिला. त्यांनी रामविजय वाचवून घेतला. दुसरे दिवशी प्रातःकाळी लवकर उठून, मुखमार्जन, स्नान इत्यादी कार्यक्रम उरकून बुवांनी बाबांस फुले वाहिली व त्यांची चरण धुळ मस्तकी धारण केली. त्यांनी काखेस भागवत घेतले. त्यांना शांत वातावरण असलेली लेंडी बाग हे स्थान पसंत पडले. त्यांनी आसन घालून पारायण करण्यास सुरूवात केली. ते संन्याशी भगवद्‌भक्ती पारायण होते. त्यांनी भागवताचे दोन सप्ताह पूर्ण केले. तिसरा सप्ताह चालू केला असताना त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यांचा अशक्तपणा वाढू लागला. तो सप्ताह तसाच अपूर्ण ठेवून ते वाड्यात परतून आले. दोन दिवस खूप कष्ट काढले. तिसऱ्या दिवशी त्या बुवांनी डोळे झाकले. त्यांनी आपले डोके फकीर बाबांचे मांडीवर ठेवले व त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

संन्याश्याचे देहावसान झाले ही बातमी बाबांना कळली तेव्हा बाबांनी त्या संन्याशाच्या देहाचे एक दिवस रक्षण करण्यास सांगितले. इतक्यात त्याला पुरुन टाकू नका. त्याचे पुनर्जीवन होईल. बाबांचा शब्द प्रमाण मानून लोकांनी त्या देहाचे जतन केले. परिणामी ते फळा आले, बेवारसी प्रेम रक्षिले गेले, त्यामुळे पोलिसांचा संशय फिटला. मेलेल्यास कसे उठवावे हे काय बाबांस ठाऊक नव्हते? योग्य चौकशी करून त्या प्रेताला जमिनीत पुरुन टाकावे. बेवारसी प्रेताचा धनी राजा (सरकार) असतो. तो आकस्मिक मरणाची चौकशी करतो. म्हणून ते प्रेत आधीच पुरुन टाकू नये, म्हणून बाबांनी ही बतावणी केली. अशा प्रकारे बाबांनी योग्य स्थळी यथाविधि ते प्रेत संस्कारिले आणि आपले कार्य केले.

संसारा आलिया एक सुख आहे। आठवावे पाय श्रीसाईंचे ।।
तेंणे होय सर्व सुखाचा संसार। न लगे दुःखाचा लेश काहीं ।।

# साईप्रसाद

**— सौ. वंदना वामन पारकर**
मु. पो.-तळेबाजार, ता.-देवगड,
जि.-सिंधुदुर्ग.

मला पहिल्या चार मुली आहेत. आपल्याला एक मुलगा असावा ही प्रत्येकाची इच्छा असते, तशीच माझ्याही मनात पुत्र प्राप्तीची इच्छा घर करुन बसली होती. माझी साईबाबांवर नितांत श्रद्धा आहे. माझी इच्छा पूर्ण व्हावी म्हणून मी त्यांना अनन्यपणे शरण गेले. कळकळून प्रार्थना केली की, मला मुलगा झाला तर मी त्याला तुमच्या पाया पर्यंत घेऊन येईल.

बाबांनी माझी ही हाक ऐकली आणि वर्षाच्या आत मला मुलगा झाला. मला व माझ्या घरातील सर्वांना आनंद झाला. आम्ही त्याचे नाव साईप्रसाद ठेवले आहे. बाबांच्या कृपेने तो सुखी आहे. त्याला घेऊन आम्ही शिर्डीला जावून आलो. तो आता दीड वर्षाचा आहे. अशा अनेक इच्छा बाबांच्या कृपेने झाल्या आहेत.

# आपले गुरु.... श्री साईबाबा

— श्री. गुरुनाथ विष्णू पन्हाळकर
३१२ डी, रंकाळावेस,
कोल्हापूर-४१६ ००२.

"गुरुविण कोण दाखविल वाट? आयुष्याचा पथ हा दुर्गम अवघड डोंगर वाट"

आपण सर्व शाळेत जातो. शिक्षकांना आपले गुरु मानतो. त्यांची आज्ञा पाळतो. त्यांना मान देतो. आदराने वंदन करतो. हे सगळे का? कारण शिक्षक आपल्याला योग्य तऱ्हेने मार्गदर्शन करुन आपल्याला आपल्या जीवनाची दिशा दाखवितात, आपणास लहान वयात योग्य ते वळण लावतात, मार्गदर्शन करतात. ज्या प्रमाणे रात्री समुद्रात फिरणाऱ्या जहाजांना दिपस्तंभ दिशा दाखवितो, त्याप्रमाणे दिशाहीन भरकटणाऱ्या म्हणजे ज्याला योग्य ते मार्गदर्शन मिळत नाही त्याला शिक्षक दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करतात.

ज्यावेळी शाळा संपवून म्हणजेच शिक्षण संपवून विद्यार्थी या जगात येतो, शाळेतून बाहेर पडतो, त्यावेळी त्याचा प्रवास एखाद्या जहाजाप्रमाणे सुरु होतो. काही वेळा त्याला मार्गदर्शनाची गरज लागते. सगळीकडेच पुस्तकी ज्ञान उपयोगी पडत नाही. पुष्कळांचे सल्ले तो घेतो. काहीजण त्याला योग्य तो सल्ला देतात, काही त्याला फसवतात. मग अपयश आल्यामुळे तो निराश होतो, तो अध्यात्माच्या मागे लागतो, तो गुरुचा शोध घेऊ लागतो.

पुराणात, इतिहासात आपण गुरुबद्दल गोष्टी वाचतो. याबाबत ४-५ उदाहरणे म्हणून घेता येतील:-

१) श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरु श्री दादोजी कोंडदेव! शिवाजींनी त्यांना गुरु मानले. त्यांच्याकडून सर्व विद्या शिकून घेतल्या. त्यांची प्रत्येक आज्ञा ते मानत राहिले. दादोजी कोंडदेवांनी पण त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले. म्हणूनच आज शिवाजी महाराज हे युगपुरुष एक श्रेष्ठ पुरुष म्हणून त्यांची पूजा केली जाते.

२) संतश्रेष्ठ श्री नामदेव महाराज ह्यांचे गुरु श्री विसोबा खेचर! प्रत्यक्ष श्री विठोबांनी नामदेवास त्यांच्याकडे जावयास सांगितले. जेव्हा नामदेव विसोबा खेचराकडे गेले, त्यांना पाहिले. त्यांना असे वाटले की, हे काय आपणास मार्गदर्शन करणार? परंतु ज्यावेळी नामदेवांनी त्यांचा चमत्कार पाहिला (पाय ठेवील तिथे शंकराची पिंड) त्यावेळी नामदेवांची खात्री पटली व त्यांना त्यांनी आपले गुरु केले. आपले सगळे तन मन धन त्यांच्या चरणी अर्पण केले.

३) श्री गोंदवलेकर महाराज, लहान वयात गुरु शोधार्थ घराबाहेर पडले. ते भारतभर हिंडले. पुष्कळ गुरु त्यांनी बघितले परंतु त्यांचे काही समाधान होईना. शेवटी ते निराश होऊन विचार करीत बसले. त्याच्यापुढे श्री रामकृष्ण नावाचे एक सत्पुरुष प्रकट झाले. त्यांनी सांगितले की, "तू येहेळगावला तुकामाईकडे जा. तिथे तुझे पूर्ण समाधान होईल." महाराज तुकामाईकडे गेले. त्यांना प्रथम पाहिल्याबरोबर आपल्याला खरा गुरु आज

भेटला याचे समाधान झाले. महाराजांनी तुकामाईची भरपूर सेवा केली. आपले तन मन सर्वस्वी त्यांच्या सेवेत अर्पण केले. तुकामाईंनी त्यांना योग्य मार्गदर्शन करुन मोठ्या पदास पोहोचवले. आज गोंदवलेकर महाराज श्रेष्ठ संत म्हणून गणले जातात.

४) दक्षिण काशी कोल्हापूर येथील असेच एक सत्पुरुष दत्तावतार श्रीकृष्ण सरस्वती! यांचे गुरु श्री स्वामी समर्थ अक्कलकोट लहान वयात श्रीकृष्ण सरस्वतींना प्रत्यक्ष शंकरपार्वती यानी दर्शन देऊन स्वामी समर्थांकडे जावयास सांगितले, त्याप्रमाणे महाराज अक्कलकोटला गेले. त्यांची सेवा करुन श्रेष्ठ पदास पोचले.

असो, वरील उदाहरणांवरुन असे दिसून येते की, योग्य गुरु सहजासहजी प्राप्त होत नाही. त्यास कष्ट घ्यावे लागतात. आपले तन मन सर्वस्वी गुरुचरणी अर्पण करावे लागते. ज्याप्रमाणे कुठलीही विद्या सहजा सहजी मिळत नाही, त्याप्रमाणे योग्य गुरु सहजासहजी मिळत नाही, त्यास कष्ट घ्यावे लागतात.

आजच्या युगात मी बाबांना, साईबाबांना माझे गुरु मानतो. त्यांची जमेल तशी सेवा करतो. उदा. पुजा, दर्शन, नामस्मरण वगैरे. आपणही बाबांना मनोभावे शरण जा. रात्रंदिवस त्यांचे चिंतन , नामस्मरण करा. बाबा तुमची काही वेळा परीक्षा पाहतील, त्यावेळी मागे हटू नका. बाबांना मनोभावे शरण जा. त्यांच्या वचनाप्रमाणे "शरण मज आला आणि वाया गेला! दाखवा दाखवा ऐसा कोणी।।" याचा तुम्हाला अनुभव येईल. ज्याप्रमाणे शाळेतील शिक्षकांना आपण आपले गुरु मानतो, त्याप्रमाणे बाबांना आपले गुरु मानून त्यांची श्रद्धेने सेवा करा. आपले सुख दुःखे त्यांना सांगा. ते निश्चितपणे तुम्हास त्यातून तरुन नेतील. तुम्हाला मार्ग दाखवितील. "माझा जो जाहला काया वाचा मने तयाचा मी ऋणी सर्वकाळ।" बाबांची सेवा करताना श्रद्धापूर्वक सेवा करा. "मनात नाही भाव, देवा मला पाव" ही वृत्ती नको. दुसरे सांगतात म्हणून मी करतो अशी सेवा नको. किंवा "कामा पुरता मामा" अशी सेवा नको. काम झाले की कोण बाबा आणि कसले काय? अशी सेवा नको. जी काही थोडीफार सेवा कराल, ती श्रद्धेने करा. मग पहा बाबांचा चमत्कार! 'बाबांची सेवा करताना तुम्हास एका वचनाची प्रचिती येईल, "जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तासाठी."

ज्याप्रमाणे शिवाजी महाराज, कौरव-पांडव, श्रीकृष्ण सरस्वती यांनी आपले लक्ष गुरुसेवेत केंद्रीत केले होते, आपले तन मन गुरुसेवेत अर्पण केले होते, त्याप्रमाणे आपणही बाबांची मनापासून सेवा करा.

आजच्या कलीयुगात बाबा हेच आपले गुरु! त्यांची आपण मनोभावे सेवा करा व बाबा आपला उद्धार करतील. "तुमचा मी भार वाहीन सर्वथा! नव्हे हे अन्यथा वचन माझे।।"



# परमेश्वरी अवतार श्री साईबाबा

— श्री. विलास पर्शराम तांटरे
मु. पो. वांद्री,
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

आजच्या या अखंड विश्वामध्ये परमेश्वराने जे प्राणी जन्माला घातले आहेत त्यामध्ये मानव जन्म सर्वात श्रेष्ठ आहे. परमेश्वराने आपली सेवा करण्यासाठी, भक्ती करण्यासाठी मानवाला जन्माला घातले आहे. प्रत्येक मनुष्यप्राण्याने आपल्याला परमेश्वराने बहाल केलेल्या जीवनाचे सार्थक करुन घेणे आवश्यक आहे. आपल्या जन्माचे सार्थक करुन घ्यायचे असेल, आपल्याला मोक्ष मिळवायचा असेल, चौऱ्यांऐंशी योनिचा फेरा चुकवायचा असेल तर प्रत्येकाने परमेश्वराची भक्ती केली पाहिजे. परमेश्वराचे नामस्मरण केले पाहिजे. आणि म्हणून भक्ती हा एकच मार्ग आहे. आजच्या या कलियुगात परमेश्वराची भक्ती करण्यासाठी किंवा परमेश्वराला प्रसन्न करुन घेण्यासाठी पूर्वीच्या साधुसंतांप्रमाणे महान तपस्व्याप्रमाणे एकांन्तवासात जावून एखाद्या झाडाखाली बसून तपश्चर्या करावी लागत नाही किंवा चितंत करावे लागत नाही. परमेश्वराचे नामस्मरण करणे हिच भक्ती होय.

आजच्या या कलियुगात मानव हा व्यसनाधिन झाला आहे, लोभाच्या आहारी गेला आहे, श्रीमंत लोक गरीबांवर जुलूम करु लागले आहेत. मानवाला शांन्ती, स्वास्थ्य न मिळाल्याने मानव कृत्रिम उत्तेजन देण्याच्या गोष्टीमध्ये स्वतःला विसरला, अनीती फोफावली, गुन्हेगारी फैलावली, धर्माची चेष्टा होवू लागली, जातीभेद व धर्मभेद वाढू लागला, मानव हताश झाला. परमेश्वराची श्रद्धा नाहिशी झाली, विनाशाची लाट थोपवून धरण्यासाठी कोणतीही शक्यता नाहीशी झाली आणि नेमक्या अशाच वेळी परमेश्वराने मानवाला सन्मार्गाकडे वळवण्यासाठी, माणसाला भक्तीमार्गाकडे वळवण्यासाठी, परमेश्वराचे अस्तित्व दाखवण्यासाठी परमेश्वराने मानव रुपात जन्म घेतला. आणि साईबाबांसारखे अवतारी सत्पुरुष निर्माण झाले. हा परमेश्वर अवतार म्हणजेच आपले साईबाबा होय!

साईबाबांनी अवतार घेवून माणसामाणसातील आणि समाजातील भेदभाव नाहिसे करुन मानवाला विश्वबंधुत्वाचे व प्रेमाचे नाते निर्माण करण्याचे महान कार्य केले. बाबांनी आपल्या स्वयंभू साक्षात्काराने एकात्मतेची, समभावाची व भक्तीमार्गाची ज्योत सतत तेवण्यासाठी आपली सर्व शक्ती खर्च केली. साईबाबा हे अनाथांचे नाथ होते. दिनांचे कैवारी होते. त्यांचे जीवन दुसऱ्याच्या कल्याणासाठी होते. सर्व सामान्य लोकांना सुलभ मार्ग सांगणे, प्रपंचात राहून परमार्थ कसा करावा याची शिकवण देणे, लोकांच्या मनात श्रद्धा निर्माण करणे, हिंदू-मुस्लीम ऐक्य घडवून आणणे, दीनदुबळ्यांचे दुःख दूर करणे हे साईबाबांच्या अवताराचे प्रयोजन होते. साईबाबांनी या जगामध्ये परमेश्वराचे अस्तित्व आहे की नाही हे दाखविण्यासाठी अनेक चमत्कार करुन पटवून दिले. त्यातील एक चमत्कार येथे देत आहे.

एक छोटेसे धुपखेडे नावाचे गाव होते. तेथे चांदभाई नावाचा पाटील राहात होता.

त्याचा घोडा रानामध्ये हरवला होता. घोडा शोधण्यासाठी चांदभाई रानामध्ये उन्हातान्हातून भटकू लागला. त्याच अरण्यात साईबाबा एका झाडाच्या सावलीला विश्रांतीसाठी बसले होते. बाबांनी चांदभाईला उन्हातून फिरताना पाहिले आणि त्यांना जवळ बोलावून भटकण्याचे कारण विचारले तेव्हा चांदभाईनी आपला घोडा हरवल्याचे सांगितले. बाबांनी सांगितले, घोडा इथेच येईल, काही काळजी करु नकोस, आपण इथे थोडा वेळ चिलिम ओढू या. त्याप्रमाणे त्यांनी चिलिम भरली. परंतु त्यांच्याजवळ विस्तव नव्हता. चांदभाई विचारात पडले. बाबांनी हे जाणले. बाबांनी आपल्या हातातील काठी जमिनीवर आपटली. त्याबरोबर अग्निचा एक मोठा निखारा तिथे निर्माण झाला. बाबांनी चिलिम पेटविली बाबा चिलीम ओढताहेत इतक्यात चांदभाईचा घोडा रानातून धावत येवून बाबांजवळ उभा राहिला. चांदभाईला याचे आश्चर्य वाटले आणि आनंद झाला. याप्रमाणे साईबाबांनी आपल्या भक्तांना अनेक चमत्कार करुन दाखविले.

## श्री साई उदीचा प्रभाव

माझ्या लग्नाला तीन वर्षे होत आली तरी आमच्या घरात पाळणा लागत नव्हता. आम्ही डॉक्टर तपासणी करुन पाहिली. खूप औषधोपचार केला. परंतु काहीच उपयोग होत नव्हता, काहीच चिन्हे दिसत नव्हती. शेवटी निराश होवून डॉक्टरी उपचार व औषधे बंद करण्याचा विचार केला. पूर्वीपासून मी 'साईलीला' मासिकात साईभक्तांचे अनुभव वाचत होतो की, साईबाबांना विनंती केली असता बाबा भक्तांच्या हाकेला धावून येतात आणि आपल्या भक्तांना संकटमुक्त करतात. त्याप्रमाणे मीही सकाळी स्नान वगैरे करुन आमच्या घरामध्ये बाबांची एक लहान मूर्ती-फोटो आहे, त्यांच्यासमोर मी हात जोडून उभा राहिलो, आणि बाबांना विनंती केली, बाबा आमच्या घरात पाळणा लागू दे व त्याच दिवसापासून मी माझ्या सौ. ला रोज स्नान केल्यानंतर बाबांची उदी प्राशन करण्यास सांगितले आणि काय चमत्कार! एक महिन्यातच सौ. ला दिवस गेले. बाबांच्या कृपेने आम्हाला मुलगी झाली. साईबाबा आपल्या भक्ताच्या विनंतीला धावून आले आणि बाबांनी माझी प्रार्थना सिद्धीस नेली म्हणून मुलीचे नाव 'सिद्धी' ठेवीले आहे. ही सारी बाबांच्या उदीची किमया. साईबाबांची उदी म्हणजे हे एक रामबाण औषध आहे. परंतु साईबाबांवर आपली श्रद्धा पाहिजे.

## लेखक - कवींस निवेदन

**श्री साईलीला मासिकाकडे साहित्य पाठविताना लेखक-कवींना पुढील गोष्टींची दक्षता घेणे आवश्यक आहे.**

**सुवाच्च अक्षरात कागदाच्या डाव्या बाजूस भरपूर समास सोडून लिखाण असावे, ते पाठोपाठ असू नये, शक्यतो टंकलिखित असावे.**

**हयात असलेल्या संतांविषयीचे लेख, सामान्य दर्जाचे अनुभव पाठवू नयेत.**

**अभ्यासपूर्ण, तर्कशुद्ध, मीमांसक व वैचारिक स्वरुपाच्या लेखांना प्राधान्य दिले जाईल.**

**का.सं.**

# श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

**— अनुवादक — साईनंद**

सोमवार १५-१-१९१२.

मी सकाळी लवकर उठलो. प्रार्थना केली आणि काकड आरतीस उपस्थित राहिलो. मेघाला अद्याप बरे वाटत नसल्याने ते नेहमीच्या वेळेवर शंखनाद करण्याकरीता उठू शकले नाहीत. त्यामुळे काकड आरतीला नेहमीपेक्षा थोडा उशिर झाला. साई महाराजांनी एकही शब्द उच्चारला नाही, जेव्हा ते उठून चावडी बाहेर निघाले. उपासनी शास्त्री आणि बापुसाहेब जोग लवकर आले नसल्याने मी पत्रे लिहिण्याकरीता बसलो. जेव्हा साईमहाराज बाहेर पडले तेव्हा त्यांनी मला सकाळ कशी घालवल्याचे विचारले, ज्यातून मी वाचन न केल्याबद्दल व त्यासंदर्भात काळजी न वाहिल्याबद्दल माझी सौम्य खरडपट्टी होती हे सूचित होत होते.

ते जेव्हा परतले तेव्हा मी त्यांना पुन्हा पाहण्याकरीता गेलो. त्यावेळी त्यांच्या मुखकमलावर कृपाळू भाव होता. त्यांनी एक दीर्घ कथा सांगितली. परंतु मी त्यावेळी झोपण्याच्या गुंगीत असल्याने मला त्या गोष्टीतील काहीच कळले नाही. त्यानंतर मी कुणाकडून तरी ऐकले की ती कथा म्हणजे श्री. गुप्ते यांच्या जीवनात प्रत्यक्ष घडलेली घटना होती. त्यामुळे त्यांनी ती सांगितली. दुपारची आरती उशिरा झाली. त्यावेळी तीन वाजले होते. तद्नंतर आम्ही परतलो आणि जेवण उरकले. मी काही क्षण पहुडलो आणि दिक्षितांच्या पुराणाला उपस्थित राहिलो. त्यानंतर आम्ही मशिदीत गेलो परंतु दूर अंतरावरुन नमस्कार करण्यास सांगण्यात आले. त्याबरहुकूम आम्ही केले. साईबाबा जेव्हा फेरफटका मारण्यास आले तेव्हा नेहमीप्रमाणे आम्ही त्यांना नमस्कार केला. दिक्षित काल मशिदीची रोशनाई करत होते. आजही त्यांनी ते काम पुढे चालू ठेवले. रात्री नेहमीप्रमाणे भीष्मांचे भजन आणि दिक्षितांच्या पुराणांचे वाचन झाले.

मंगळवार १६-१-१९१२

मी नेहमीप्रमाणे सकाळी उठलो, प्रार्थना केली आणि परमामृताने नित्यक्रमास प्रारंभ केला. हे वेदांतावरील मराठीतील उत्कृष्ट पुस्तक आहे. उपासनी वाचतात, मी. बापुसाहेब जोशीव भीष्म हे आम्ही सर्व ते ऐकतो. जेव्हा आवश्यक असते तेव्हा मी त्याचे स्पष्टीकरण देतो. बाहेर जाताना मी साईमहाराजांना पाहू शकलो परंतु उशीर झाल्याने मी त्यांना मशिदीत परतताना पाहू शकलो नाही. त्यांनी माझ्या बाबतीत असंतोषी वृत्ती दाखवली नाहीच उलट त्यांनी मला कृपाळू वागणूक दिली. मी सेवाशुश्रुषा करण्यासाठी बसलो. मेघा आजारी असल्याने दुपारची आरती उशिरा झाली आणि त्यांना त्वरेने येण्याकरिता फर्माविण्यात आले नव्हते. परंतु शेवटी त्यांनी असे केले. त्यानंतर आम्ही परतलो आणि आमचे जेवण घेतले. त्यावेळी संध्याकाळी चारचा सुमार होता. दिक्षितांनी रामायणातील काही भाग वाचल्यानंतर आम्ही मशिदीत साईसाहेबांना पहावयास गेलो. त्यांनी आम्हाला जास्त वेळ बसू दिले नाही; तेही बाहेर आले आणि घाईघाईने त्यांनी

नेहमीप्रमाणे फेरफटका मारला. वाड्यात त्वरीत परतण्यासाठी त्यांनी आम्हाला हुकूम केला. साईबाबांच्या ह्या वागण्याचे त्यावेळी आम्हाला काही कळू शकले नाही. वाड्याकडे परतत असताना आम्ही, दिक्षितांचा नोकर, जो आजारी होता, त्याचे निधन झाल्याचे आम्ही ऐकले. आम्ही त्याला उपासनींकडे पाठविले होते, ज्यांना औषधांची जाण होती. परंतु त्याला काही ते सापडू शकले नाहीत. आम्ही नेहमी प्रमाणे वाड्यात आरती केली आणि शेज आरतीस उपस्थित राहिलो. विशेषतः साईमहाराज आनंदी मनः स्थितीत होते, त्यांनी प्रसन्न वातावरण निर्माण केले आणि सूचनाही केल्या. त्याच प्रमाणे त्यांनी राममारूतीलाही लाभ दर्शविला.

बुधवार १७-१-१९१२.

मी बऱ्याच लवकर उठलो. बापुसाहेब जोग आंघोळीस गेले असल्याचे कळले. तोपर्यंत मी माझी प्रार्थना संपवली. त्यानंतर आम्ही काकड आरती करिता चावडीत गेलो. मेघा अतिशय आजारी असल्याने काकड आरतीस उपस्थित राहू शकले नाहीत म्हणून बापुसाहेब जोग यांनी आरती केली. साईबाबांच्या चेहऱ्यावर स्मित हास्य लहरत होते. कित्येक वर्षानंतर एकदाच त्यांचा असा चेहरा पाहण्यास मिळतो. मला अत्यानंद झाला आणि भ्रमिष्टासारखा मी तेथे उभा राहिलो. आम्ही जेव्हा परतलो तेव्हा नारायणरावांचे चिरंजीव गोविंद व बंधु भाऊ खटाऱ्यातून कोपरगावला निघाल्याचे व वाटेत होशंगाबादला जाणार असल्याचे कळले. मी नित्य क्रमास आरंभ केला, काही ओळी लिहिल्या व उपासनी, बापुसाहेब जोग यांच्या सोबत परमामृत वाचले. साईमहाराजांना बाहेर जाताना आणि त्यानंतर पुन्हा मशिदीत परतताना आम्ही पाहिले. त्यांनी मला सूचना केल्या परंतु मी मूर्ख असा की, मी त्या समजू शकलो नाही. वाड्याकडे परतत असताना कारण नसतानाही मला चिंतेने ग्रासल्यासारखे भासत होते. बलवंतला देखील कष्टी वाटत होते आणि शिरडी सोडून जाण्याविषयी त्याने इच्छा व्यक्त केली. मी त्याला साईबाबांना विचारून काय तो निर्णय घेण्यास सांगितले. जेवल्यानंतर काही वेळ मी आराम घेतला आणि त्यानंतर दिक्षितांचे रामायण ऐकण्याची इच्छा होती. परंतु साईबाबांनी त्यांना पाठविले व त्यांना जाणे भाग पडले. कसेतरी करण्याचा आम्ही प्रयत्न केला परंतु त्यात आम्ही प्रगती करू शकलो नाही. खांडव्याचे तहसिलदार साहेब प्रल्हाद अंबादास यांना परतण्याकरीता अनुमती देण्यात आली. त्यांच्यासोबत जळगावचे श्री. पाते आणि लिंगायत होते. ते उद्या निघण्याची शक्यता आहे. संध्याकाळच्या फेरफटक्याच्यावेळी आम्ही साईबाबाना पाहिले. ते अगदी आनंदी मनःस्थितीत होते. रात्री नेहमीप्रमाणे भीष्मांचे भजन व दीक्षितांचे रामायण झाले. वाड्यातील आरतीच्या वेळी सकाळी मला देण्यात आलेल्या सूचना काय होत्या त्या उमगल्या व मला समाधान वाटले.

# साई दरबारातील नवरत्ने----७
# श्रीमान गोपाळराव उर्फ बापूसाहेब बुट्टी



**श्री साईनाथांचे समवेत श्री. गोपाळराव बुट्टी यांचे घेतलेले छायाचित्र. विशेष लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे गोल टोपी घातलेल्या बुट्टी यांचे लक्ष नेहमीच श्रींच्या चरण युगुलाकडेच असायचे.**

श्रीसाईसच्चरित्राचे नियमाने पारायण करणाऱ्या साईभक्तांना साईबाबांशी ज्यांचा निकटचा परिचय होता त्या सर्व भक्तांची नावे परिचित आहेतच. त्यामध्ये बापूसाहेब बुट्टी हे एक भक्त आहेत. श्रीसाईसच्चरित्रातील अध्याय ४,१३,२२,४३,४४ मध्ये त्यांचा उल्लेख निरनिराळ्या कारणांनी आलेला आपणास दिसतो. श्रीसाईबाबांच्या इतर भक्तांचाही उल्लेख साईसच्चरित्रामध्ये ठिकठिकाणी येतोच; परंतु बापूसाहेब बुट्टींच्याइतका विविध संदर्भात अन्य फारच थोड्या भक्तांचा उल्लेख त्या पोथीत सापडतो आणि म्हणूनच साईदरबारातील एक प्रमुख भक्त, असा त्यांचा उल्लेख करावा लागेल.

बापूसाहेब बुट्टी ह्यांचे मूळ नाव गोपाळराव असे होते; परंतु त्याकाळी बऱ्याच लोकांना घरच्या माणसांनी हाक मारण्याचे एक विशिष्ट नाव असे व त्या नावाला साहेब ही बिरुदावली चिकटवून त्या व्यक्तीबद्दल आदर व्यक्त करण्याची पद्धत होती. नानासाहेब चांदोरकर, काकासाहेब दीक्षित अशा प्रकारच्या अन्य नावांचा उल्लेख साईसच्चरित्रामध्ये नेहमी आलेला असून, तो ह्याच प्रकारच्या आदराचे प्रतीक आहे. बापूसाहेबांचे घराणे मूळचे नागपूरचे. त्यांचा आलिशान वाडा नागपूरच्या सीताबर्डी ह्या भागात होता. ह्यांच्या घराण्यात सावकारीचा धंदा कित्येक शतके चालू होता. पेशव्यांचे सावकार ज्याप्रमाणे खुद्द पुण्यात होते, त्याचप्रमाणे नागपूरकर भोसल्यांचे सावकार म्हणून बुट्टी ह्यांची प्रसिद्धी होती, तेव्हा त्यांच्या घरी किती अलोट संपत्ती असावी, ह्याची कल्पनाच केलेली बरी,

आणि अशा संपत्तीचा थोडाफार गर्व बापूसाहेबांना असल्यास त्यात फार काही वावगे होते, असेही म्हणता येणार नाही!

बापूसाहेबांच्या गर्वाविषयीचा थोडा उल्लेख 'श्रीगजाननविजय' ह्या शेगावच्या गजाननमहाराजांच्या चरित्रात आहे तो असा. श्रीगजाननमहाराज शेगावी रहावयाचे व तेथेच राहाण्यात त्यांना बरे वाटावयाचे, पण एकदा बुट्टींनी त्यांना नागपूरास येण्याची विनंती केली व ती मान्य करून महाराज नागपूरला श्री. बुट्टींकडे गेले. बुट्टींच्याकडे संपत्तीचा पूर लोटत असल्यामुळे नोकरचाकर भरपूर होते, त्यामुळे श्रीगजाननमहाराजांना काहीच कमी नव्हते. त्यांची बडदास्त चांगली ठेवली गेली होती. पण महाराज ह्या प्रकारच्या एकलकोंड्या जीवनाचे भोक्ते नव्हते. त्यांना सदोदित भक्तांच्या मेळाव्यात राहाण्याची आवड होती. त्यामुळे त्यांनी बुट्टींना दोन-तीन वेळा सांगितले,

"मला पुन्हा शेगावला जावयाचे आहे, तर त्याप्रमाणे मला पोचविण्याची व्यवस्था करावी."

परंतु बुट्टींनी ही गोष्ट मनावरच घेतली नाही. त्यांनी मनाशी ठरविले होते, की आता महाराजांना कायमच नागपूरला ठेवून घ्यावयाचे व शेगावला परत जाऊच द्यायचे नाही.

इकडे महाराजांची ही अवस्था, तर तिकडे शेगावला भक्तांची ही अवस्था निराळीच! अक्रूराने श्रीकृष्णाला गोकुळातून वृंदावनात नेल्यामुळे ज्याप्रमाणे गोकुळ सुने सुने झाले, त्याप्रमाणेच श्रीगजाननमहाराजांच्या भक्तांना शेगाव अत्यंत सुने सुने वाटू लागले व त्यांनी महाराजांना परत बोलाविण्यासाठी निरोप पाठविले. परंतु बुट्टींच्या वाड्यावरचे रखवालदार इतके पक्के होते की, ते त्यांपैकी कोणालाच महाराजांपर्यंत पोचूच देत नसत. मग महाराजांपर्यंत त्यांच्या भक्तांची तळमळ पोचावी कशी? शेवटी महाराजांचा एक परमभक्त श्री. हरी पाटील याने नागपूरला जाऊन महाराजांना परत शेगावला घेऊन यावे असे ठरले. त्याप्रमाणे हरी पाटील आणखी दोन-तीन भक्तांसह नागपूरला गेले; परंतु नेहमीप्रमाणे बुट्टींच्या वाड्याच्या रखवालदारांनी पाटलांना अडविले व आत जाण्यास मज्जाव केला. पण हरी पाटील कच्च्या गुरूचे चेले नव्हते. त्यांनी ठरविले होते; त्याप्रमाणे ते दंडेली करून आत घुसले व थेट महाराजांच्या पुढे जाऊन उभे राहिले. इकडे बुट्टींच्या घरी त्यांच्या इतमानाप्रमाणे भोजनाची पंगत मांडण्यात आली होती. चांदीची ताटे, चांदीच्या वाट्या व भांडी व त्यात निरनिराळ्या प्रकारची सुग्रास अशी पक्वान्ने वाढण्यात आली होती आणि मंडळी जेवणाची सुरुवात करण्याच्या तयारीत होती. इतक्यात हरी पाटलाला समोर पाहिल्यावर महाराज ताटावरून उठले आणि हरी पाटलास म्हणाले,

"हरी, बरे झाले तू आलास ते. मला इथे मुळीच करमत नाही. चला आपण शेगावला परत जाऊ."

श्रीगजाननमहाराजांचे हे बोलणे ऐकून बुट्टी फारच घाबरले. अशा तऱ्हेने जेवणावरून उठून महाराज निघून गेले, असे नागपूरात कळल्यास आपली अब्रू पार धुळीला मिळेल, हे जाणून त्यांनी हरी पाटलास अजिजीने विनविले व सर्व परिस्थिती स्पष्टपणे सांगून भोजन आटोपून शेगावला जाण्यास विनविले. सर्व परिस्थितीचा विचार करून हरी पाटलाने ते मान्य केले व सर्वांनी भोजन केले. भोजनोत्तर गोपाळरावांच्या पत्नी जानकीबाई

ह्यांनी महाराजांची पूजा केली व महाराजांनी तिला आशीर्वाद दिला व ते शेगावला परत जाण्यास निघाले.

श्रीमान बुट्टींना आपल्या संपत्तीचा गर्व झाला होता; पण गजाननमहाराजांसारख्या संपत्तीला मृत्तिकेप्रमाणे मानणाऱ्या संताला त्याची काय पर्वा! तेव्हा त्यांनी अशा प्रकारे बुट्टींचा गर्व हरण केला असे वर्णन 'श्रीगजानन विजय' ह्या पोथीत आढळते.

श्री. बुट्टींचा उल्लेख साईसच्चरित्रात 'श्रीमान' असा आढळतो; पण त्यांना संपत्तीचा गर्व होता वगैरे असे काही सांगितलेले आढळत नाही. श्रीगजाननमहाराजांच्या महानिर्वाणानंतर श्री. बुट्टी श्रीसाईबाबांकडे आकर्षित झाले होते असे दिसते. तेव्हा एका संताने गर्व हरण केल्यामुळे पुढे त्यांचा गर्व नाहिसा होऊन ते लीन झाले असावेत व त्यांची पुढची वागणूक साईदरबारातील सर्वांशी नम्रतेची झालेली असावी असे दिसते.

शिरडीचा विकास कसा होत गेला, ह्याचे वर्णन साईसच्चरित्रातील चौथ्या अध्यायात दिसते. त्यामध्ये तेथे बांधण्यात आलेल्या तीन वाड्यांचा उल्लेख सापडतो. त्यात पहिला उल्लेख साठेवाड्याचा येतो. गुरुस्थानच्या सन्निध असलेला वाडा साठे ह्यांनी जमीन खरेदी करून बांधला असे दिसते. त्यानंतरचा उल्लेख दीक्षितांच्या वाड्याचा येतो. पूर्वीचे भोजन-गृह जेथे आहे, तोच दीक्षित वाडा होय व ह्यानंतर 'पुढे श्रीमंत बुट्टींचा इमला' अलोट पैका खर्च करून बांधण्यात आल्याचा उल्लेख त्या अध्यायात सापडतो. ह्या तीन वाड्यांचा ज्या क्रमाने उल्लेख केला आहे, त्याच क्रमाने ते शिरडीस बांधले गेले असावेत. हेमाडपंत बुट्टींच्या वाड्याविषयी ह्याच ठिकाणी असे म्हणतात की,

"ह्याच वाड्यात श्रीबाबांचा देह विसावला आहे. तेव्हा श्री. बुट्टींच्या पैशाचे सार्थक झाले.'

पुढे त्रेचाळीसाव्या अध्यायात ह्याच वाड्याविषयी आणखी काही माहिती मिळते. श्रीमंत बुट्टी हे मोठे भाविक भक्त होते व पुढील भविष्य जाणूनच जणू काही त्यांनी हा टोलेजंग व सुखकारक वाडा बांधून ठेवला होता असे वाटते. एकदा सहज बोलता बोलता बाबाही म्हणाले होते, 'वाडियांत पडो हे शरीर' ह्यावरून आपली समाधी ह्याच वाड्यात बांधावी, असा त्यांचा मानस असावा, असेही हेमाडपंत सांगतात.

पुढे चव्वेचाळीसाव्या अध्यायात बाबांच्या महासमाधीनंतर बुट्टींच्या वाड्याच्या बांधणीच्या वेळी काय घडले, ह्याचे वर्णन करताना हेमाडपंत लिहितात की, बाबा एकदा लेंडी बागेत चालले असता माधवरावांनी केलेल्या विनंतीनुसार ते वाड्यात आले, बुट्टींच्या वाड्यात मुरलीधराची स्थापना कोठे करावयाची हे ठरल्यामुळे तेथे खोदकाम करून गाभारा बांधण्याचे काम सुरू व्हावयाचे होते, म्हणून माधवरावांनी श्रीबाबांच्या हाती नारळ दिला. तेव्हा शुभवेळ पाहून बाबा म्हणाले,

"फोडा नारळ. आपण सर्व बाळगोपाळ येथे जमून काळ घालवू व येथेच सुख-दुःखाच्या गोष्टी करू. सर्व पोरासोरांना येथेच चित्तस्वास्थ्य लाभेल."

एवढं वर्णन करून हेमाडपंत पुढे लिहितात की, शेवटी अपेक्षेप्रमाणे मुरलीधराची स्थापना बुट्टींच्या वाड्यात झालीच नाही व महाराजच स्वतः मुरलीधर झाले. बुट्टींच्या वाड्याचा म्हणजेच सध्याच्या समाधिमंदिराचा हा इतिहास असा आहे!

श्रीसाईसच्चरित्राच्या तेराव्या अध्यायात बापूसाहेब बुट्टींना बाबांनी कसे व्याधिमुक्त केले, ह्याचे वर्णन सापडते. एकदा बापूसाहेबांच्या पोटात थंडी झाली होती व त्यांना उलट्या व जुलाब होऊ लागले. त्यांचे कपाट औषधांनी भरलेले होते, पण त्यातले एकही त्यांना लागू पडेना. तेव्हा ते फार घाबरले. त्यांना इतका अशक्तपणा होता की, त्यांना बाबांच्याकडे पायी जाण्याचेही त्राण नव्हते. तेव्हा त्यांना इतरांनी उचलून बाबांकडे आणले, त्यांच्याकडे आपली तर्जनी हलवून बाबा म्हणाले, "खबरदार आतापासूनी। मलविसर्जनी जाता नये।। वांतीही राहिली पाहिजे ठिकाणी."

ह्यापुढे हेमाडपंत म्हणतात,

"काय त्या बाबांच्या शब्दांचा दरारा! त्यांच्या दोनही व्याधी भेदरल्या व त्यांनी पोबारा केला आणि बुट्टींना आराम जाहला!"

दुसऱ्या वेळी श्रीमान बुट्टींना असाच कॉलऱ्याचा उपद्रव झाला. वांत्या व रेच होऊ लागले. डॉ. पिल्ले शेजारीच होते. त्यांनी सर्व उपाय केले, ते सर्व हरले. तेव्हा ते बाबांकडे आले व त्यांनी बाबांना विचारले की, त्यांना कॉफी द्यावी, की नाही? त्यावेळी बाबांनी सांगितले,

"रवा दूध, बदाम घाला। अक्रोड पिस्त्यासह तयाला। प्यायला द्या तरण ।। तेणे तयाची राहील तहान, होईल सत्वर व्याधी हरण." पटकीसारख्या रोगावरील बाबांचा हा उपाय सामान्यांच्या दृष्टीने अगदीच विचित्र; पण बाबांच्या वाणीचा दरार खरोखरच अगाध. त्या 'तरणाने' बुट्टी खडखडीत बरे झाले!

श्रीसाईसच्चरित्राच्या बावीसाव्या अध्यायात बाबांनी सर्पापासून लोकांना कसे वाचविले त्याचा उल्लेख आहे. त्यात अन्य उदाहरणांबरोबर सर्पाचाही व बुट्टींचाही उल्लेख येतो. एकदा नाना डेंगळे म्हणून एक मोठे ज्योतिषी बापूसाहेबांना म्हणाले, "की तुम्हाला आजचा दिवस फार अशुभ आहे.' ते ऐकून बापूसाहेब फार अस्वस्थ झाले. पण बाबांनी सांगितले की, "तुम्हाला काही भीती नाही." पुढे बापूसाहेब शौचास गेले असता त्या ठिकाणी साप दिसला, तो भयंकर विषारी होता. त्याला मारण्यासाठी तयारी करीत असता तो भोकातून निघून गेला व बापूसाहेबांवर येणारे संकट टळले.

श्रीमान बापूसाहेब बुट्टी ह्यांची श्रीसाईबाबांच्यावर इतकी दृढ श्रद्धा होती व त्यांच्या भक्तीला श्रीबाबांचाही तितकाच प्रतिसाद होता, हे वर केलेल्या सर्व वर्णनावरून वाचकांच्या ध्यानात आलेच असेल. बाबांचा दृढ व दीर्घकाळ सहवास ज्या भक्तांना लाभला, त्यांपैकी श्रीमान बुट्टी हे एक होत आणि म्हणूनच साईबाबांच्या दरबारात त्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे होते यात संशय नाही.

धन्य ते अनन्य साईभक्त बुट्टी की ज्यांना साईबाबांचा दीर्घ सहवास लाभला आणि ज्यांना श्रीसाईबाबांनी आपला कृपाप्रसाद मुक्तहस्ताने दिला.

## श्री महावीर जयंती निमित्त

# जैन विचारसरणी

— श्री. सुनील द. राणे

भारतातील एकंदर विचारसरणींचा विचार करता, त्यासर्व सहिष्णुवादी असल्याचे दिसून येते. वेदपूर्व व समकालात यज्ञविरोधी व कर्मकांड न मानणारी विचारसरणी होती. त्याचाच विकास बौद्ध व जैन विचारसरणीत झाल्याचे आढळते. उपनिषदाचे स्वरुप चिंतन—मननावर आधारलेले आहे. त्याचप्रमाणे बौद्ध व जैन धर्मांतही मानसिक गुण, नैतिकता, चित्तशुद्धी, अंतःकरण शुद्धी, अहिंसा, सत्य, संयम, वैराग्य व आत्मचिंतन इत्यादी गोष्टींना महत्व आहे. बौद्ध धर्माच्याही अगोदर जैन धर्माचे २३ किर्तनकर होते. इ.स. ६ व्या शतकापूर्वी बौद्ध व जैन विचारसरणी अस्तित्वात आल्या. गौतम बुद्धाचा समकालीन महावीर याने जैन धर्माला व्यवस्थित आकार प्राप्त करुन दिला. निष्काम आनंद म्हणजे मोक्षाची संकल्पना बौद्ध जैन धर्मात सर्वश्रेष्ठ मानली आहे. देव म्हणजे माणसाचे अधिक उन्नत झालेले रुप, असे जैन तत्त्वज्ञान सांगते. आत्मा ज्ञानयुक्त असून त्याला क्लिष्टतेतून मुक्त करणे व विशुद्ध रुपाचा प्रत्यय घेणे हे माणसाचे काम आहे. हा घातरहित गूढ आत्मा जवळजवळ ईश्वरासमान असतो. अशी जैन धर्माची विचारधारा आहे.

आत्म्याचा विकास साधता, साधता जे उदात्त स्वरुप प्राप्त होते, ते परमात्म्यासारखे असते. अश्या अवस्थेला जी व्यक्ति पोचते, त्या व्यक्तिला किर्तनकर म्हणून संबोधिले जाते. सारांश जैन तत्वज्ञानाने आत्म्यावर लक्ष केंद्रीत केले आहे. आत्म्याचे रुप निष्क्रिय नसून , ते सक्रिय आहे. आत्म्याचा विकास करण्यावर जैनांची श्रद्धा आहे. संसारात हा आत्मा कर्माने युक्त असतो आणि ह्या कर्माचा नाश केल्यावर आत्म्याचा ज्ञानगुण प्रकट होतो. हे ज्ञान स्थलकालातीत असते. ह्या ज्ञानाचे मतीदज्ञान (इंद्रिय व मन यांच्या सहाय्याने होणारे ज्ञान), श्रुतीदज्ञान (दुसऱ्यांचे ऐकून व शास्त्र वाचून होणारे ज्ञान), अवधीत ज्ञान (कर्मफल नाहिसं होऊन हे ज्ञान प्राप्त होते, त्याला स्थल कालाच्या मर्यादा नसतात.), मनः प्रर्णयज्ञान (दुसऱ्याच्या मनातील जाणता येते.), केवल ज्ञान (संपूर्ण ज्ञान) असे पाच प्रकार जैनांनी कल्पिले आहेत. पाचव्या ज्ञानापर्यंत आल्यावर मोक्षप्राप्तीचा लाभ मिळतो. ज्ञानाप्रमाणेच अज्ञानाचे कुमती, कुशश्रूत, कुअवधी, असे तीन प्रकार सांगितले आहेत.

जैन धर्मात स्यादवाद व अनेकांतवाद असे दोन प्रमुख सिद्धांत आहेत. सद्‌वस्तुचे म्हणजेच अस्तित्वात असलेल्या वस्तुचे स्वरुप अनिश्चित असते. कोणत्याही गोष्टीला अनेक परिमाणे व अनेक पैलू असतात. एखादी वस्तू दिसते तशी. ती नसते. वेगवेगळ्या दृष्टीतून पाहिल्यास ती विभिन्न दिसते. ती स्थिर नसते, कुटस्थनिस्त नसते, अंशतः स्थिर असते, त्याच बरोबर ती अंशतः स्थिरही नसते. कोणत्याही वस्तूत उत्पती, स्थिती, लय एकाच वेळेला असतात असे जैन धर्मिय मानतात.

स्यादवादातूनच प्रत्येक वस्तूकडे बघण्याच्या सात तऱ्हा सांगितल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे — (१) अस्ती (२) नास्ती (३) अस्तीच-नास्तीच (४) अव्यक्तम् (५) नास्तीच्-अव्यक्तमच् (६) आस्तीच्-नास्तीच्-अव्यक्तमच्. ह्या सात तऱ्हांना सप्तभंगीनय असे म्हणतात. या सप्तभंगीनयाला स्यादवाद किंवा अनेकांत वाद म्हटले जाते. जैन विचारसरणी ही समन्वय वादी असून परमतसहिष्णूवादी आहे. जैनांनी अगणित द्रव्ये मानली असून त्यांचे चेतन व अचेतन (निर्जिव) द्रव्ये असे वर्गिकरण केलं आहे. चेतन जीवाचे निगोद (किडे मकोडे इत्यादी) पासून संसारी नीद (माणूस) व त्यानंतर मोक्ष. असा चेतन जीवाचा विकास होत असतो. अचेतनाच्या मूर्त व अमूर्त अशा दोन अवस्था आहेत. जे दिसतं ते मूर्त, त्याला पुद्‌गल म्हणतात. ह्या पुद्‌गलाचे परमाणू व स्कंध असे दोन भाग पडतात. पुद्‌गलाच्या अतिसूक्ष्म भागाला परमाणू म्हणतात. हे परमाणू नित्य, अदृश्य व अखंड असतात. त्यास रस, गंध, स्पर्श, संवेदना असतात. धर्म, अधर्म व आकाश ह्या तीन गोष्टी अमूर्तात मोडतात.

कर्म हे सुद्धा परमाणूंनी बनलेले असते. ह्या कर्म परमाणूंचा जीवनात प्रवेश झाला की संसारयात्रा सुरु होते. ही संसारयात्रा जर नको असेल तर कर्माचे परमाणू जवळ येऊ देता कामा नये. यासाठी त्यांची व्यवस्था करावी लागेल. त्याकरिता जैनांनी संयम, सत्य , संग्रह बाळगू नये, चोरी करु नये अशी नीती तत्त्वे सांगितली आहेत.

कर्म बंधापासून मुक्ती मिळविणे किंवा बंध मोक्ष होणे हे सबंध जीवनाचे उद्दीष्ट जैनधर्मात सांगितले आहे. त्यासाठी त्यांनी बंधमोक्षाची सात तत्त्वे मांडली. जीव, अजीव, आश्रव (कर्माचे परमाणू जीवाकडे येतात व चिकटतात.), बंध (आलेले कर्माचे परमाणू संघटित होतात.), संवर (कर्मबंधाला थांबवले पाहिजे.), निर्जरा (कर्मबंधाचा नाश करणे.), मोक्ष. ह्या सात तत्त्वांतून मार्गक्रमण करत संपूर्ण कर्म बंधाचा क्षय करणे व मोक्ष मिळविणे हे जीवनाचे सार होय!

जैनांनी धार्मिक वाङमय बरच लिहिलं आहे. प्राकृत भाषेची त्यांनी फार मोठी सेवा केली. पुराणं, कथा, तत्त्वज्ञान सांगणारे ग्रंथ, व्याकरणे, कोष, वाङ्मय, छंदशास्त्र, टिकावाङ्मय एवढ्या व्यापक प्रमाणावर जैनांनी लिखाण केलं आहे. त्याकाळच्या लोकांना आपली तत्त्वं कळावित म्हणून त्यांनी त्यांच्या त्यावेळच्या भाषेत (अर्धमागधी प्राकृत) लेखन केले. जैन विचारसरणीचा प्रामुख्याने तामिळ, कन्नड ह्या भारतीय भाषांवर अधिक प्रभाव आहे.

# श्रीसाईनाथ स्तोत्रम्

— डॉ. देवीप्रसाद खं. खरवंडीकर
प्रबोधन हाऊसिंग सोसायटी.,
बुरुडगांव रोड, आफाली मागे,
अहमदनगर-४१४ ००१.

**स्रग्धरावृत्तम्**

वर्षन्तं भक्तवृन्देष्वकृपणकृपापूरराशिं प्रभूतं
धर्मातीतं शरण्यं विधुतकालिमलं सर्वधर्मैः प्रशस्तम्।
पापं तापं जनानां पदकमलजुषां संततं वारयन्तं
वन्दे श्रीसाईनाथं त्रिभुवन-तिलकं सद्गुरुं लोकनाथम्॥

**भुज्जगप्रयातवृत्तम्**

धनः प्रावृषेण्यो यथा चातकानां
तथा त्वं वरेण्यः सदा सज्ञानानाम्
हरस्यापदं संपदोघं ददासि
त्वमेकः शरण्यो. गुरो साइनाथ॥ १॥

अयं ब्राम्हणो वा भवेच्छूद्रवर्णो
नरो वापि नारी, शिशुर्वापि वृद्धः।
नहीदृग् विभेदस्त्वदीयाङ्घ्रिपन्दे
त्वमेकः शरण्यो गुरो साइनाथ॥ २॥

भवन्त्वत्र नानाविधा धर्मभेदाः
श्रितास्त्वत्पदं सर्व एकीभवन्ति।
कथं वर्ण्यते गौरवं ते महात्मन्
त्वमेकः शरण्यो गुरो साइनाथ॥ ३॥

अकूपारकल्पं त्वदीयं चरित्रं
कथं गायतु स्वल्पधीर्मादृशस्तत्
श्रितोऽयं जनः साहसं भो प्रसीद
त्वमेकः शरण्यो गुरो साइनाथ॥ ४॥

## (मराठी अनुवाद)

**स्रग्धरावृत्त**

भक्तजनांवर उदार व भरपूर कृपावृष्टी करणाऱ्या, सर्वधर्मांपलिकडे असणाऱ्या, रक्षण करणाऱ्या, कलियुगातील मळ धुऊन टाकलेल्या, सर्व धर्मांनी प्रशंसिलेल्या, चरणकमलांचा आश्रय करणाऱ्या लोकांचे पाप व ताप यांचे नित्य निवारण करणाऱ्या, त्रैलोक्याला ललामभूत असलेल्या लोकनाथ श्री सद्गुरु साईनाथांना मी वंदन करतो.

## भुजंगप्रयातवृत्त

सर्वश्रेष्ठ असलेले तुम्ही, पावसाळ्यातील मेघ ज्याप्रमाणे चातकांचे संकट दूर करतो; त्याप्रमाणे तुम्ही सज्जनांच्या आपत्तीचे निवारण करता व त्यांना भरपूर संपत्ती देता. श्री सद्गुरु साईनाथा, तुम्हीच एकमेव रक्षणकर्ते आहात. (१)

अमुक एक ब्राम्हण असो अथवा शूद्र असो, पुरुष असो वा स्त्री असो, पोर असो वा थोर असो, असा कोणताच भेदभाव तुमच्या चरणकमलापाशी नाही. श्री सद्गुरु साईनाथा तुम्हीच एकमेव रक्षणकर्ते आहात. (२)

या ठिकाणी अनेक वेगवेगळे धर्म असोत, तुमच्या पायाच्या आश्रयाने ते सर्व एकच होतात. हे महात्मन्, तुमचा मोठेपणा कसा बरे वर्णन करता येईल? श्री सद्गुरु साईनाथा तुम्हीच एकमेव रक्षणकर्ते आहात. (३)

तुमचे चरित्र महासागराप्रमाणे आहे. त्याचे गुणगान माझ्यासारखा अल्पमती मनुष्य कसे करु शकेल. तरी मी हे साहस केले आहे; तुम्ही कृपा करा. श्री. सद्गुरु साईनाथा तुम्हीच एकमेव रक्षणकर्ते आहात. (४)

# साई-भजन

मुझको अपने शरण में लें लो,
ऐ मेरे बाबा साईं
तुमको कैसे बतलांउ की
प्राणो के तुम आधार हों ॥ धृ ॥

तेरी दरबार मे जो भीं आयें, उसे तुम अपनाते हों,
दया का तेरे पार नहीं, तुम 'कृपासिंधू' कहलाते हों,
तेरा बंदा जों होगा दुर, उसे पांस बुलाते हों,
मुझ अधम को कैंसे भूले, और सुध क्यों बिसराई ॥ १ ॥

ठूकरा दो या अपना लो, साई मुझे तेरा ही सहारा है,
नर्वस होकरके इस जगसे, तुमको साईनाथ पुकारा है,
तुफानोंमे अटकी जीवन नैया, दिखत नाही किनारा है,
अब तो यह 'पतीत' शरण आन पडा है, होयेंगी तेरी चाही,
मुझको.... ॥ २ ॥

— श्री. दिलीप शंकरराव लांडे
बी.ए., डी.एड.
स. अध्यापक, महान,
गजानन महाराज विद्यामंदिर,
महान-४४४ ४०५,
जि. अकोला.

# सद्विचार — सद्आचरण हेच खरे ईश्वरचिंतन

**— श्री. सुनील द. राणे**

मानवी स्वभावात परस्परविरोधी प्रेरणांचं संतुलन असतं. कोणती व्यक्ति केव्हा व कोणत्या परिस्थितीत कशी वागेल हे सांगणे अशक्य आहे. हे जरी खरे असले तरी, ईश्वराने इतर प्राणीमात्रांपेक्षा मानवाला विचार करण्याची शक्ति प्रदान केली आहे. म्हणूनच कोणतीही गोष्ट करताना माणसाने सद्सद्विवेक बुद्धीने विचार केला पाहिजे. विचार न करता केलेल्या कृतीचे विपरीत पडसाद आपल्या पुढील आयुष्यावर उमटतात; आणि त्यामुळे आपण आपल्या बरोबरच कुटुंबाला, समाजाला दुःखाच्या खाईत लोटत असतो. योग्य काय अयोग्य काय ही नीतीतत्वे जेव्हा व्यक्तिला कळू लागतात तेव्हा त्याच्या ठिकाणी विचारशक्तिचा विकास झालेला असतो. परंतु केवळ चांगले विचार असून भागत नाही तर त्यांच्या जोडीला चांगल्या आचरणाचीही आवश्यकता असते. तरच मानवी जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध व सुकर होऊ शकेल. सध्या भिन्न भिन्न विचारांचे पेव फुटले आहे. परंतु पूर्वी पेक्षा आजचा मानव असुरक्षित व चिंतातूर आहे. केवळ मोठाले विचार असून चालत नाही, तर त्या विचारांना अनुसरुन वागणे महत्वाचे असते. यासाठी येथे व्यवहारातले उदाहरण घेता येईल. चोरी करणे चूक आहे, हे चोरालाही समजत असते. तरी देखील तो चोरी करतोच. कारण त्याच्या विचार व कृतीत संगतीन राहता, त्यांत अंतर पडते. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नामदेव, कबीर, चोखामेळा, रामदास, श्री. साईबाबा, गजानन महाराज, इत्यादींनी केवळ महान विचार सांगितले नाहीत, तर त्या विचारांचे आचरण स्वतः केले व दुसऱ्यांना तसे करण्यास प्रवृत्त केले. व्यक्तिव्यक्तिंचा मिळून समाज बनत असतो. प्रत्येक व्यक्तिने जर संतांची विचारप्रणाली व कार्यप्रणाली यांचा समन्वय आपल्या जीवनात साधला, तर ती स्वतः सुखी होईल व त्या बरोबरच समाजाचाही उत्कर्ष करील, यात प्रत्यवाय नाही.

# श्री. गोंदवलेकर महाराज यांच्या प्रवचनाच्या आधारे नामाचे महत्त्व

**— सौ. सरोजिनी मुळये**
इंदूर.

★ भगवंताचे स्मरण नाम हा सर्व तीर्थांचा राजा आहे.

★ भगवंताच्या नामात रहा म्हणजे इतर सर्व गुण आपोआप चालत येतील.

★ प्रारब्धाने आलेले भोग येऊ देत. मी ते भोगीन. पण तुझे नामस्मरण मात्र चुकूं देऊ नकोस. अशी प्रार्थना भगवंताला करावी.

★ भगवंतांचे नामसमरण हा उंबरठ्यावरचा दिवा आहे. त्याने प्रपंच आणि भगवंत दोन्हींकडे उजेड पडेल.

★ आपण नाम घ्यावे ते आपणच आपल्या कानांनी ऐकावे. आणि ते घेता घेता शेवटी त्यात स्वतःला विसरुन जावे. हाच खरा आनंदाचा मार्ग आहे.

★ पाणी हे जसे शरीराचे जीवन आहे. तसे नाम हे मनाचे जीवन आहे.

★ भगवंतांच्या प्राप्तीसाठी 'राम नाम' हे यंत्र सर्वांना मिळू शकते. सर्वांना वापरता येते. शिवाय ते कधीच गंजत नाही.

★ शंका घ्यायच्याच झाल्यास नाम चालू ठेवून त्या घ्याव्यात म्हणजे तेच नाम शंकांचे निरासन करील.

★ ध्रुवासारखी नामावर निष्ठा पाहिजे. प्रत्यक्ष भगवंत समोर आले तरी त्याने नाम सोडले नाही.

★ नाम हे प्रारब्धाने येत नाही आणि कर्माने जात नाही अन् नाम घेण्यास काही प्रयास पण पडत नाहीत.

★ "भगवंताच्या नामाशिवाय मला काही कळत नाही" असे ज्याला कळले त्याला सर्व कळले.

★ भगवंताचे नाम हे बॅटरी सारखे आहे. आपल्याला पाहिजे तेव्हा प्रकाश देते. ते आपल्या खिशामध्ये म्हणजे हृदयामध्ये राहू शकते. व कोठेही,केव्हाही ते बरोबर नेता येते.

# श्री साईबाबांची आरती

[चालः- सुखकर्ता दुःखहर्ता....]

जयदेव जयदेव जय साईनाथा हो श्री साईनाथा
तव चरणी मम लीन होई हा माथा. जयदेव जयदेव.. ॥ धृ ॥

शिर्डीमध्ये श्री साई प्रकटले
बालयोगी रूपी दत्त अवतरले
गोदा तटावरीं ब्रह्म उदेलें
तेणें भक्तांचे क्लेशही हरले ॥ १ ॥
जयदेव जयदेव...

जैसा मनी भाव तैसे त्या फळ
रोग व्याधी दूर होती तत्काळ तत्काळ
जाती पंथ यांचा नसे विचार
श्रद्धा भक्ती यांचा मुक्त संचार ॥ २ ॥
जयदेव जयदेव जय साईनाथा हो श्री साईनाथा
तव चरणीं मम लीन होई हा माथा जयदेव जयदेव...

— **श्री. अशोक विनायक औंधे**
४, आयुर्विमा अधिकारी वसाहत,
सदर बाजार, कॅम्प सातारा -४११ ००१.

# सर्वांचे साईबाबा

**— सौ. अनिता कोरडे**
३१, मंहत रोड , विलेपार्ले (पूर्व), मुंबई.

श्री साईबाबा संत होते, महान योगी होते. श्रीसाईबाबांनी अवतार घेतला तो सर्वांच्या कल्याणासाठीच. ते कोठून आले, कोण आहेत, त्यांचा धर्म कोणता, त्यांचे पालक कोण हे कोणालाच माहीत नाही. त्यांनीही कोणाला सांगितले नाही. एका वरातीमधून त्यांनी शिरडीत प्रवेश केला त्यावेळी ते लहान होते. ते आल्यापासून शिरडीचा उद्धारच झाला. शिरडीला महत्व आले. लोक नाना ठिकाणाहून शिरडीत साईबाबांना भेटण्यासाठी येऊ लागले. लोकांचा विश्वास वाढू लागला व भक्ती वाढली. ते कुणाकडे काही मागत नसत. त्यांना कशाचाही हव्यास नव्हता. त्यांच्याकडे नुसते पाहिले तरी लोकांना आनंद मिळे. ते स्वतः बद्दल कधी प्रौढी गात नसत. मी कुणीच नाही, वर बसलेला अल्ला मालीक सर्वकाही करतो असे ते म्हणत. त्यांचा मंत्रही साधा 'श्रद्धा आणि सबुरी.' परंतु त्यांच्या मितभाषी स्वभावानेच लोक त्यांच्याकडे येऊ लागले. त्यांचा वेषही साधा, अंगात कफनी व डोक्याला एक रुमाल! तरीही त्यांचे व्यक्तिमत्व लोकांना भारावून टाकत असे. ते माणसांप्रमाणे प्राणीमात्रांवरही दया करीत. प्राण्यांना खाऊ घालण्यात त्यांना आनंद मिळे. कुत्रा, मांजर, पोपट या सर्वांवर ते प्रेम करीत. कोणी उपाशी वाटल्यास दया करीत.

त्यांच्याकडे अनेक तऱ्हेचे लोक येत. कोणी रोगमुक्त होण्यासाठी येत, कोणी मनःशांतीसाठी येत, तर कोणी मुले व्हावीत यासाठी येत. ते सर्वांना आशीर्वाद देऊन, श्रद्धा व सबुरी ठेवा असे सांगत व अल्ला मालीक कडे बोट दर्शवित असत. त्याच बरोबर त्याच्यावर विश्वास ठेवा, असेही ते सांगत. त्यांनी महारोगही बरे केले आहेत. तसेच काही भक्तांना देवाचे रुप दाखविले आहे. कुणाला रामाचे दर्शन दिले तर कुणाला पायाच्या अंगठ्यांतून गंगा आणून दिली. त्यांच्या वाणीत तसेच हातांत यश होते. आपल्याकडे आलेला भक्त कसा आहे, त्याच्या मनात कोणता हेतू आहे, हे ते जाणीत असत व त्याप्रमाणे त्याच्याबरोबर वागत असत. त्यांचे बरेच भक्त झाले. त्यांची सेवा करायला बरेच भक्त धडपडत असत. परंतु त्यांना सर्वांनी सेवा केलेली आवडत नसे. त्यांच्या काही जवळच्या भक्तांशिवाय ते कुणाला जास्त जवळ करीत नसत. परंतु कुणीही आला तरी ते त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत. कुणाला मंत्र देत (श्रद्धा व सबुरी) तर कुणाला उदी देत. एकदा वाघासारखा वन्य प्राणीही प्राण सोडताना त्यांच्याकडे चालत आला व त्यांच्याकडे पाहून त्याने प्राण सोडला.

त्यांची रहाणी साधी होती. त्याचे जेवण ही साधे होते. योगीच ते. आपल्या कडील सामर्थ्याने त्यांनी बरेच चमत्कार केले. पाण्याने पणत्या पेटविल्या, जळत्या धुनीत हात घालून मांजरीची पिले बाहेर काढली, कुणाला श्रीरामप्रभुचे दर्शन दिले. ते आपल्या शरीराचे काही भाग सुटे करुन स्वच्छ करीत असत. अधांतरी फळीवर झोपणे हा तर त्यांचा रोजचा कार्यक्रम होता. हे सर्व चमत्कार ज्यांनी पाहिले ते भक्त किती भाग्यवान!

आपण त्यावेळी जन्म घेतला असता तर? असा विचार माझ्या मनात नेहमी येतो. तरीही परत दुसरा विचार येतो, बाबा आपल्यासाठी अजूनही शिरडीत आहेत. समाधीस्थानी झोपले आहेत. त्यांची समाधी अजून जिवंत आहे. तिच्याकडे मनोभावे पाहिले तर तुम्हाला बाबा जरुर दिसतील. तुमच्याशी बोलतीलही, तुम्हाला काही हवं असेल तर तेथे जाऊन जरुर मागा, तुमच्या भक्तीला ते अवश्य धावून येतील. ते तुमचे आमचे सर्वांचे बाबा आहेत.

मला ज्या ज्या वेळी अडचणी येतात, दुःख होते त्या त्या वेळी मी साईबाबांचे स्मरण करते, त्यांच्या फोटोला नमस्कार करते व त्यांना माझी अडचण सांगते. त्यांच्या फोटोकडे पाहताना मला धीर येतो व मन शांत होते. त्यांचा मंत्र आठवतो व मग मी दैनंदिन कामाला लागते. पण एक मात्र खरे की, बाबांनी मला कधीच सोडले नाही, माझ्यावर सतत माया करीत आले आहेत. त्याच्यांच मायेने मी आज उभी आहे. मला त्यांचे खूप अनुभव आले आहेत. म्हणूनच मला वाटते, बाबा अजून जिवंत आहेत. ते निर्गुण, निराकार असले तरी आपल्या भोवती त्यांचे प्रेमाचे वलय सतत आहे आणि म्हणूनच मी त्यांना क्षणभरही विसरु शकत नाही. त्यांचा फोटो व मूर्ति माझ्या देव्हाऱ्यात आहे. त्यांची मी नेहमी पूजा करते. गुरुवारी तसेच दिवाळी, दसरा, गुरुपौर्णिमा यांसारख्या पवित्र दिनी मी देवळात जाऊन त्यांचे दर्शन घेते. ज्यावेळी मन खिन्न होते त्यावेळी बाबांची पोथी काढून वाचीत बसते. मग मला समाधान मिळते, आनंद मिळतो व मनासारखे घडते. तुम्हीही त्यांच्याकडे पाहा, ते तुमच्याकडे पाहतील.

# बाबांच्या कृपेने मुलगा बरा झाला

**— सौ. चंद्रकला सोनवणे**
कोलुगडे, इस्टेट बी. डी.,
ब्लॉक नं.-१०, कोलबाड, ठाणे.

माझ्या मोठ्या मुलाला १९६८ मध्ये थोडासा मार लागला होता. तेंव्हापासून तो जवळ जवळ ७-८ वर्षे सतत आजारी पडायचा. डॉक्टरी उपाय चालू होते. एकदा तर तो कंपनीतून घरी आला तो खूप आजारी होऊनच. मी त्याला स्पेशालिस्टकडे नेले. तेव्हा त्याला हिरव्या रंगाच्या उलट्या होऊ लागल्या. रिक्षावालाही त्याला रिक्षात घेण्यास तयार होईना. डॉक्टरांनी त्याला तपासले व त्वरेने क्ष किरण व ऑपरेशन करण्यास सांगितले. परंतु माझी परिस्थिती अगदीच बिकट असल्याने काय करावे तेच मला सुचत नव्हते. काय करावे ह्याचा विचार करीत असतानाच क्षणात मला आमच्याशी घरोब्याचे संबंध असलेले साईभक्त श्री. मोरे यांची आठवण झाली. माझ्या धाकट्या मुलाला मी त्यांच्याकडे पाठविले. त्यांनी श्री. साईबाबांची उदी सरबतात मिसळून द्यावयास सांगितले. त्याप्रमाणे मी करताच माझ्या मुलाचा आजार पार पळून गेला तो कायमचा.

# उदीचा महिमा

— श्री. अनंत भि. भोंसले
एफ/१०२, कल्पीता एनक्लेव्ह,
सहार रोड, अंधेरी (पूर्व),
मुंबई-६९.

मी आणि माझा मित्र आमच्या बिल्डिंगच्या गच्चीवर गप्पा मारत होतो, आमच्या बिल्डिंगच्या समारंभा संदर्भात बोलत होतो. नंतर घरी जावयास निघालो. गच्चीवर पाण्याची पाईप लाईन आहे. त्या पाईप लाईनमध्ये माझा पाय अडकला आणि मी पडलो. मी हातावर पडलो परंतु मुका मार लागला होता म्हणून थोडासा घाबरलोही. यावर उपाय म्हणून मी एकच औषध चालू ठेवले, ते म्हणजे श्री बाबांची विभूती. ती सतत एक महिना लावल्यावर वेदना कमी कमी होत गेल्या व माझा हात पूर्ण बरा झाला. सहजपणे मी आमच्या फॅमिली डॉक्टरकडे गेलो. ते पण साईभक्त आहेत. त्यांना मी सर्व काही सांगितले.

वैद्यकीय शास्त्राच्या आधारे डॉक्टर काकांनी मला एक्सरे काढण्याचे सुचविले. त्याप्रमाणे मी एक्सरे काढला आणि त्यामधील वैद्यकीय अहवाल पाहून आम्ही आश्चर्य चकितच झालो. कारण माझ्या हाताचे हाड मोडले होते, ते पुन्हा पूर्ववत स्थितीत सांधले गेले व जुळत असल्याचे कळले. या दुखण्याच्या कालावधीत मी एकही वैद्यकीय गोळी/औषध न घेता फक्त श्री साईबाबांची विभूती लावली. आता माझा हात सर्व वेदनांपासून बरा झाला आहे आणि पूर्वीसारखा व्यवस्थित आहे, कोणताही त्रास नाही. ही बाबांची कृपा!

◆◆◆◆◆

# शरण मज आला आणि वाया गेला, दाखवा दाखवा ऐसा कोणी

— कु. संगीता गांवकर
१, सोराब हाऊस, खंबाटा लेन,
भायखळा, मुंबई-२७.

साईबाबांचा महिमा माझ्या पामर वाणीने वर्णन करायचा म्हणजे चिमणीच्या चोचीने सागर रिता करण्यातली गत. तरीही मला प्रत्ययास आलेली बाबांची थोरवी येथे देत आहे.

गेल्या वर्षीचा ऑक्टोबर महिना. माझं फार्मसीचं पहिलं वर्ष आणि पहिलीच परीक्षा. घरातल्या काही अडचणींमुळे मी प्रयत्न करूनही माझा अभ्यास झाला नव्हता. दुष्काळात तेरावा महिना यावा तसे नेमके परिक्षेच्या आदल्या दिवशी पाहुणे येऊन थडकले आणि पाहुणचारात माझा सगळा वेळ गेला. ते गेल्यानंतर मला अगदी रडू कोसळले. नेहमी डिस्टिंक्शन घेणारी मी यावेळेस किमान गुणांनी उत्तीर्ण होते की नाही अशी मला शंका वाटू लागली. मी सरळ बाबांना साकडे घातले, 'बाबा, लेकीची अडचण तुम्हीच जाणता.

तुम्हीच मला आता या संकटातून वाचवा. मला काहीही करून परिक्षेत उत्तीर्ण करा.' एका रात्रीत काय झाला तो अभ्यास करून, मी केवळ श्रद्धेच्या बळावरच परीक्षा दिली.

पेपर साधारण गेले. परिक्षेनंतर मला गोरेगावला प.पू. दिघेकाकांकडे जाण्याची बुद्धी झाली. त्यांनी मला धीर दिला आणि 'तू निश्चित पास होशील' असा आशीर्वादही दिला. दिवाळीच्या सुट्टीत मी शिरडीला गेले आणि येताना मनाशी श्रद्धा आणि सबुरीची खुणगाठ बांधून आले.

नंतर परिक्षेचा निर्णय लागण्याचे दिवस आले. एकामागून एक पेपर मिळत गेले. अन् काय बाबांची लीला! मला प्रत्येक पेपरमध्ये चांगले गुण मिळू लागले. होता होता एकच पेपर राहिला. त्याची मला खूपच भीती वाटत होती. मी रोज बाबांकडे प्रार्थना करीत होते. शेवटी पेपर मिळाला आणि उत्तीर्ण होण्याची तसूभरही आशा नसूनसुद्धा मी उत्तम गुण प्राप्त करुन पास झाले. बाबांनीच आपल्या भक्ताची लाज राखली आणि मी माझ्या कॉलेजमधील सवंगड्यांत सर्वात प्रथम आले. बाबांचे हे उपकार मी उभ्या जन्मात विसरणार नाही.

प.पू. दिघेकाकांचा आशीर्वाद आणि बाबांची कृपादृष्टी या जोरांवरच मी पास झाले. बाबांचा वरदहस्त सतत माझ्या पाठी राहो हीच साईचरणी प्रार्थना!

*****

# साईनाथांची छबी नवसाला पावली

— श्री. मधुसूदन आबाजी चव्हाण
साईविहार, साईनाथ कॉ.हौ. सोसायटी,
चाळ नं.३, रु. नं. १, टेम्बेपाडा रोड,
भांडूप, मुंबई-७८.

मे १९८६च्या सुट्टीत आम्ही सहकुटुंब आमचे पाहुणे श्री. प्रभाकर मळगांवकर, मु. मडगांव (गोवा) ह्यांच्याकडे गेलो होतो. जाताना मी शिर्डीहून साईनाथांच्या चरणी लावून आणलेली साईनाथांची छबी सोबत त्यांना सप्रेम भेट म्हणून देण्यासाठी घेतली होती. आम्ही त्यांच्या घरी पोहचल्यानंतर मी त्यांना ती साईनाथांची छबी अर्पण केली. त्यावेळेस त्या उभयतांनी मला सांगितले की, जवळ जवळ तीन वर्ष झाली परंतु आमची थोरली कन्या कु नंदा हिच्या लग्नाचा योग येत नाही. त्यावर मी साईनाथांचे स्मरण करून सांगितले की, सदर साईनाथांची छबी मी शिर्डीहून साईनाथांच्या चरणी लावून आणलेली आहे. ती छबी गुरुवारी ह्या शुभ दिवशी पुजेला लावण्यात आली. त्यांना मी सांगितले की, ह्या छबीवर आपण श्रद्धा ठेवून तिची मनोभावनेने व श्रद्धेने पूजा करा, म्हणजे साईनाथांच्या कृपेने कु. नंदा हिचा लग्नाचा योग १ ते १¹/₄ महिन्यात साईनाथ घडवून आणतील. आणि काय आश्चर्य! जवळ जवळ ३ वर्ष अडून राहिलेले लग्न साईनाथांच्या छबीच्या कृपेने लवकरच उत्तमप्रकारे पार पडले.

# बाबांच्या कृपेनेच वाचले

**सौ. निलम नरेंद्र वरळीकर**
गोप हाऊस, ३/३२,
डॉ. बाटलीवाला रोड,
परेल, मुंबई - ४०० ०१२.

१९८५ सालची गोष्ट. मी काहीतरी व्यवसाय करुन पहावा ह्या हेतूने चकलीची ऑर्डर घेतली होती. जवळ जवळ ४० किलो चकली मी तयार केली होती. दुपारी बारा साडेबाराच्या सुमारास स्टोव्हवर मोठी कढई ठेवून त्यात चकलीची तळणी चालू होती. मी बाथरुममध्ये तांदूळ धुवून कुकरमध्यें लावण्यासाठी जात असताना माझा उजवा पाय अचानक कढईत पडून कढईतले तेल माझ्या पायावर पडले व माझा पाय घोट्याच्या वरपर्यंत भाजला. घरात फक्त माझी १८ वर्षाची मुलगी होती, तिने लगेच स्टोव्ह विझवला व माझ्या पायावर गार पाणी ओतले. परंतु मी तिला सांगितले की, तू दुसरे काही करु नकोस, फक्त मला अुदीची डबी दे. आमची अुदीची डबी दरवाजाजवळ खिडकीवरच असते, जेणेकरुन बाहेर जाता येता कपाळाला लावता येईल. त्याचप्रमाणे बाबांचे फोटो देखील समोरासमोर आहेत. त्यांचेही घरातून जाता येता दर्शन होते. मुलींने अुदी दिल्यावर मी पायावर मुठीने सर्व भागावर टाकली व पाण्यातून घेतली. बाबांना मनोमन नमस्कार करून विनवणी केली की, मी घेतलेली ऑर्डर पूर्ण होऊ दे व माझा पाय तुमच्या अुदीने बरा होऊ दे! त्याप्रमाणे मी नियमितपणे मुलगी बरनॉल लावण्या अगोदर पायाला अुदी लावीत असे व नंतर चकली करीत असे. माझी हाक बाबांनी ऐकली. माझा पाय डॉक्टरकडे न जाता बरा होऊन ऑर्डरसुद्धा पूर्ण झाली. एवढेच नव्हे तर पायाला भाजल्याची साधी खूण सुद्धा राहीली नाही. ही सर्व त्या बाबांचीच कृपा!

# नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य...

**— श्री. अरुण सातपुते (मिरजकर)**
१०/३७१, राजेंद्रनगर,
नवी पेठ पुणे - ४११ ०३०.

त्या दिवशी गुरुवार होता. घरातील मी, माझी पत्नी व मुले सर्वजण झोपी गेलो होतो. आमच्या घरात २४ तास तेलाचा दिवा जळत ठेवण्याची प्रथा आहे. त्याप्रमाणे तो चालूच होता. रात्री २ चा सुमार असावा. माझे शरीर अगदी हलके झाले होते. माझा मी राहीलो नव्हतो, तर माझे शरीरच साईमय झाले होते. त्यांचे देहात माझा देह विलीन झाला होता. परंतु शरीर अत्यंत क्षीण झालेले होते. माझे हात-पायही हालविण्यास मी असमर्थ होतो. परंतु माझे डोळे सर्व घरभर फिरत होते. घरातील दिप जळत होता,

इतर इलेक्ट्रिकचे दिवेही जळत होते. सर्वजण झोपेतच होते. नंतर मला जागृतावस्था आली तेव्हा माझे शरीरावर रोमांच उभे रहात होते व एक वेगळाच अनुभव येत होता, ते वर्णन करण्यास मी असमर्थ आहे. ही घटना जुलै १९८६ मधील आहे.

त्या घटनेनंतर माझ्या वृत्तीत आपोआप खूप फरक पडत चालला आहे. ज्या गोष्टी अडून राहील्या होत्या, त्या मार्गी लागल्या आहेत. जी माणसे दुरावली होती ती आपणहून परत जोडली गेली आहेत. मी आयुष्यात घर बांधू शकेन किंवा नाही अशी परिस्थिती असताना आज माझे घराचे बांधकाम पूर्ण होत आले आहे. कोणतीही दगदग न करता पैसे उभे राहिले. त्याचप्रमाणे खूप प्रयत्न करूनही मी खात्याच्या परिक्षेत ३ वेळा नापास झालो होतो, त्या परिक्षेत मी फक्त बाबांच्या कृपाप्रसादानेच पास झालो आहे.

त्याच प्रमाणे १९७६ पासून मला पाठ दुखीचा विकार आहे. त्यासाठी मला वर्षातून किमान १ महिना तरी रजा काढावी लागत असे. डॉक्टरांनी माहे जुलै ८६ मध्ये पाठीचे ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले होते, तरी ह्या घटनेनंतर बाबांवर सर्व भार टाकला. आज मी खडखडीत बरा झालो आहे. पाठीसाठी निदान १०/१२ हजार खर्च झाले असतील परंतु केवळ बाबांच्या स्मरणाने माझी सर्व दुःखे दूर होत आहेत. पाठीसाठी मला रोज पट्टा बांधावा लागत होता, तो सुटला, त्याच प्रमाणे वहान वापरावयास बंदी करण्यात आली होती. परंतु आता, मी स्कूटरवरुन कामास जात आहे. ही सर्व बाबांची कृपा आहे.

# तब्बल चार महिन्यांनी रिंग सापडली

— सौ. शुभदा अर्जुन नाईक
बांदेकर चाळ, जळकेवाडी,
मु.पो.-कणकवली, जि.-सिंधुदुर्ग.

ता. १०-२-८६ रोजी माझी मुलगी शाळेतून घरी येत असताना वाटेत फुले काढण्यासाठी फुलांच्या झाडावर चढली व झाडावरुन खाली उतरत असताना तिच्या कानातील रिंग झाडाच्या फांदीत अडकून कुठेतरी फेकली गेली. त्यामुळे ती रडत घरी आली. मग आम्ही सर्वांनी त्या ठिकाणी जावून जवळ जवळ पन्नास फूट व्यासाच्या जागेत सर्वतोपरी सर्व ठिकाणी रिंग शोधली. हे शोधण्याचे कार्य अनेक वेळा म्हणजे १५ दिवस सतत केले, परंतु रिंग सापडली नाही. बाबांना रिंग मिळवून देण्याची विंनती करुन रिंगाचा विषय विसरुन गेलो. पण ता. ४-६-८६ रोजी म्हणजे तब्बल ४ महिन्यांनी ती रिंग जशीच्या तशी त्याच ठिकाणी दुसऱ्या माणसाला मिळाली व त्याने ती आम्हाला आणून दिली. ही बाबांचीच कृपा होय!

# बाबांची कृपा

— सौ. कुसूमताई द. मोहिते
१७१, सी, महादेव गल्ली,
भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.

सुमारे १३ वर्षापूर्वी माझी मोठी मुलगी निर्मला ही एकाएकी भाजल्याने मरण पावली. तिच्या निधनाने मला जबर धक्का बसला. माझी मुलगीही साईभक्त होती.

त्यानंतर मी आजारी पडले. मला मधुमेह व रक्तदाबाचा विकार सुरु झाला. त्यानंतर माझ्या थोरल्या मुलाचे लग्न झाले. त्याची पत्नीही साईभक्त आहे. अशा एकंदर वातावरणात आम्ही साईभक्त बनलो आहोत.

मधुमेह व रक्तदाबाचा विकार बळावला जाऊन १९८४ साली मला अर्धांगवायूचा झटका आला. मला माझ्या दोन मुलांनी व पतीने उचलून नेऊन रिक्षात ठेवले व दवाखान्यापाशी गेल्यावर स्ट्रेचरवर झोपवून वरती दवाखान्यात नेले. कोल्हापूरच्या डॉ. जोशी यांचे दवाखान्यात उपचार सुरु झाले. मी माझ्या मुलांना नियमितपणे श्री. बाबांची उदी लावण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे ते करीत होते. माझे डावे शरीर पूर्णपणे निर्जिव झाले होते. दुसऱ्या दिवशी रात्री मला माझा डावा पाय जो निर्जिव झाल्यासारखा वाटत होता, तो पाय मी झोपल्या झोपल्या चक्क उचलला. माझे पती दवाखान्यात झोपण्यास येत असत. त्यांना मी आनंदातिशयाने हाक मारुन जागे केले व त्यांना ही घटना सांगितली. माझा पाय मी त्यांना दोन-तीन वेळा उचलून दाखविला. माझ्या पतीने हात जोडून, साईबाबा ही आपलीच कृपा! असे भावपूर्ण उद्‌गार काढले.

# माझे बाबा

— सौ. निवेदिता घाडीगांवकर
१०/२७, श्री. मोहन को. ऑ. हौ. सोसायटी,
गोविंद नगर, बोरीवली (प.).

माझी मुलगी अंजू तीन वर्षाची असताना खूप आजारी झाली. तिला शौचास व्हायचे बंद झाले. अक्षरशः ती लाकडासारखी ताठ झाली. त्या दिवशी रविवार होता. आमच्या डॉक्टरांनी तिला स्वतः के.ई.एम. रूग्णालयात नेले. तिला ठेवण्यात आलेल्या वॉर्डमध्ये मृत्यूची भीषण छाया पसरली होती. अंजू तीन दिवस तीन रात्री बेशुद्ध होती. डॉक्टरची औषधे चालू होती. आणि मी रात्रंदिवस साईबाबांचे नामस्मरण व आरती करत होते. साईबाबांच्या कृपेने चवथ्या दिवशी अंजू शुद्धीवर आली, माझा आनंद गगनात मावेनासा झाला, माझ्या बाबांमुळेच माझी अंजू मला परत मिळाली.

# श्री साईकृपेने हे सारे घडले

— श्री. रा. ब. बारअी
देशमुखपुरा, ७३/६, काटोल,
जि. नागपूर - ४४१ ३०२.

जानेवारी १९८६ मध्ये कविसंम्मेलनास शिरडीस जाण्याचा मला योग आला. माझी पत्नी माझ्या सोबत होती. माझ्या प्रत्येक शुभकार्यात बाबांचा आशीर्वाद असतो व त्यामुळेच माझी सर्व कामे सुखरूप पार पडतात. माझ्या लहान मुलास कृषी महाविद्यालय, नागपूर येथे प्रवेश घ्यायचा होता; परंतु त्यास प्रवेश अमरावतीला मिळाला. अमरावती आमचे दृष्टीने सोईचे नव्हते. त्यासाठी नागपूरला प्रवेश मिळविण्याकरिता त्याला बाबांचे नाव घेऊन अकोला येथे रजिस्ट्रारकडे पाठविले. परंतु सोईप्रमाणे कॉलेज बदलून देणे फार त्रासाचे होते. तरीदेखील रजिस्ट्रारनी त्वरीत मागणी मंजूर करून त्यास नागपूर येथे कॉलेज बदलून दिले. गावातच नव्याने स्थापन झालेल्या डी. एड्. कॉलेज मध्ये माझ्या मोठ्या मुलास बाबांच्या कृपेने प्रवेश मिळाला व दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करून तो प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. निर्णय लागताच ३-४ दिवसातच त्यास दि. ८ ऑगस्ट १९८६ पासून काटोल येथील नगर परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून नोकरी मिळाली. दि. १ ऑक्टोबर १९८६ पासून माझी उच्च श्रेणी मुख्याध्यापकाच्या जागेवर नेमणूक झाली; व त्याप्रमाणे वेतनातही बढती झालेली आहे. हे सारे श्री बाबांच्या कृपेने घडले.

★★★★★

# साई तारी त्याला कोण मारी

— श्री. यशवंत द. बापर्डेकर
कुसुम, साईनाथ नगर,
घाटकोपर (प), मुंबई-४०० ०८६.

मी आणि माझे कुटुंब बाबांचे भक्त आहोत. मी गेली ३५ वर्षे बाबांचा भक्त आहे. लहानपणी माझ्या घरच्यांबरोबर मी शिरडीला गेलो, ते साल होते १९५०! त्या वेळेपासून आजपर्यंत, केव्हांही न चुकता, रोज बाबांची आठवण काढल्याशिवाय किंवा बाबांच्या प्रतिमेला हात जोडल्याशिवाय माझा दिनक्रम सुरु होत नाही. घराच्या बाहेर पडताना सुद्धा मी बाबांच्या प्रतिमेला हात लावल्याखेरीज बाहेर पडत नाही. असो. गेली १५ वर्षे मी मधुमेह, अतिरक्तदाब व हृदयविकाराने आजारी आहे. मी १८ वेळा हॉस्पिटल मध्ये गेलो. ७/८ वेळा मला अतिदक्षता विभागामध्येही ठेवण्यात आले. इतकी माझी प्रकृती चिंताजनक असून देखील बाबांच्या कृपेमुळे मी वाचलो. कारण ज्यावेळी मी हॉस्पिटलमध्ये असे त्यावेळी बाबांचे नामस्मरण माझ्या मुखावाटे चालू असायचे. ऑक्टोबर

मध्ये असेच एकदा माझ्या हृदयावर 'बाय पास सर्जरी' करण्याचे ठरले व ते ऑपरेशन २३ ऑक्टोंबरला करण्यात आले. मला ऑपरेशन थिएटर मध्ये नेण्याअगोदर माझ्या पत्नीने मला बाबांची 'विभूति' लावली. ऑपरेशन व्यवस्थित पार पडले. दुसऱ्या दिवशी माझी प्रकृती खूप चिंताजनक झाली. मी बेशुद्धावस्थेत होतो. घरातील सगळ्यांची, माझ्या मित्रांची, नातेवाईकांची धावपळ चालू होती, माझी पत्नी माझ्याजवळच होती. तिचा माझ्या आयुष्यासाठी बाबांच्या नावाचा जप चालू होता; व तो साध्य झाला. मी त्या आजारपणातून वाचलो. बाबांच्यावर माझी खूप 'श्रद्धा' आहे. बाबांचे नाव मुखी घेतल्याशिवाय, बाबांच्या पाया पडल्याशिवाय व त्यांची उदी प्राशन केल्याखेरीज आमच्या घरातील कोणतीही व्यक्ति घराबाहेर पडतच नाही. आमच्याकडे दर गुरुवारी आरती नैवेद्य असा कार्यक्रम असतो. असे हे आमचे 'बाबा' आमच्या मागे ठामपणे उभे असल्यानेच आम्हाला कसलीही कमतरता भासत नाही, भासणारही नाही. मला अजून पर्यंत बाबांच्या कृपेमुळे कसलीही अडचण आलेली नाही. म्हणूनच 'साई तारी त्याला कोण मारी' असे मी नित्य म्हणत असतो.

# जगत्चालक श्री साईंची लीला

— सौ. सुशिला य. शिंदे
४१, दामोदर निवास,
राधा दामोदर नगर,
ठाणा (पूर्व)-४०० ६०३.

माझा मोठा मुलगा मुंबई विमानपत्तन सहार येथे वायरमन आहे. नवीन इमारत बांधल्यावर त्याच्या ताब्यात इलेक्ट्रीक रुम देण्यात आली. नवीन रुम मिळाल्यावर त्याने आमचे आराध्य दैवत श्री साईंची तेथे फोटो रुपाने स्थापना केली. त्याच्या रुमच्या बाजूला शो रुम वगैरेही आहेत.

दि. ९ नोव्हेंबर रोजी रात्री १०-३० वाजता बाजूच्या कपड्याच्या दुकानाला शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. ह्या आगीमध्ये बाजूची दोन दुकाने व त्याची इलेक्ट्रीक रुम जळून गेली. आतील सर्व सामान जळले. दरवाजा तर जळून खाक झाला. पण आतमध्ये भिंतीवर लावलेला श्री. साईबाबांचा फोटो जशाचा तसा होता. माझे बाबा जणू सर्वांना आशीर्वाद देत स्थानापन्न होते. विशेष म्हणजे बाबांच्या फोटोभोवती सोडलेले इलेक्ट्रीक तोरण पार वितळून गेले होते पण बाबांच्या फोटोच्या काचेला पण तडा गेला नव्हता. ही आगीची बातमी कळताच दिल्लीहून अधिकारी चौकशीला आले. त्यांना पण ही घटना पाहून नवल वाटले. माझ्या जगत्चालक बाबांनी प्रलय आला तरी जागी स्थिर राहून तुमचे रक्षण करीन असे तर दाखवून दिले नाही ना!

# अन्तर्यामी साई

— सौ. भावना जेऊरकर
साईधाम, विष्णूनगर, डोंबिवली (पश्चिम).

ऑल इण्डिया साई समाजच्या मद्रास येथील साईभक्तांच्या स्नेहसंमेलनाला जाण्याची माझी मनापासून इच्छा होती. पण एकूण ११ दिवस रजा घ्यावी लागणार, शिवाय आम्ही दोघे मद्रासला निघालो तर मुलांचा प्रश्न, एवढे दिवस मुलांना घरी एकटे कसे ठेवणार? शेवटी नाराजीने माझे जाणे रद्द करावे लागले. पण मनातून तर खूप वाईट वाटत होते. शिवाय तिरूपतीचे दर्शन गेलेल्या सर्व साईभक्तांना होणार होते, त्या दर्शनालाही मुकावे लागले ही हुरहूरही मनाला लागली होतीच.

२७ जाने. १९८७ ला मुंबईहून गुरूवर्य श्री. चेंदवणकर यांजबरोबर अनेक साईभक्त निघणार होते. त्या सर्वांना शुभेच्छा द्यावयास तरी आपण जायचे असे मी ठरविले. मनात एकच विचार, आपल्याला स्नेहसंमेलनात सहभागी होता येत नाही. परंतु मला अनपेक्षित योग आला तो शिर्डीपतीच्या दर्शनाचा!

२४ जाने. १९८७ ला नेहमी प्रमाणे मी शाळा करून घरी आले. दुपारी ४ च्या सुमारास साईभगिनी सौ. वैशाली जोशी अचानक आमच्याकडे आल्या व सांगू लागल्या, "आज रात्री शिर्डीला जाण्यासाठी कार ठरविली आहे. आम्ही तुम्हाला घेऊन जाणार आहेत. रात्री ८ पर्यंत गाडी घेऊन येतो. उद्या रात्री १० पर्यंत परत घरी परतायचे." माझ्या पतीने लागलीच परवानगी दिली. माझा आनंद गगनात मावेना. त्यांच्या कुटुंबाबरोबर मी एकटीच जाणार होते. रात्रीचा स्वयंपाक लवकर तयार केला. माझी स्वतःची तयारी करून मी वाट पहात बसले.

रात्री बरोबर ८ वाजता श्री. जोशी कार घेऊन आले. मी, माझी मैत्रीण सौ. आरगडे व जोशी कुटुंब असे सर्वजण शिर्डीला निघालो. प्रवास सुखकर व आरामदायक चालला होता. साईंच्या गप्पा गोष्टी करत आम्ही निघालो. कसाऱ्यापर्यंत आमची गाडी व्यवस्थित गेली. अन् एकाएकी कारच्या पुढील मशिनमधून थेंब थेंब पेट्रोल ठिबकू लागले. गाडी थांबली, ती काही केल्या सुरू होईना. पुष्कळ प्रयत्न केले. तोपर्यंत १२ वाजण्यास आले. कसारा घाटात आम्ही अडकून पडलो. घाटाचा रस्ता, आजूबाजूला घनदाट जंगल! श्री. जोशी व ड्रायव्हर खाली उतरून येणाऱ्या—जाणाऱ्या ट्रकला हात करून थांबविण्याचा प्रयत्न करत होते; पण कोणीही थांबत नव्हते. परत मागे फिरणेही अशक्य होते.

माझ्याबरोबर बाबांची उदी सदैव असते. ती आम्ही सर्वांनी कपाळी लावली, गाडीवर चहूकडे टाकली व साईनामाचा जप जोरात सुरू केला. बऱ्याच वेळाने एक ट्रक उभा राहिला. त्यात तिघे शिख होते. ते तिघेही खाली उतरले. श्री. जोशी व ड्रायव्हर या सर्वांनी २ तास म्हणजे १२ ते २ पर्यंत खूप प्रयत्न केले पण सारे व्यर्थ! शेवटी ते तिघे शिख म्हणाले, "साहेब! आमच्या गाडीने चला, नाशिकपर्यंत सोडतो. पहाटे ४ ला त्यांच्या ट्रकने नाशिकला उतरलो. तेथून शिरडीस जाण्यास आमचा व त्यांचा मार्ग

वेगळा असल्याने त्यांनी आम्हाला नाशिक आल्यावर तसे सांगितले. आम्ही त्यातील एका शिखाला पैसे किती म्हणून विचारले. तर म्हणे, "बहेनजी, आपका और हमारा रिश्ता बहन-भाईका है। मैंने संकटकालमें आपकी मदद की, वह भाई के नाते। क्या भाई इतना भी नही कर सकता? मैं कुछ भी किराया नहीं लूँगा। और आपको यहाँ छोडकर भी नहीं जाऊँगा।" श्री. जोशींनी बळे बळेच त्याच्या हातात १०० रूपयाची नोट ठेवली व त्याचे आभार मानले. ट्रक डोळ्यासमोरून निघून गेला. मनोमन खात्री पटली की, तो ड्रायव्हर म्हणजे माझे बाबाच होते. नाशिक ते शिर्डी हा पुढचा प्रवास टॅक्सीने केला. शिर्डीला आल्यावर डोळे भरून शिर्डीपतीचे दर्शन घेतले. बाबांना म्हटले, "बाबा! तुझी लीला न्यारीच! तू माझी आंतरिक इच्छा जाणलीस. तिरुपती म्हणजेच शिर्डीपती होय ना?" द्वारकामाईतील बाबा हसत होते. "बाबा! कोणाच्या रूपाने कसा आणि केव्हाही उभा राहतोस साई, तू अन्तर्यामी आहेस. लवकरच माहेरी परत बोलव." डोळे पाणावले. मन भरून आले. बाबांनी परत सुखरूप घरी पोहचवले.

# साईगीत

शिरडीच्या साईबाबा बिगी-बिगी धावरे ।
पाण्यावरती डोले माझी डगमग नाव रे ।।
शिरडीच्या साईबाबा बिगी-बिगी धाव रे ।। धृ ।।
केला धावा तुझा साई, भक्ती लीन झालो ।
तुझ्या चरणाशी नाथा, शरण मी आलो ।।
दूर नको साई लोटू, मनी आहे भाव रे ।। १ ।।
मुसलमान, हिंदु, शिख, ईसाई सारे तुला प्यारे ।
जैन, बौद्ध, ख्रिस्ती सारे डोळ्यांचे तारे ।।
दूर आहे, तुझे साई शिरडी हे गाव रे ।। २ ।।
तुझ्या दरबारी साई कोणी ना भिकारी ।
अमीर, गरीब, सारे आहेत तुझे रे पुजारी ।।
तुझ्या चरणाची भक्ती आज मला लाव रे ।। ३ ।।
साऱ्या भक्तांचे संकट दूर कर नाथा ।
तुझ्या चरणाशी आहे सगळ्यांचा माथा ।।
अजब, अनोखा चमत्कार भक्तासी दाव रे ।। ४ ।।
शिरडीच्या साईनाथा बिगी-बिगी धाव रे....

**— श्री. गणेशकुमार काकडे**
मु.पो. आदासा, ता. कळमेश्वर,
जि. नागपूर.

# श्री साईंची उदी — संजीवनी

**— सौ. सुचिता पिळणकर**

श्री साईबाबा हे ऐहिक जीवनात जरी आपल्याला प्रत्यक्षात दिसत नसले तरी, ते आपल्या भक्तांची काळजी वाहत असतात, याचे प्रत्यंतर श्री साईबाबांचे विचार व आचार अनुसरून जे साईभक्त निरपेक्ष वृत्तीने वागतात त्यांना येत असते. १९६५ मध्ये माझ्या जीवनात घडलेल्या घटनेने श्री साईबाबांची माझ्या मनात असलेली ओढ अधिकच दुणावली आहे. माझा मुलगा प्रशांत हा त्यावेळी दीड वर्षाचा होता. नेहमी हसतमुख व खेळकर असणारा हा प्रशांत एक दिवशी अचानक गाफील पडला. अक्षरशः त्याने डोळे पांढरे केले. घरात मी एकटी असल्याने माझी पाचावर धारण बसली. काय करावे तेच सुचेना. आजूबाजूची मंडळी जमा झाली. प्रशांत पूर्वस्थितीत येण्यासाठी जो तो आपापल्यापरीने उपाय करू लागला. परंतु प्रशांतचे डोळे उघडण्याचे चिन्ह काही दिसेना. एवढ्यात मला श्री साईबाबांच्या उदीची आठवण झाली. चट्कन मी ती प्रशांतला लावली आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. प्रशांत शुद्धीवर आला होता. ऐव्हाना मोलकरणीने माझ्या पतीला कामावरून बोलावून आणले होते. त्यांनी प्रशांतला डॉक्टरकडे घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. डॉक्टरांनी प्रशांतला काहीच झाले नसल्याचे निदान केले. जेव्हा पतीने डॉक्टरांना घरी घडलेली सारी हकीकत कथन केली, तेव्हा डॉक्टरही अचंबित झाले. खरेच! श्री साईबाबांची उदी ही संजीवनीच आहे.

# किर्तनी बहर यावा

साई मज हवा हवा।
त्यांची भक्ती माझा ठेवा॥ धृ.॥

तहानलेल्या जीवाला।
साई धावी मदतीला।
किर्ती तुझी गावा गावा॥ १॥

कफण डोक्यावरील।
कोणी अर्थ करील॥
साई फकीर असावा॥ २॥

तुझा पेहराव खोटा।
वनवासातील जट्टा॥
आवतार राम ठेवा॥ ३॥

राम नवमी सोवळा।
भक्तगण केले गोळा॥
उद्देश रुप कळावा॥ ४॥

ठेवारे भाव समाधी।
साई वदें कधी कधी॥
समाधी पूर्वी आठवा॥ ५॥

येते प्रचूती क्षणोक्षणी।
ऐकूनी भक्तांची वाणी॥
किर्तनी बहर यावा॥ ६॥

**— श्री. रामदास गजमल पगारे**
मु.पो. उमरज, ता. नवापूर, जि. धुळे

# ऑल इंडिया साई समाजाचे २४ वे अधिवेशन

ऑल इंडिया साई समाज मैलापूर, मद्रास या प.पू. नरसिंह स्वामीजींनी स्थापन केलेल्या व प.पू. राधाकृष्ण स्वामीजींनी अध्यक्षपद सांभाळून मार्गदर्शन केलेल्या जगप्रसिद्ध संस्थेतर्फे २४ वे श्रीसाईभक्तांचे अधिवेशन ९ व १० मे १९८७ रोजी गरखल कसौली, हिमाचल प्रदेश येथे भरविण्यात येत आहे. प्रतिनिधी वर्गणी अवघी ४० रु. ठेवण्यात आलेली आहे. समस्त साईभक्तांनी या संमेलनास अगत्याने यावे अशी विनंती संस्थेचे अध्यक्ष श्री.टी. केशवराव व मानद चिटणीस श्री. मुथ्थू वेंकटरामन यांनी केली आहे. सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक व साईभक्त श्री. मनोजकुमार हे या संमेलनास अध्यक्ष या नात्याने उपस्थित राहात आहेत. साईभक्तांनी आता त्वरीत संपर्क श्री. पी.एल. गोयल, अध्यक्ष श्री साईसुधा ट्रस्ट, शिर्डी साईबाबा मंदिर, मु.पो. गरखल, पिनकोड नं १७३ २०१, कसौली हिमाचल प्रदेश येथे करावा.

ऑल इंडिया साई समाजाचे रौप्य महोत्सवी अधिवेशन १९८८ साली मद्रास येथे किंवा शिरडी येथे भरविण्यात येणार असून त्याची तयारी जोरात एव्हांपासूनच सुरू आहे.

'ईश्वरपूजा म्हणजे त्याच्या गुणांचे चिंतन. तो अतर्क्य व अवर्णनीय आहे, तरी सृष्टिक्रमावरून समजतो. त्याची पूजा करण्यासाठी जिथे व ज्यावेळी मन शांत असेल, ती जागा व ती वेळ चांगली'. **— राजा राममोहन राय**

### श्रीसाईलीलाच्या सभासदांस निवेदन

श्री साईलीला मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, मुंबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४ बी, खोदादाद सर्कल जवळ, दादर, मुंबई - ४०० ०१४. येथे प्रत्यक्ष/मनिऑर्डर द्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो 'श्री साईबाबा संस्थान शिरडी' या नावावर असावा, कोणत्या कारणासाठी मनिऑर्डर करीत आहात त्याचा खुलासा मनिऑर्डरवर करावा, मनिऑर्डरवर जेथे 'संदेश के लिए स्थान आणि भेजनेवाले का नाम व पूरा पत्ता' असे नमूद केलेले असते त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३१-०० | ६-५० |
| २. | —''— | इंग्रजी | १४-५० | ५-२५ |
| ३. | —''— | हिंदी | ८-५० | ५-२५ |
| ४. | —''— | गुजराथी | १९-०० | ५-२५ |
| ५. | —''— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ६. | —''— | तेलगु | — | — |
| ७. | —''— | तामीळ | — | — |
| ८. | —''— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | — | — |
| ११. | —''— | हिंदी | १०-५० | ४-०० |
| १२. | —''— | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६-०० | ४-०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | —''— | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | —''— | गुजराथी | — | — |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | —''— | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | —''— | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | —''— | तेलगु | — | — |
| २१. | —''— | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | — | — |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-६५ | ३-५० |
| २५. | —''— | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | —''— | हिंदी | १-६५ | ३-५० |
| २७. | —''— | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | —''— | तेलगु | २-०० | ३-५० |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | १-५० | ३-५० |
| ३१. | —''— | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| ३२. | —''— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |

Regd: No. MH/BYE/26
LICENCE No. 19

Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14.

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १. | द्वारकामाई फोटो (प्लॅस्टिक कोटेड) | १७" × २२" | ३-५० | ३-५० |
| २. | —"— | १४" × २०" | १-५० | ३-५० |
| ३. | —"— | ७" × १०" | ०-६० | ३-५० |
| ४. | दगडावर बसलेले साईबाबा (काळा/पांढरा) | १४" × २०" | ०-८० | ३-५० |
| ५. | मूर्ती फोटो | १४" × २०" | १-५० | ३-५० |
| ६. | —"— | १०" × १४" | ०-९० | ३-५० |
| ७. | —"— | ७" × १०" | ०-६० | ३-५० |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :—**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान,
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि.- अहमदनगर.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

मुद्रक : श्री. एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी - २३ रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट,
नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक :** श्री. रा.द. बन्ने, साई निकेतन,
डॉ. आंबेडकर मार्ग, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४ बी.,दादर, मुंबई - ४०० ०१४.